

स्थानिक निवडणुका महायुतीत लढू - रवींद्र चव्हाण / पान २

लोकांचे दैनिक

# लोकशाही वार्ता

epaper.lokshahivarta.in

आयुषचे इंग्लंडमध्ये दमदार शतक / पान ८



नागपूर। वर्धा। चंद्रपूर। गडचिरोली। भंडारा। गोंदिया। अमरावती। यवतमाळ । अकोला। वाशीम। बुलडाणा-खामगाव जिल्ह्यात वितरित होणारे दैनिक

वर्ष-१६, अंक- १२०, पृष्ठे : ८ + गुडमॉर्निंग, किंमत ५.०० रुपये | नागपूर, सोमवार, १४ जुलै २०२५ | RNI No. MAHMAR/2010/35482 | अग्रलेख - 'विकास' हिमालयाच्या मुळावर ******


## ७४ हजार रेल्वे डब्यांमध्ये सीसीटीव्ही बसवणार

### प्रत्येक डब्यात चार 'डोम टाईप' कॅमेरे लावणार

**वृत्तसंस्था/नवी दिल्ली**

भारतीय रेल्वेने प्रवाशांच्या सुरक्षेसाठी लवकरच देशातील सर्व ७४ हजार रेल्वेगाडी डब्ये आणि १५ हजार इंजिन यामध्ये अत्याधुनिक सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्याचा निर्णय घेतला आहे. सध्या ही यंत्रणा प्रायोगिक स्वरूपात उत्तर रेल्वेमध्ये वापरली जात होती आणि त्याचे परिणाम सकारात्मक आढळले आहेत.

रेल्वे मंत्रालयाने स्पष्ट केले आहे की, प्रत्येक डब्यामध्ये चार 'डोम टाईप' सीसीटीव्ही कॅमेरे बसवले जातील. हे सीसीटीव्ही दोन समोरील व दोन मागील दरवाजांजवळ असतील, तर इंजिनमध्ये सहा कॅमेरे असतील. यात पुढे, मागे, दोन्ही बाजूंना आणि दोन्ही कॅबिनमध्ये प्रत्येकी एक कॅमेरा तसेच दोन डेस्क-लावलेले मायक्रोफोनदेखील बसवले जातील.

रेल्वे प्रशासनाने स्पष्ट केले की, या निर्णयामुळे विशेषतः महिलांच्या सुरक्षेचा



प्रश्न अधिक प्रभावीपणे हाताळला जाईल. एकट्या किंवा इतर प्रवाशांसोबत प्रवास करणाऱ्या महिलांना अनेकदा असुरक्षित वाटत असते. आता २४बाय७ ऑनलाइन निगराणी होईल, असे एका वरिष्ठ अधिकाऱ्याने सांगितले.

### गोपनीयतेची काळजी

**प्रवाशांच्या गोपनीयतेचा विचार करताना, कॅमेरे केवळ डब्यांच्या सामान्य हालचाली क्षेत्रात (दरवाज्याजवळ) लावले जाणार आहेत. त्यामुळे डब्यांमधील खासगी भाग किंवा शयनक्षेत्र सुरक्षित राहील. १०० किमी प्रतितासह वेगाने धावणाऱ्या गाड्यांमध्येही हे सीसीटीव्ही उत्तमरित्या काम करू शकतील. याशिवाय, रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी या कॅमेऱ्यांद्वारे मिळणाऱ्या डेटावर इंडियाएआय मिशनच्या सहकार्याने कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) वापरण्याच्या शक्यतेचाही विचार करण्याचे आदेश दिले आहेत.**

## परराष्ट्र मंत्री जयशंकर एससीओ बैठकीला रवाना

**वृत्तसंस्था/नवी दिल्ली**



शांघाय सहकार्य संघटना अर्थातच एससीओच्या बैठकीला उपस्थित राहण्यासाठी परराष्ट्र मंत्री एस. जयशंकर चीनला भेट देणार आहेत. परराष्ट्र मंत्रालयाने सांगितले की, परराष्ट्र मंत्री एस. जयशंकर १३ ते १५ जुलैदरम्यान सिंगापूर आणि चीनच्या दौऱ्यावर आहेत. यानंतर परराष्ट्र मंत्री जयशंकर चीनच्या तियानजिन शहरात होणाऱ्या शांघाय सहकार्य संघटनेच्या परराष्ट्र मंत्र्यांच्या बैठकीत सहभागी होतील. या बैठकीत ते द्विपक्षीय बैठकाही घेतील. गलवानमध्ये भारतीय आणि चिनी सैनिकांमध्ये झालेल्या हिंसक चकमकीनंतर जयशंकर यांचा हा पहिलाच चीन दौरा आहे. पाकिस्तानदेखील एससीओचा सदस्य आहे. त्यामुळे पाकिस्तानचे परराष्ट्र मंत्रीदेखील येथे उपस्थित राहू शकतात. गेल्या महिन्यातच संरक्षण मंत्री राजनाथ सिंह एससीओ देशांच्या संरक्षण मंत्र्यांच्या बैठकीला उपस्थित राहण्यासाठी चीनला गेले होते. पाकिस्तानचे संरक्षण मंत्रीही तिथे उपस्थित होते. राजनाथ सिंह यांनी पाकिस्तानच्या संरक्षण मंत्र्यांना भेटले नाहीत. येथे राजनाथ यांनी पाकिस्तानच्या संरक्षण मंत्र्यांच्या उपस्थितीत दहशतवादावर जोरदार टीका केली होती. पण राजनाथ सिंह यांनी एससीओ संयुक्त निवेदनाच्या मसुद्यावर स्वाक्षरी करण्यास नकार दिला होता. कारण त्यात पहलगाम दहशतवादी हल्ल्याचा उल्लेख नव्हता आणि त्यानंतर संयुक्त निवेदन जारी करण्यात आले नाही.

## ज्येष्ठ विधिज्ञ उज्ज्वल निकम यांच्यासह चौघे राज्यसभेवर

### राष्ट्रपती नामनिर्देशित खासदार म्हणून निवड



**वृत्तसंस्था/नवी दिल्ली**

ज्येष्ठ व अनुभवी सरकारी वकील ॲड. उज्ज्वल निकम यांची राष्ट्रपती नामनिर्देशित खासदार म्हणून राज्यसभेवर निवड करण्यात आली आहे. त्यांच्या सोबतच माजी परराष्ट्र सचिव हर्षवर्धन श्रृंगला, प्रसिद्ध इतिहासकार डॉ. मीनाक्षी जैन आणि केरळमधील प्रसिद्ध समाजसेवक व शिक्षणतज्ज्ञ सदानंदन मास्टर यांनाही राज्यसभेसाठी नामांकित करण्यात आले आहे. संविधानाच्या कलम ८० अंतर्गत भारताच्या राष्ट्रपतींनी हे नामांकन केले आहे.

उज्ज्वल निकम यांनी अलीकडेच भारतीय जनता पक्षात प्रवेश केला होता. २०२४ मधील लोकसभा निवडणुकीत भाजपने त्यांना मुंबईतून उमेदवारी दिली होती. मात्र, काँग्रेसच्या वर्षा गायकवाड यांच्याकडून त्यांचा निसटता पराभव झाला. त्यानंतर आता त्यांना राष्ट्रपती नियुक्त सदस्य म्हणून राज्यसभेत संधी देण्यात आली आहे. लोकसभा निवडणूक भाजपकडून लढलेल्या ॲड. निकम यांचे घराणे मूळ काँग्रेसचे आहे. त्यांचे वडील बॅरिस्टर देवराम निकम हे चोपडा तालुक्यातून काँग्रेसचे आमदार होते. तसेच त्यांचे भाऊ दिलीप निकम व भावजय शैलजा निकम या काँग्रेसच्या जिल्हा परिषद सदस्या होत्या. महत्त्वाच्या आणि उच्चस्तरीय गुन्हेगारी प्रकरणांमध्ये सरकारी वकील म्हणून ज्येष्ठ विधिज्ञ उज्ज्वल निकम यांची विशेष छाप आहे.

### पंतप्रधान नरेंद्र मोदींकडून शुभेच्छा

**पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी रविवारी माजी परराष्ट्र सचिव हर्षवर्धन श्रृंगला, २६/११ मुंबई दहशतवादी हल्ल्यातील विशेष सरकारी वकील उज्ज्वल निकम, केरळ भाजप नेते सी. सदानंदन मास्टर आणि इतिहासकार मीनाक्षी जैन यांचे राज्यसभेवर नामांकन झाल्याबद्दल कौतुक केले. 'एक्स'वर सर्व नामांकित सदस्यांचे अभिनंदन करत पंतप्रधान मोदी म्हणाले की, प्रादेशिक आणि राष्ट्रीय स्तरावर या चौघांचे योगदान अतुलनीय आहे आणि त्यांची तज्ज्ञता संसदेच्या कामकाजाला समृद्ध करेल. उज्ज्वल निकम यांचे कायदा आणि संविधान क्षेत्रातील समर्पण अनुकरणीय आहे. ते केवळ एक यशस्वी वकील राहिले नाहीत, तर महत्त्वाच्या प्रकरणांमध्ये न्याय देण्याच्या प्रक्रियेतही त्यांनी आघाडीची भूमिका बजावली आहे. त्यांच्या संपूर्ण कायदेशीर कारकिर्दीत त्यांनी नेहमीच संवैधानिक मूल्ये मजबूत करण्यासाठी आणि सामान्य नागरिकांना सन्मानाने न्याय देण्यासाठी काम केले आहे, असे त्यांनी नमूद केले.**

# डिझेल मालगाडीला भीषण आग

## वंदे भारत, शताब्दीसह चेन्नईतील अनेक गाड्या रद्द

**वृत्तसंस्था/चेन्नई**

तामिळनाडूतील तिरूवल्लूर रेल्वे स्थानकावर रविवारी सकाळी एक मोठी दुर्घटना घडली. डिझेलने भरलेल्या मालगाडीला भीषण आग लागल्यामुळे रेल्वे वाहतूक पूर्णपणे विस्कळीत झाली आहे. या आगीत पाच टँकर वॅगन्स जळून खाक झाल्याची माहिती आहे. सुदैवाने या दुर्घटनेत कोणतीही जीवितहानी झालेली नाही.

रविवारी पहाटेच्या सुमारास ही मालगाडी तिरूवल्लूर स्थानकाजवळून जात असताना अचानक एका वॅगनमध्ये आग लागली. ही आग काही वेळातच अन्य डिझेल टँकरपर्यंत पसरली आणि आगीचे लोट व धुराचे गडद वलय परिसरात पसरले. त्यातून मोठ्या ज्वाळा उठू लागल्या. या घटनेमुळे संपूर्ण स्थानकात घबराट



पसरली. मालगाडीतील आगीचा व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे. आग इतकी भीषण होती की, तीव्र ज्वालांसोबतच संपूर्ण आकाशात धुराचे काळे लोट दिसत होते.

स्थानिक प्रशासनाच्या म्हणण्यानुसार, आगीची माहिती मिळताच कर्मचारी तातडीने कामाला लागले. अग्निशमन विभाग आणि बचाव पथकाला याची माहिती देण्यात आली. अनेक तासांच्या प्रयत्नांनंतरही अग्निशमन दलाला आग आटोक्यात आणता आली नाही. आगीचे कारण शोधण्यात येत आहे. अधिकाऱ्यांचे म्हणणे आहे की, रेल्वेच्या बोग्यांमध्ये डिझेल भरलेले होते. आग लागताच डिझेलही जळू लागले, ज्यामुळे आग विझवणे खूप कठीण झाले. ही आग एकामागून एक पाच बोग्यांमध्ये पसरली.

ही मालगाडी मनालीहून तिरुपतीला जात होती. वाटेत तिरूवल्लूर रेल्वे स्थानकाजवळ ट्रेनला आग लागली. प्रशासनाने जवळील नागिकांना स्टेशन रिकामे करण्याचे निर्देश दिले.

### रद्द करण्यात आलेल्या गाड्या

**चेन्नई - नागरसोल एक्स्प्रेस, चेन्नई - केएसआर बंगळुरू ब्रिंदावन सुपरफास्ट एक्स्प्रेस, चेन्नई - केएसआर बंगळुरू डबल डेकर एक्स्प्रेस, चेन्नई - तिरुपती सप्तगिरी एक्स्प्रेस, चेन्नई - कोयंबतूर शताब्दी एक्स्प्रेस, चेन्नई - कोयंबतूर कोवई सुपरफास्ट एक्स्प्रेस, चेन्नई - म्हैसूर वंदे भारत एक्स्प्रेस आणि अनेक लांब पल्ल्याच्या गाड्या गुडूर - रेणिगुंटा मार्गाने वळवण्यात आल्या. काही गाड्या कडंबथूर, अरक्कोनम, कटकपट्टी आदी स्थानकांवर अर्धवट थांबवण्यात आल्या होत्या.**

## कुलगाममध्ये एका ताफ्याच्या तीन बसची टक्कर

**वृत्तसंस्था/जम्मू**

जम्मू आणि काश्मीरमधील कुलगाम जिल्ह्यातील खुदवानी भागात श्रीनगर-जम्मू राष्ट्रीय महामार्गावर अमरनाथ यात्रेच्या ताफ्याच्या तीन बस एकमेकांवर आदळल्या. या अपघातात १० हून अधिक यात्रेकरू जखमी झाले. बालटालकडे जाणाऱ्या तीन बस एकमेकांवर आदळल्याने हा अपघात ताचलू क्रॉसिंगजवळ झाला. अपघातात जखमी झालेल्या सर्व यात्रेकरूंना तातडीने जवळच्या रुग्णालयात नेण्यात आले. कैमोह रुग्णालयातील डॉक्टरांनी माहिती दिली की, सुमारे नऊ यात्रेकरूंना प्राथमिक उपचार दिल्यानंतर अनंतनागमधील सरकारी वैद्यकीय महाविद्यालत जाण्यास सांगितले आहे. सर्व जखमी यात्रेकरूंच्या दुखापती किरकोळ असून त्यांची प्रकृती स्थिर असल्याचे डॉक्टरांनी सांगितले. त्यांना चांगल्या उपचारांसाठी आणि औपचारिकतेसाठी जीएमसी अनंतनाग येथे पाठवण्यात आले आहे. प्रवाशांसाठी प्रशासनाने आवश्यक ती सर्व पावले उचलली आहेत आणि त्यांच्या सोयी आणि सुरक्षिततेची खात्री करण्यासाठी सूचना देण्यात आल्या आहेत.

## संभाजी ब्रिगेडच्या प्रवीण गायकवाडांना काळे फासले

### शिवधर्म फाउंडेशनच्या कार्यकर्त्यांकडून मारहाण



**वृत्तसंस्था/सोलापूर**

अक्कलकोट येथे संभाजी ब्रिगेडचे प्रदेशाध्यक्ष प्रवीण गायकवाड यांच्या तोंडाला शिवधर्म फाऊंडेशनच्या कार्यकर्त्यांनी काळे फासले. प्रवीण गायकवाड हे रविवारी अक्कलकोट येथे फत्तेसिंह शिक्षण संस्था आणि सकल मराठा समाजाच्या कार्यक्रमासाठी आले असताना ही घटना घडली.

प्रवीण गायकवाड फत्तेसिंह शिक्षण संस्था आणि सकल मराठा समाजाने आयोजित केलेल्या एका कार्यक्रमासाठी येताच शिवधर्म फाऊंडेशनचे काही कार्यकर्ते अचानकपणे त्यांच्याकडे आले आणि जमा होत त्यांनी प्रवीण गायकवाड यांना काळे फासले. काळे फासल्यानंतर प्रवीण गायकवाड हे कारमध्ये जाऊन बसले. मात्र शिवधर्म फाऊंडेशनचे कार्यकर्त्यांनी कारमध्ये घुसून गायकवाड यांना मारहाण केली. त्यानंतर रस्त्यावरदेखील मारहाण करण्यात आली. त्यामुळे अक्कलकोटमध्ये काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. प्रवीण गायकवाड यांनी आपल्या संघटनेच्या नावामध्ये छत्रपती संभाजी महाराजांचा एकेरी उल्लेख केल्याने शिवधर्म फाउंडेशनचे कार्यकर्ते आक्रमक झाले होते. त्याचबरोबर गायकवाड यांनी स्वामी समर्थांचा एकेरी उल्लेख करून त्यांचा अवमान केल्याचा देखील राग या संघटनेच्या पदाधिकाऱ्यांच्या मनात होता.

## देशभर मतदार यादी पुनरीक्षणाची तयारी

**नवी दिल्ली :** पुढील महिन्यापासून संपूर्ण भारतभर मतदार यादीच्या विशेष पुनरीक्षणची तयारी निवडणूक आयोगाने सुरू केली आहे. हे पुनरीक्षणा बिहारमध्ये सुरू असलेल्या विशेष पुनरीक्षणासारखीच असेल. गेल्या आठवड्यात सर्वोच्च न्यायालयाने याला संवैधानिक जबाबदारी म्हणून घोषित केले आणि बिहारमध्ये निवडणूक आयोगाला ही प्रक्रिया सुरू ठेवण्याची परवानगी दिली तेव्हा निवडणूक आयोगाने हे पाऊल उचलले आहे. (वृत्त पान ६)

## भारतावर २० टक्क्यांपेक्षा कमी टॅरिफची शक्यता

### ट्रम्पच्या 'टॅरिफ बॉम्ब'ची संपूर्ण यादी उघड

**वृत्तसंस्था/वाशिंग्टन**



अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांचा 'टॅरिफ बॉम्ब'चे एकामागून एक देशांवर सतत स्फोट करीतआहे. सुरुवातीला जपान व दक्षिण कोरियासह १४ देशांना टॅरिफ पत्रे पाठवण्यात आली होती. त्यानंतर सात आणि पुन्हा दोन किंवा तीन देशांवर टॅरिफ जाहीर करण्याची प्रक्रिया सुरूच आहे. अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षांनी आतापर्यंत ब्राझीलवर सर्वाधिक ५० टक्के कर लादला आहे, तर अलिकडेच त्यांनी मेक्सिको आणि युरोपियन युनियनवर ३० टक्के कर लादण्याची घोषणाही केली आहे. मात्र, भारताचे नाव अद्याप यादीतून गायब आहे आणि भारत-अमेरिका व्यापार कराराची घोषणा देखील लवकरच अपेक्षित आहे.

एकीकडे, अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी सर्व देशांची टॅरिफ यादी शेअर केली असताना, भारताचे नाव अद्याप त्यात समाविष्ट केलेले नाही. यामागील कारण म्हणजे अमेरिका आणि भारत यांच्यातील व्यापार करार अद्याप अंतिम झालेला नाही.

### भारत-अमेरिका व्यापार करारावर लक्ष

**भारत आणि अमेरिका यांच्यातील व्यापार कराराबद्दल, ट्रम्प यांनी स्वतः दावा केला आहे की तो निर्णयाच्या अगदी जवळ आहे. मात्र, कृषी आणि दुग्ध क्षेत्रावरील चर्चा अडकल्यामुळे, ते मंजूर होऊ शकले नाही. भारतीय वाटाघाटीकर्त्यांचे एक पथक पुन्हा वॉशिंग्टनला जाणार आहे आणि तेथील अमेरिकन अधिकाऱ्यांशी करारावर चर्चा करून हा प्रश्न सोडवेल. त्यावर लवकरच निर्णय घेतला जाऊ शकतो, अशी अपेक्षा आहे. यासंबंधीच्या कोणत्याही घोषणेचा परिणाम पुढील आठवड्यात भारतीय शेअर बाजाराच्या हालचालीवर दिसून येईल.**

## आता 'फूड अँड ड्रग'च्या अधिकाऱ्यांना शिवीगाळ



### आमदार संजय गायकवाड पुन्हा आक्रमक

**वृत्तसंस्था/बुलढाणा**

आमदार संजय गायकवाड यांनी आमदार निवासातील कॅन्टीनमध्ये जेवण चांगले मिळाले नाही म्हणून कॅन्टीन चालकाला मारहाण केली होती. त्या मारहाणीचा प्रकरणानंतर त्यांच्यावर गुन्हा दाखल झाला आहे. मात्र, गुन्हा दाखल होऊनही आमदार गायकवाड यांनी आता फूड अँड ड्रगच्या अधिकाऱ्यांना शिवीगाळ केल्याचे पुढे आले आहे.

बुलढाणाच्या येळगाव येथील पैनगंगा आदिवासी आश्रम शाळेतील १३ विद्यार्थिनींना अन्नातून विषबाधा झाली होती. त्यातील आठ विद्यार्थिनींवर उपचार करून सुटी देण्यात आली, तर पाच जणांवर उपचार सुरू आहेत. विद्यार्थिनींना विषबाधा झाल्यानंतरही अन्न औषध प्रशासनाने कारवाई न केल्याने आमदार संजय गायकवाड यांनी संताप व्यक्त केला. आ. गायकवाड म्हणाले की, 'ह** फूड ॲण्ड ड्रग्जचे अधिकारी माझा फोनदेखील घेत नाहीत. ते गेलेसुद्धा नाहीत. जो संस्थाचालक आहे तो या आदिवासाची लेकरांच्या तोंडचा घास हिसकावतोय. त्यांना दूध देत नाही, अंडी देत नाही, असा सवालही त्यांनी केला.

## पीडित विद्यार्थिनीने रॉकेल ओतून स्वतःला पेटवून घेतले

### ओडिशा लैंगिक छळ प्रकरण; पीडिता ९५ टक्के भाजली

### मुख्यमंत्री म्हणाले, गरज पडल्यास एअरलिफ्ट करू

**वृत्तसंस्था/भुवनेश्वर**

फकीर मोहन कॉलेजच्या बलात्कार पीडित विद्यार्थिनीने न्याय न मिळाल्याने रविवारी रॉकेल ओतून स्वतःला पेटवून घेतली. त्यामध्ये ती ९०-९५ टक्के भाजली आहे. ती आयसीयू वॉर्डमध्ये व्हेंटिलेटरवर आहे. तिला वाचविण्याचा पक्रयत्न करणारा आणखी एक विद्यार्थी व विद्यार्थिनी जखमी झाले आहेत.

ओडिशाचे मुख्यमंत्री रविवारी भुवनेश्वर एम्समध्ये पोहोचले आणि फकीर मोहन कॉलेजच्या पीडित विद्यार्थिनीची भेट घेतली. तिने स्वतःला पेटवून आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला होता. या संदर्भात मुख्यमंत्री मोहन चरण माझी म्हणाले की, पुढचे २४ तास खूप महत्त्वाचे आहेत. दिल्ली एम्सच्या डॉक्टरांसोबतही बैठक झाली आहे. गरज पडल्यास विद्यार्थिनीला एअरलिफ्ट करून विमानाने हलवले जाईल. उपचाराचा संपूर्ण खर्च सरकार उचलेल.

राष्ट्रीय महिला आयोगाने (एनसीडब्ल्यू) ओडिशाच्या डीजीपींना या प्रकरणात कठोर कारवाई करण्याचे निर्देश दिले आहेत. फकीर मोहन कॉलेजच्या बी.एड. विभागाचे एचओडी समीर कुमार साहु याच्यावर पीडिता आणि इतर विद्यार्थ्यांचे मानसिक व शारीरिक शोषण केल्याचा आरोप आहे.

पोलिसांनी साहुला अटक केली आहे. तो विद्यार्थिनींकडून लैंगिक संबंधांची मागणी करायचा. कॉलेज प्रशासनाने आरोपीविरुद्ध कोणतीही कारवाई न केल्याने पीडित विद्यार्थिनी संतप्त झाली होती. स्वतःला पेटवून घेण्यापूर्वी तिने कॉलेजच्या प्राचार्यांशी या विषयावर चर्चाही केली होती.

### चौकशी करण्यासाठी एक समिती स्थापन

**ओडिशाचे शिक्षण मंत्री सूर्यवंशी सूरज म्हणाले की, पीडित विद्यार्थ्यांच्या उपचाराचा संपूर्ण खर्च राज्य सरकार उचलेल. या प्रकरणाची चौकशी करण्यासाठी एक उच्चस्तरीय समिती स्थापन करण्यात आली आहे. पथक बालासोरला रवाना झाले आहे. पथकाने पीडितेच्या कुटुंबाचीही भेट घेतली आहे. आरोपी शिक्षकाला अटक करण्यात आली आहे. त्याला आज न्यायालयात हजर करण्यात आले, अशी माहिती त्यांनी दिली.**

## बिहारच्या मतदार यादीत नेपाळ, बांगलादेश अन् म्यानमारचे घुसखोर

### आयोगाच्या 'सिर'मध्ये धक्कादायक खुलासे

**वृत्तसंस्था/पाटणा**

बिहारमधील मतदार यादीच्या विशेष सघन पुनरावृत्ती (सिर) दरम्यान, निवडणूक आयोगाने धक्कादायक खुलासे करण्यास सुरुवात केली आहे. आयोगातील उच्चपदस्थ सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, बिहारमधील सिरदरम्यान घरोघरी भेटी दिल्या. तेव्हा बूथ लेव्हल ऑफिसर्स (बीएलओ) यांना मतदार यादीमध्ये नेपाळ, बांगलादेश आणि म्यानमारमधून बेकायदेशीरपणे आलेले लोक मोठ्या संख्येने आढळून आले आहेत.

निवडणूक आयोगाच्या सूत्रांनुसार, १ ऑगस्ट २०२५ नंतर योग्य तपासणीअंती अशा व्यक्तींची नावे ३० सप्टेंबर २०२५ रोजी प्रसिद्ध होणाऱ्या अंतिम मतदार यादीतून वगळण्यात येतील. ३० सप्टेंबरनंतर आयोग या घुसखोरांची नेमकी आकडेवारीही जाहीर करेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. बिहारमध्ये मतदार यादीच्या पुनरावलोकन अंतर्गत मतदारांकडून गणना अर्ज जमा करण्याचे काम आता अंतिम टप्प्यात आले आहे.




निवडणूक आयोगाच्या माहितीनुसार, १ ऑगस्ट २०२५ रोजीपर्यंत योग्य तपासणीनंतर, त्यांची नावे ३० सप्टेंबर २०२५ रोजी प्रकाशित होणाऱ्या अंतिम यादीत समाविष्ट केली जाणार नाहीत. ३० सप्टेंबरनंतर, आयोग या संख्येचे आकडेदेखील उघड करेल, अशी अपेक्षा आहे. बिहारमधील मतदार यादीच्या पुनरावलोकनांतर्गत मतदार गणना फॉर्म सादर करण्याचे काम अंतिम टप्प्यात पोहोचले आहे.

१ ऑगस्ट रोजी प्रसिद्ध होणाऱ्या मतदार यादीत ज्यांची नावे नाहीत, ते मतदान नोंदणी अधिकारी, जिल्हा निवडणूक अधिकारी आणि नंतर राज्याच्या मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांकडे अपील दाखल करू शकतात आणि त्यांच्या प्रमाणपत्रांसह त्यावर दावा करू शकतात. ातदारांची अंतिम यादी ३० सप्टेंबर रोजी प्रसिद्ध केली जाईल.

### ८० टक्क्यांहून अधिक मतदारांचे गणना अर्ज जमा

**भारतीय निवडणूक आयोगाने (ईसीआय) दिलेल्या माहितीनुसार, शनिवार सायंकाळपर्यंत बिहारमधील ८०.११ टक्के मतदारांनी आपले गणना अर्ज जमा केले आहेत. २५ जुलै २०२५ या निर्धारित वेळेपूर्वी गणना अर्ज (ईएफ) संकलित करण्याचे काम पूर्ण करण्यासाठी आयोग वेगाने कार्यरत आहे. २५ जुलै २०२५ या अंतिम मुदतीपूर्वी अर्ज संकलनाचे काम पूर्ण करण्याच्या दिशेने आयोग वाटचाल करत आहे. या प्रक्रियेवर मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांमार्फत (सीईओ) राज्यातील सर्व २४३ विधानसभा मतदारसंघांतील ३८ जिल्हा निवडणूक अधिकारी (डीईओ), मतदार नोंदणी अधिकारी (ईआरओ) आणि ९६३ सहायक मतदार नोंदणी अधिकारी (एईआरओ) यांच्यासह क्षेत्रीय पथकांच्या कामकाजावर बारकाईने लक्ष ठेवले जात आहे.**

### सोने चांदी

| | |
|---|---|
| सोने | ९८,८४०/- |
| चांदी | १,१०,०००/- |

* सोने-२४ कॅरेटचे दर, चांदी प्रती किलो

### तापमान

| शहर | कमाल / किमान |
|---|---|
| नागपूर | ३३.६ / २५.६ |
| वाशीम | ३१.० / २३.२ |
| अकोला | ३२.६ / २५.३ |
| बुलडाणा | २९.६ / २२.८ |
| अमरावती | ३०.६ / २२.७ |
| यवतमाळ | ३१.४ / २३.६ |
| वर्धा | ३३.० / २५.५ |
| चंद्रपूर | ३४.४ / २४.८ |
| गडचिरोली | ३२.६ / २४.४ |
| भंडारा | ३२.० / २५.० |
| गोंदिया | ३२.९ / २४.२ |

# मिसिंग लिंक प्रकल्प अभियांत्रिकीचा चमत्कार

- मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे प्रतिपादन
- पुणे-मुंबईदरम्यान अर्धा तास प्रवास कमी होणार

**वृत्तसंस्था/पुणे**

पुणे-मुंबई द्रुतगती महामार्गावरील 'मिसिंग लिंक' प्रकल्प अभियांत्रिकी क्षेत्रातील चमत्कार आहे. या प्रकल्पातील एक बोगदा देशातील सर्वात लांब बोगदा असून, या प्रकल्पामुळे पुणे-मुंबई प्रवासाचा वेळ अर्ध्या तासाने कमी होणार आहे, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

द्रुतगती महामार्गावरील 'मिसिंग लिंक' प्रकल्पाच्या कामाची पाहणी केल्यानंतर मुख्यमंत्री बोलत होते. यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, खासदार श्रीरंग बारणे, माजी आमदार बाळा भेगडे, नगर विकास विभागाच्या प्रधान सचिव मनीषा म्हैसकर, पुणे विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार, कोकण विभागीय आयुक्त विजय सूर्यवंशी, पुण्याचे जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी, रायगडचे जिल्हाधिकारी किशन जावळे, रायगड जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा



भोसले, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाचे उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक अनिलकुमार गायकवाड, सहव्यवस्थापकीय संचालक मनुज जिंदल, राजेश पाटील, मुख्य अभियंता राजेश निघोट, अधीक्षक अभियंता राहुल वसईकर आदी उपस्थित होते.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, या प्रकल्पामुळे घाट असलेला भाग टाळता येणार असून, घाटमार्गामुळे होणारा वाहतूक अडथळा दूर होणार आहे. प्रकल्प पूर्ण झाल्यावर या मार्गावर आरामदायी प्रवास होणार आहे. या प्रकल्पांतर्गत एकूण तीन बोगदे असून एक बोगदा ९ किलोमीटर लांब व २३ मीटर रुंदीचा असून, देशातल्या सर्वांत जास्त लांबीचा बोगदा ठरणार आहे. या अगोदर समृद्धी महामार्गावरील बोगद्याचा विक्रम या बोगद्यामुळे मागे पडेल. प्रकल्पांतर्गत वर्षातील सर्वाधिक उंच पूल बांधण्यात येत असून, याची उंची १८५ मीटर आहे. हादेखील एक विक्रम होणार आहे. या प्रकल्पाचे एकूण ९४ टक्के काम पूर्ण झाले, असे त्यांनी सांगितले.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले की, मिसिंग लिंक प्रकल्प हा अत्याधुनिक तंत्रज्ञान वापरून बांधण्यात येत असून, हा प्रकल्प गेम चेंजर ठरणार आहे. या घाट भागातील वाहतुकीची समस्या पूर्णपणे सुटण्यास आणि अपघात टाळण्यास मदत होणार आहे. महामार्गावरील या प्रकल्पामुळे वेळेसोबतच इंधनाचीही बचत होईल, प्रदूषणही कमी होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

## अकरावीत प्रवेशासाठी लाच मागितली

**वृत्तसंस्था/हिंगोली**

हिंगोली तालुक्यातील भांडेगाव येथील सुखदेवानंद विद्यालयात अकरावीच्या वर्गात प्रवेश मिळण्यासाठी विद्यार्थिनीच्या पालकांकडून दोन हजारांची लाच मागितल्याप्रकरणी माजी प्राचार्य तथा शिक्षण संस्थेचे पदाधिकारी प्रकाश निरगुडे यांच्याविरुद्ध हिंगोली ग्रामीण पोलिसांत गुन्हा दाखल झाला आहे. लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडून मिळालेल्या माहितीनुसार, तक्रारदार हे भांडेगाव येथील रहिवासी आहेत. त्यांच्या दहावी उत्तीर्ण मुलीने सुखदेवानंद विद्यालयात अकरावीच्या वर्गात प्रवेश मिळण्यासाठी ऑनलाइन अर्ज भरला होता. तक्रारदाराच्या मुलीला प्रवेश मिळणार असा संदेश त्यांच्या मोबाइलवर आला होता. प्रवेश घेण्यासाठी एक जुलै २०२५ रोजी सुखदेवानंद विद्यालय, भांडेगाव येथे बोलवले. त्यानुसार पालक तिथे गेल्यानंतर विद्यालयाचे माजी प्राचार्य आणि संस्थेच्या कार्यकारी मंडळातील विद्यमान सदस्य प्रकाश चक्रधर निरगुडे यांच्याशी भेट झाली. भेटीदरम्यान निरगुडे यांनी मुलीचा प्रवेश करायचा असेल, तर तीन हजार रुपये द्यावे लागतील, असे म्हणत तक्रारदाराकडे लाचेची मागणी केली.

# एमपीएससीत तन्मय कटुळे राज्यात पहिला

## मुलींमधून दुर्गा गावडे, तर मागासवर्गातून किशोर किसवे राज्यात प्रथम

**वृत्तसंस्था/मुंबई**

महाराष्ट्र लोकसेवा आयोगातर्फे १७ डिसेंबर, २०२३ रोजी मुंबईसह छत्रपती संभाजीनगर, अमरावती, नागपूर, नाशिक व पुणे जिल्हाकेंद्रांवर घेण्यात आलेल्या महाराष्ट्र गट-क सेवा मुख्य परीक्षा-२०२३ मधील लिपीक-टंकलेखक या संवर्गातील एकूण २७८ नियुक्ती प्राधिकारी कार्यालयांचा अंतिम निकाल जाहीर करण्यात आला आहे. त्यानुसार, एकूण ६ हजार ५१९ उमेदवार विषयांकित पदांकरिता शिफारसपात्र ठरले आहेत. सोलापूर जिल्ह्यातील तन्मय तानाजी कटुळे हे राज्यातून प्रथम आले आहेत.

मागासवर्गवारीमधून पुणे जिल्ह्यातील किशोर चंद्रकांत किसवे हे राज्यात प्रथम आले आहेत, तर महिला वर्गवारीमधून सांगली जिल्ह्यातील दुर्गा विजयराव गावडे या राज्यात प्रथम आल्या आहेत. अंतिम निकालातील ज्या उमेदवारांना त्यांच्या उत्तरपत्रिकेतील गुणांची पडताळणी करावयाची आहे, अशा उमेदवारांनी गुणपत्रके प्रोफाईलवर पाठविल्याच्या दिनांकापासून १० दिवसांत, आयोगाकडे ऑनलाईन पध्दतीने विहित नमुन्यात अर्ज करणे आवश्यक



आहे. या संवर्गाकरिता प्रतीक्षा यादी कार्यान्वित राहणार नाही. अधिक माहिती आयोगाच्या संकेतस्थळावर उपलब्ध असल्याचे आयोगाने कळविले आहे.

'एमपीएससी'च्या वतीने आठ हजारांहून अधिक पदांसाठी जानेवारी २०२३ मध्ये गट-क लिपीक-टंकलेखक पदासाठी जाहिरात देण्यात आली होती. यानंतर उमेदवारांची एप्रिल २०२३ मध्ये पूर्व परीक्षा, डिसेंबर २०२३ मध्ये मुख्य परीक्षा तर जुलै २०२४ मध्ये 'टंकलेखन कौशल्य चाचणी' परीक्षा घेण्यात आली. परंतु, कौशल्य चाचणीच्या पहिल्याच दिवशी तांत्रिक गोंधळ उडाल्याने १ ते ३ जुलैपर्यंतची परीक्षा रद्द करण्यात आली होती.

त्यानंतरही पवई, मुंबई येथील परीक्षा केंद्रावर १० आणि ११ जुलै रोजी इंग्रजी टंकलेखन कौशल्य चाचणी देत असताना 'की-बोर्ड'मध्ये अडचणी आल्या. 'की-बोर्ड'मधील 'बॅकस्पेस', 'शिफ्ट' बटन आणि अन्य बटनांमध्ये टंकखेलन करताना अडचणी येत होत्या. अनेकदा 'स्पेस' बटन पुढे जात नव्हती तर कधी बटन दबत नव्हती. विद्यार्थ्यांनी आयोगाच्या नियमावलीनुसार परीक्षा घेणाऱ्या कंपनीच्या कर्मचाऱ्यांना 'की-बोर्ड' बदलून देण्याची विनंती केली. परंतु त्यांनी ते 'की-बोर्ड' बदलवून दिले नाहीत. 'की-बोर्ड'च्या खराब बटणांमुळे निर्धारित वेळत टंकलेखन कौशल्य चाचणी पूर्ण होऊ शकली नाही. पूर्व व मुख्य परीक्षेत पात्रता गुणांपेक्षा अधिक गुण असूनही उमेदवारांचे टंकलेखन परीक्षेत मोठे नुकसान झाले होते. या गोंधळाविरोधात काही विद्यार्थ्यांनी महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण छत्रपती संभाजीनगर येथे याचिका दाखल केली. न्यायालयाच्या निर्णयानंतर आयोगाने फेब्रुवारी २०२५ मध्ये ५ हजार ६ विद्यार्थ्यांची तात्पुरती गुणवत्ता यादी जाहीर केली. तसेच पसंतीक्रम यादीही जाहीर केली. मात्र, अंतिम निकाल आणि शिफारशीची प्रक्रिया रखडली होती.

# रिक्षाचालकाला दिला सामूहिक चोप

## मराठीतून बोलणाऱ्या यूपीच्या युवकाशी अरेरावी भोवली

**वृत्तसंस्था/मुंबई**

मराठी भाषेचा स्थानिकांकडून होणारा आग्रह आणि काही अमराठी लोकांकडून त्रास होणारा विरोध, यामुळे अनेक ठिकाणी संघर्षाची परिस्थिती उद्भवलेली पाहायला मिळत आहे. 'हिंदी बोलूंगा, भोजपुरी बोलूंगा, पर मराठी नही बोलूंगा', असे मुजोरपणे सांगणाऱ्या एका रिक्षा चालकाचा व्हिडीओ मागच्या आठवड्यात समोर आला होता. आता या रिक्षाचालकाला विरारमध्ये चोप देण्यात आल्याचा नवा व्हिडीओ समोर आला आहे. विशेष म्हणजे चोप देणाऱ्यांमध्ये मनसेसह शिवसेनेच्या (ठाकरे) पक्षाच्या कार्यकर्त्यांचाही समावेश आहे.

विरारच्या प्रकरणात उत्तर प्रदेशमधील झाशी येथे राहणाऱ्या एका व्यक्तीनेच सदर प्रकरण समोर आणले होते. ओव्हरटेक करण्यावरून रिक्षाचालक आणि सदर व्यक्तीमध्ये वाद झाला होता. झाशीचा व्यक्ती अस्खलित मराठीत बोलत असताना रिक्षा चालकाने मात्र त्याच्याशी हिंदीत बोलण्यासाठी वाद घातला. यानंतर झाशीच्या व्यक्तीला इतर रिक्षा चालकांनी मिळून धक्काबुक्की केली



आणि त्याचा फोन रस्त्यावर फेकला.

राजू पटवा असे या मुजोर रिक्षाचालकाचे नाव असून त्याच्या सोबत वाद झालेला अस्सल मराठीत बोलणारा व्यक्ती भावेश पडोलिया हा स्वतः परप्रांतीय उत्तर प्रदेशच्या झाशी येथील आहे. तो महाराष्ट्राला आपली कर्मभूमी मानणारा आहे. त्याच्याशी वाद घालणाऱ्या राजू पटवा या रिक्षा चालकाला विरार स्टेशन परिसरात भर रस्त्यात शिवसेना कार्यकर्त्यांनी चोप दिला. शिवाय, ज्या भावेश पडोलिया आणि त्याच्या बहिणीला धक्का बुक्की केली होती, त्यांची माफी मागायला लावली.

त्याचप्रमाणे महाराष्ट्र, मराठी भाषा आणि महापुरुषांचीदेखील माफी मागायला लावली. यावेळी मराठी भाषा, महाराष्ट्र व मराठी माणसाबाबत अपमानास्पद बोलल्यास त्याला शिवसेना स्टाईलने उत्तर देणार असे विरार शहर प्रमुख उदय जाधव यांनी ठणकावले. यावेळी शिवसेनेच्या महिला कार्यकर्त्यांसह मोठया संख्येने शिवसैनिक उपस्थित होते.

दोन दिवसांपूर्वी दुचाकीस्वार भावेश पडोलिया याने रिक्षा चालकाने चुकीच्या पद्धतीने ओव्हरटेक केल्याचा जाब मराठीतून विचारला. तेव्हा रिक्षाचालक राजू पटवाने त्याला हिंदीमध्ये बोलण्याची सक्ती करत त्याला आणि त्याच्या बहिणीला धक्काबुक्की केली होती. यानंतर शिवसेनेचे (ठाकरे) शहरप्रमुख उदय जाधव यांनी रिक्षा चालकाला गाठून त्याला चोप दिला.

# संजय राऊतविरुद्ध संजय शिरसाट सामना!

## राऊतांना अब्रुनुकसानीची नोटीस देणार असल्याचा इशारा

### बॅगमध्ये नोटांचे बंडल असल्याचा आरोप

**संजय राऊत यांनी मंत्री संजय शिरसाट यांच्या बेडरूममधील एक व्हिडीओ सोशल मीडियावर शेअर केला होता. या व्हिडीओत बाजूला एक बॅग पडलेली दिसत आहे, ज्यात नोटांचे बंडल असल्याचा आरोपही राऊत यांनी केला. मात्र हे आरोप शिरसाट यांनी फेटाळले आहे. यानंतर आता संजय शिरसाटविरुद्ध संजय राऊत हा वाद कोर्टात जाणार असल्याचे दिसत आहे.**

**वृत्तसंस्था/छत्रपती संभाजीनगर**

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे नेते खा. संजय राऊत यांनी सामाजिक न्यायमंत्री संजय शिरसाट यांचा एक व्हिडीओ सोशल मीडियावर शेअर केल्याने एकच खळबळ उडाली आहे. मात्र राऊत यांनी प्रसारित केलेला तो व्हिडीओ मॉर्फ असल्याचा दावा शिरसाट यांनी केला. खा. संजय राऊत यांना अब्रुनुकसानीची नोटीस बजावण्यात येईल. त्यांनी माफी न मागितल्यास पोलिसांत तक्रार देणार असल्याचा इशारा सामाजिक न्यायमंत्री संजय शिरसाट यांनी दिला आहे.

जिल्हाधिकारी कार्यालय येथे



एका बैठकीनिमित्ताने मंत्री शिरसाट आले असता पत्रकारांशी बोलताना ते म्हणाले की, विरोधक मला टार्गेट करण्याच्या प्रयत्नात आहेत. त्यांच्या विरोधात खूप पुरावे आहेत, पण आता ते बाहेर काढण्याची इच्छा नाही. पण गरळ ओकली तर विरोधकांना त्यांच्याच भाषेत उत्तर देऊ. राऊत यांना अब्रुनुकसानीची नोटीस बजवणार असून, त्यांनी उत्तर दिले नाही, माफी मागितली नाही तर फौजदारी गुन्हाही दाखल करू, असा इशाराही मंत्री शिरसाट यांनी दिला.

बदनामी करण्यासाठी किती खालच्या पातळीवर उतरू शकतो, हे राजकारणात पहिल्यांदाच पाहायला मिळत आहे. राजकीय नीतिमत्ता नसलेल्या अशा लोकांना धडा शिकविला पाहिजे, असेही शिरसाट म्हणाले.

## शिंदे गटाच्या चार नेत्यांची चौकशी करा - संजय राऊत

**वृत्तसंस्था/मुंबई**

मी मुख्यमंत्री फडणवीस यांना आवाहन करेन की, शिंदे गटातील भ्रष्ट मंत्री संजय राठोड, संदीपान भुमरे १५० कोटी जमीन ड्रायव्हरच्या नावावर, संजय शिरसाट, उदय सामंत अशा मंत्र्यांचे, जे घोटाळे समोर आले आहेत, त्यांची चौकशी करण्यासाठी एकत्रित एसआयटी स्थापन केली पाहिजे. शिंदे गटाच्या मंत्र्यांची न्यायालयीन चौकशी करावी, अशी मागणी शिवसेना (ठाकरे)चे नेते खासदार संजय राऊत यांनी रविवारी केली.

# स्थानिक निवडणुका महायुतीत लढू - रवींद्र चव्हाण

**वृत्तसंस्था/मुंबई**

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत भाजप महायुती म्हणूनच लढू; पण कार्यकर्त्यांची इच्छा असेल तिथे महायुतीचे नेते निर्णय घेतील, असे भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी सांगितले. एका वृत्त वाहिनीशी बोलताना प्रदेशाध्यक्ष चव्हाण म्हणाले की, येणाऱ्या काळात प्रमुख नेते याचा विचार करतील. काही ठिकाणी त्यांचा विचार करून निर्णय घेतला जाईल, असे सांगत चव्हाण यांनी काही ठिकाणी स्वबळावर लढण्याचा पर्याय असल्याचे संकेत दिले.

महायुती म्हणून हे सगळे चांगल्या पद्धतीने कसे पुढे नेता येईल, यासाठी आम्ही सगळे प्रयत्नशील आहोत, असे ते म्हणाले.

ठाकरे बंधू कशासाठी एकत्र आले, हे सर्वांनाच माहीत आहे. आम्ही त्यांना विकासाच्या मुद्यानेच उत्तर देऊ, असे चव्हाण म्हणाले. महाराष्ट्रात मराठी सक्तीची राहील हे मुख्यमंत्र्यांनी स्पष्टपणे सांगितले आहे. इतर भाषा ऐच्छिक असल्याचे सरकारने स्पष्ट केले आहे. विरोधक विनाकारण दिशाभूल करत आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रयत्नाने छत्रपती शिवाजी महाराजांच्या गड-किल्ल्यांचा 'युनेस्को'च्या यादीत समावेश झाला. या निर्णयाचा आदर विरोधक करतात का? असे सांगत चव्हाण यांनी विरोधकांवर निशाणा साधला. संघटना अधिक मजबूत करणे आणि विरोधकांचा खोटा नरेटिव्ह मोडून राज्य आणि केंद्र सरकारचे हिताचे निर्णय जनतेपर्यंत पोहोचवणे याला आपले प्राधान्य असेल, असे चव्हाण यांनी सांगितले. कोकणातील स्थलांतर थांबवण्यासाठी कोकणात प्रकल्प होणे गरजेचे आहे. प्रत्येक पंचक्रोशीमध्ये काही ना काही निर्माण करणे गरजेचे आहे.

# माझ्या हत्येचा कट होता

## शाईफेकीनंतर प्रवीण गायकवाड यांचा आरोप

**वृत्तसंस्था/सोलापूर**

मी अक्कलकोटला गेलो होतो. अचानकपणे शिवधर्म प्रतिष्ठान फौंडेशनच्या कार्यकर्त्यांनी माझ्यावर काळे वंगन तेल टाकले. त्यांनी माझ्यावर हल्ला केला. त्यांनी मला मारण्याचा प्रयत्न केला, असा आरोप संभाजी ब्रिगेडचे प्रदेशाध्यक्ष प्रवीण गायकवाड यांनी केला.

गायकवाड यांच्यावर आज रविवारी अक्कलकोट येथे शाईफेकीची घटना घडली. या घटनेनंतर प्रवीण गायकवाड म्हणाले की, आपल्यावरील हल्ल्याच्या घटनेला पूर्णपणे सरकार जबाबदार आहे. तसेच आपल्या हत्येचा कट होता आणि ही शेवटाची सुरुवात आहे. ही विचारधारा जी आहे, तुम्हाला आठवत असेल, डॉ. पानसरे यांचा खून झाला. डॉ. कलबुर्गी, डॉ. नरेंद्र दाभोळकर यांचा खून झाला. डॉ. गौरी लंकेशचा खून झाला. या सत्ताकाळात पुरोगामी विचारांचे कार्यकर्ते हे असुरक्षित आहेत, अशी टीका त्यांनी केली.

गायकवाड म्हणाले की, मी अक्कलकोटला गेलो होतो. अचानकपणे शिवधर्म प्रतिष्ठान फौंडेशनच्या कार्यकर्त्यांनी माझ्यावर काळे वंगन तेल टाकले. त्यांनी माझ्यावर हल्ला केला. त्यांनी मला मारण्याचा प्रयत्न केला. ही गोष्ट खरी आहे, असा इशाराही त्यांनी दिला.

# 'फनेल झोन'मुळे २५ हजार कोटींची बांधकामे अडचणीत

## आमदार सत्यजित तांबे यांचा विधिमंडळात तारांकित प्रश्न

**वृत्तसंस्था/नाशिक**

एचएएल विमानतळाच्या 'फनेल झोन'मुळे नाशिक महापालिका हद्दीतील २५ हजार कोटींचे बांधकाम प्रकल्प अडचणी सापडले आहेत. त्यामुळे निर्माण झालेल्या स्थितीमुळे रहिवाशांसह बांधकाम व्यावसायिकांना अनेक अडचणींचा सामना करावा लागत असून, याबाबत विधान परिषदेचे सदस्य सत्यजीत तांबे यांनी विधिमंडळात तारांकित प्रश्न उपस्थित केला. यासंदर्भात राज्याच्या नगरविकास विभागाने महापालिका प्रशासनाकडून सविस्तर माहिती मागविली आहे.

जिल्ह्यातील ओझर स्थित विमानतळाच्या 'फनेल झोन'



लगतच्या सुमारे २० किमी परिसरात बांधकाम परवानगी देताना एचएएलची परवानगी घेण्याचे पत्र कंपनीने नाशिक महापालिकेस पाठविले आहे. त्यामुळे निम्म्या नाशकातील बांधकामे अडचणीत सापडली आहेत.

मध्यंतरी याबाबत महापालिकेने एचएएल प्रशासनाशी पत्राव्दारे संपर्क साधून संबंधित नियमावलीच्या अनुषंगाने तोडगा काढण्याबरोबरच सुधारणा करण्याविषयी कळविले होते. मात्र त्यावर अद्यापही कोणत्याही सूचना वा मार्गदर्शन मिळालेले नाही.

यासंदर्भात आता विधान परिषदेचे सदस्य आ. सत्यजित तांबे यांनी तारांकीत प्रश्न उपस्थित केला असून, त्याअनुषंगाने नगरविकास विभागाने मनपाकडून संबंधीत माहिती मागविली आहे.

शहरातील बांधकाम क्षेत्रात समस्या उद्भवली आहे काय, या बांधकाम बंदीमुळे सुमारे २५ हजार कोटी रुपयांचे बांधकाम प्रकल्प प्रलंबित आहे का, तसेच बांधकाम व्यावसायिक आणि नागरिकांना अनेक समस्यांचा सामना करावा लागत आहे का, असे प्रश्न उपस्थित करताना ६० दिवसांत बांधकाम परवाना देण्याची कालमर्यादा या बंदीमुळे बंद होण्याची शक्यता आहे.

तसेच अनेक बांधकाम परवान्याबाबत एचएएलला अभिप्राय घ्यायचा झाल्यास कालापव्यय होण्याची शक्यता आहे का? असे प्रश्न आ. तांबे यांनी उपस्थित केले आहेत.

# मसापचे पुरस्कार जाहीर

## पारगावकर, कुसनाळे, पाटील, अतकरे मानकरी

**वृत्तसंस्था/छत्रपती संभाजीनगर**

मराठवाडा साहित्य परिषदेचे २०२५ या वर्षीचे वाङमय पुरस्कार शुक्रवारी जाहीर करण्यात आले. यंदाच्या पुरस्काराचे वंदना पारगावकर, सचिन कुसनाळे, पांडुरंग पाटील आणि अनिल अतकरे हे मानकरी ठरले. लवकरच पुरस्कार प्रदान करण्यात येतील, अशी माहिती 'मसाप'चे अध्यक्ष कौतिकराव ठाले पाटील यांनी दिली आहे.

वंदना पारगावकर (छत्रपती संभाजीनगर) यांना 'अनोखे थायलंड' या प्रवासवर्णनपर पुस्तकासाठी 'नरहर कुरुंदकर वाङमय पुरस्कार' जाहीर झाला आहे. 'प्राचार्य म. भि. चिटणीस वाङमय पुरस्कार' सचिन कुसनाळे (म्हैसाळ) यांना 'गांधी : वाद आणि वास्तव' या वैचारिक ग्रंथासाठी जाहीर झाला आहे. 'बी. रघुनाथ कथा-कादंबरी पुरस्कार' पांडुरंग मुरारी पाटील (राधानगरी) यांच्या सनांगरमुठी' कादंबरीला जाहीर झाला आहे. रोख तीन हजार रुपये आणि सन्मानचिन्ह असे पुरस्काराचे स्वरूप आहे. 'रा. ज. देशमुख स्मृती पुरस्कार' मागील अर्ध्या शतकापासून ग्रंथवितरण व प्रकाशन क्षेत्रात काम करणारे कैलाश पब्लिकेशन संस्थेचे अनिल अतकरे (छत्रपती संभाजीनगर) यांना जाहीर झाला आहे. मराठवाडा साहित्य परिषदेने संजीव कुळकर्णी यांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या समितीने ग्रंथ निवड केली आहे. या समितीत डॉ. विश्वाधार देशमुख व सुहास देशपांडे सदस्य होते. रा. ज. देशमुख स्मृती पुरस्काराची निवड डॉ. दादा गोरे, डॉ. अनिरुद्ध मोरे आणि डॉ. विष्णू सुरासे यांच्या समितीने केली आहे.

# मला पीएम मोदींचा फोन आला, मराठीत बोलले

## ॲड. उज्जल निकम यांच्याशी खासदारकीपूर्वी संवाद

### संतोष देशमुख हत्याप्रकरणात सरकारी वकील

**उज्ज्वल निकम यांचा जन्म जळगाव येथे झाला. त्यांचे वडील देवराव माधवराव निकम हेदेखील बॅरिस्टर होते. जळगाव येथील एस. एस. मणियार लॉ कॉलेजमधून कायद्याचे शिक्षण घेतले. उज्ज्वल निकम यांनी टी सीरीजचे संस्थापक गुलशन कुमार यांची हत्या, भाजप नेते प्रमोद महाजन यांची हत्या आणि मुंबई सामूहिक बलात्कार यासारखे हायप्रोफाइल खटले देखील लढले आहेत. बीडच्या मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणात सरकारी वकील म्हणून उज्ज्वल निकम यांची नियुक्ती करण्यात आली.**

**वृत्तसंस्था/मुंबई**

मला काल पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा फोन आला होता. ८.४४ वाजता मला त्यांनी फोन केला आणि मराठीत म्हणाले, हिंदीत बोलू की मराठीत? मी त्यावर उत्तर देत म्हटले, तुमचे दोन्ही भाषेंवर प्रेम आहे. त्यांनी माझ्यासोबत मराठीत संवाद साधला, अशी माहिती ज्येष्ठ विधिज्ञ उज्वल निकम यांनी दिली.

सरकारी वकील म्हणून काम पाहणारे ज्येष्ठ विधिज्ञ उज्वल निकम यांची राष्ट्रपती नामनिर्देशित राज्यसभा खासदार म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. या नियुक्तीने कायद्याच्या क्षेत्रातील एक अभ्यासू व्यक्तिमत्त्व संसदेच्या सभागृहात



प्रतिनिधित्व करणार आहेत.

खासदार म्हणून निवड झाल्यानंतर ॲड. उज्ज्वल निकम यांनी पत्रकार परिषद घेतली.

यावेळी बोलताना ॲड. निकम म्हणाले की, राष्ट्रपतींची निवड असल्याने माझ्यावर मोठी जबाबदारी असेल. आपल्याला कल्पना असेल की, लोकसभेची निवडणूक ही एका वेगळ्या मुद्दावर लढली गेली. जिथे गैरसमजूती पसरवल्या गेल्या, जिथे गैरसमजूतींना लोक बळी पडले, ज्यावेळी याचा परिणाम लोकांना दिसला की, आपले चुकले. विशेषः कसाबच्या गोळीने आमच्या या राज्यातील शहिदांची हत्या झालेली नाही, असे सांगण्यापुरतेदेखील काही राजकीय नेत्यांची मजल गेली होती. हे बघितल्यानंतर लक्षात आले की, गोबेल्स प्रपोजेंटा हा काय असतो, हे मला लोकसभेच्या निवडणुकीमध्ये बघायला मिळाले. परंतु गोबेल्स प्रपोजेंटा उघडा पाडत जनतेने विधानसभेत दाखवून दिले, असेही निकम यांनी म्हटले.

दहशतवादी अजमल कसाबविरूद्धचा खटला लढवण्यासाठी निकम ओळखले जातात. मुंबईमधून लोकसभेची निवडणूक उज्ज्वल निकम यांनी लढवली होती. मात्र, त्यांना पराभव स्वीकारावा लागला. निकमांचे खासदार बनण्याचे स्वप्न आता पूर्ण झाले आहे.

# भूस्खलन बाधितांच्या घरांसाठी मुदतीत काम पूर्ण करा - ना. शंभूराज देसाई

**वृत्तसंकलन/सातारा**

सातारा जिल्ह्यातील मिरगाव येथील अतिवृष्टीमुळे भूस्खलन झालेल्या बाधित कुटुंबांना पक्की घरे ताब्यात मिळण्यासाठी येत्या डिसेंबर अखेर काम पूर्ण करावे, अशा सूचना राज्याचे पर्यटन, खनिकर्म, माजी सैनिक कल्याण मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री शंभूराजे देसाई यांनी दिल्या.



दौलतनगर ता. पाटण येथील शासकीय विश्रामगृहात मिरगाव येथील ग्रामस्थांचे भूस्खलनामुळे पुनर्वसन करण्याच्या संदर्भात आढावा बैठक पालकमंत्री शंभूराज देसाई यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आली. बैठकीस जिल्हाधिकारी संतोष पाटील, मुख्य कार्यकारी अधिकारी याशनी नागराजन, पोलिस अधीक्षक तुषार दोशी, पाटणचे प्रांताधिकारी सोपान टोम्पे, सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता राहुल अहिरे, पाटणचे तहसीलदार अनंत गुरव, लोकनेते बाळासाहेब देसाई सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन यशराज देसाई आदी उपस्थित होते.

मिरगाव येथील जुलै २०२१ मध्ये अतिवृष्टीमुळे भूस्खलन झाल्याने १४७ कुटुंबांचे नुकसान झाले आहे. त्यापैकी ४७ कुटुंबे पूर्णतः भूस्खलीत झाली आहेत. ९८ कुटुंबाचे स्थलांतरित निवारा शेडमध्ये तात्पुरता स्वरुपात करण्यात आले आहे. या बाधित कुटुंबांना पक्की घरे देऊन पुनर्वसन करण्याचे काम शासन करीत असल्याचे सांगून पालकमंत्री देसाई म्हणाले, येत्या डिसेंबरअखेर किमान १०० घरांची कामे तत्काळ पूर्ण करून बाधित कुटुंबांना ताबा देऊन पुनर्वसित करावे. तसेच उर्वरित काम येत्या पावसाळ्यापूर्वी पूर्ण करावे, अशा सूचनाही पालकमंत्री देसाई यांनी दिल्या.

# म.प्र., राजस्थान, बिहारमध्ये पूरस्थिती

**वृत्तसंस्था/नवी दिल्ली**

देशभरात मान्सूनने जवळपास सर्वच ठिकाणी जोर पकडला असून, हवामान खात्याने मध्य प्रदेश आणि पूर्व राजस्थानसाठी 'ऑरेंज अलर्ट', तर झारखंडसाठी 'यलो अलर्ट' जारी केला आहे. या पावसामुळे मध्य प्रदेशातील पाच जिल्ह्यांत पूरपरिस्थिती निर्माण झाली असून, राजस्थानमध्ये दोन मुलांचा बुडून मृत्यू झाला आहे. झारखंड आणि बिहारमध्ये वीज कोसळून तिघांचा मृत्यू झाला आहे. हिमाचल प्रदेशात भूस्खलनामुळे राष्ट्रीय महामार्ग बंद करण्यात आले होते. त्यामुळे वाहतुकीसाठी अडथळा निर्माण झाला होता.

मध्य प्रदेशात मुसळधार पावसामुळे सतना, छतरपूर, खजुराहो, रेवा आणि चित्रकूट जिल्ह्यांमध्ये पूरस्थिती निर्माण झाली आहे. खजुराहोमध्ये ९ तासांत तब्बल ६.३ मिमी, तर नौगाव (छतरपूर) येथे ३.४ मिमी पावसाची नोंद झाली. चित्रकूटमध्ये पुरामध्ये अडकलेल्या नागरिकांना बोटीद्वारे

## वीज कोसळून व बुडून पाच जणांचा मृत्यू



वाचवण्यात आले. राज्यातील बनसागर धरणाचे सात दरवाजे आणि बर्गी धरणाचे पाच दरवाजे सुरक्षेच्या कारणास्तव उघडण्यात आले आहेत.

काल शनिवारी झालावाड, धोलपूर, करौली आणि अलवर जिल्ह्यांत जोरदार पावसाने हजेरी लावली. झालावाडमध्ये ४ मिमीपेक्षा जास्त पावसामुळे सखल भागात पाणी साचले. याच दरम्यान, पाण्यात बुडून तीन मुले वाहून गेली, त्यापैकी दोघांच्या मृतदेहांचा शोध लागला असून, एकाचा शोध सुरू आहे.

हवामान विभागाने आज रविवारी मध्य प्रदेश, राजस्थान, गुजरात आणि उत्तराखंडसाठी ऑरेंज अलर्ट दिला आहे. तसेच, देशभरातील २१ राज्यांमध्ये यलो अलर्ट देण्यात आला आहे. दिल्लीतील सफदरजंग वेधशाळेने शनिवारी संध्याकाळी १२.९ मिमी पावसाची नोंद केली. शहरात ढगाळ वातावरण आणि हलक्या पावसामुळे हवामानात गारवा जाणवला. रविवारी वादळी वाऱ्यांसह हलक्या ते मध्यम पावसाचा अंदाज आहे. उत्तराखंडमध्ये वीज कोसळण्याबरोबरच पूर आणि भूस्खलनाचा धोका असल्याचा इशाराही देण्यात आला आहे. मध्य प्रदेश आणि उत्तर प्रदेशात वीज कोसळण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे. नागरिकांना सतर्क राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

देशभरात मान्सूनचा विस्तार होत आहे. आयएमडी ने दिलेल्या माहितीनुसार पुढील ३-४ दिवसांत हिमाचल प्रदेश, उत्तराखंड आणि राजस्थानमध्ये जोरदार पावसाची शक्यता आहे. पश्चिम बंगाल, सिक्कीम, बिहार, झारखंड आणि ओडिशा या पूर्व भारतातील भागांतही पुढील दोन दिवसांत मुसळधार पावसाची स्थिती कायम राहील.

### झारखंड व बिहारमध्ये वीज कोसळून तीन मृत्यू

**झारखंडमधील सरायकेला-खरसावन आणि लोहारडगा जिल्ह्यांत वीज पडून दोन जणांचा मृत्यू झाला आणि एक जण भाजला. हे तिघे शेतात काम करून घरी परतत असताना ही घटना घडली. बिहारमधील रोहतास जिल्ह्यात वीज कोसळून एका महिलेचा मृत्यू झाला. हिमाचल प्रदेशातील मंडी जिल्ह्यात पांडोह धरणाजवळ 'कैंची मोर' येथे भूस्खलन झाल्याने चंदिगड-मनाली राष्ट्रीय महामार्ग बंद करण्यात आला आहे. यामुळे शेकडो वाहने रस्त्यावर अडकली होती. राज्यातील २५० पेक्षा अधिक रस्ते १० तासांसाठी बंद करण्यात आले होते.**

# भाजप नेत्याची गोळ्या घालून हत्या!



**वृत्तसंस्था/पाटणा**

बिहारची राजधानी पाटणा भाजप नेत्याच्या हत्येने हादरली. पाटणामध्ये भारतीय जनता पक्षाचे नेते सुरेंद्र केवट यांची गोळ्या घालून हत्या करण्यात आली. दुचाकीवरून आलेल्या दोन तरुणांनी सुरेंद्र केवट यांच्यावर गोळीबार केला. त्यांना चार गोळ्या लागल्या होत्या. गेल्या काही दिवसात बिहारमधील दुसरी खळबळजनक घटना आहे. काही दिवसांपूर्वी व्यावसायिक गोपाल खेमका यांची हत्या करण्यात आली होती.

विधानसभा निवडणुकीचे वारे वाहण्यास सुरूवात झालेल्या बिहारमध्ये कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाला आहे. गोपाल खेमका यांच्या हत्येची घटना चर्चेत असतानाच पाटणामध्ये भाजप नेते सुरेंद्र केवट यांची हत्या करण्यात आली आहे.

सुरेंद्र केवट हे भाजप किसान मोर्चाचे पुनपुन विभागाचे अध्यक्ष होते. दुचाकीवरून आलेल्या दोन तरुणांनी त्यांच्यावर गोळीबार केला. यात ते जखमी झाले. त्यांना चार गोळ्या लागल्या होत्या. सुरेंद्र केवट यांना तातडीने पाटणातील एम्स रुग्णालयात नेण्यात आले.

उपचार सुरू असतानाच सुरेंद्र केवट यांचा मृत्यू झाला. केवट यांच्यावर गोळीबार करण्यात आल्याची माहिती मिळताच फुलवारी शरीफचे आमदार गोपाल रविदास आणि माजी मंत्री शाम रजक यांनी रुग्णालयात धाव घेतली. तिथे त्यांना केवट यांचा मृत्यू झाल्याचे कळले. दोन्ही नेत्यांनी केवट यांच्या कुटुंबाचे सांत्वन करत धीर दिला.

काही दिवसांपूर्वीच बिहारमध्ये नामांकित व्यावसायिक व भाजप नेते गोपाल खेमका यांची गोळ्या घालून हत्या करण्यात आली. गोपाल खेमका यांच्यावर त्यांच्या घराबाहेरच गोळ्या झाडण्यात आल्या. गेल्या काही दिवसांत सीतामढी, गया, नवादा, बेगुसराय आणि मुजफ्फरपूरमध्येही गोळ्या घालून हत्या करण्यात आल्याच्या घटना घडल्या आहेत. त्यामुळे बिहारमधील गुन्हेगारीचा मुद्दा चर्चेच्या केंद्रस्थानी आला आहे.

### पोलिसांकडून आरोपींचा शोध सुरू

**घटनेची माहिती मिळताच पीपरा पोलिस ठाण्याचे प्रमुख आणि मसौदीचे उपायुक्त कन्हैया प्रसाद सिंह यांनी गोळीबार झालेल्या ठिकाणाला भेट दिली आणि पाहणी केली. पोलिसांनी आरोपींचा शोध सुरू केला आहे. आरोपींना लवकरच अटक करण्यात येईल, अशी माहिती पोलिस अधिकाऱ्यांनी दिली.**

# नवी दिल्लीत 'शल्यकॉन २०२५' परिषद


**वृत्तसंस्था/नवी दिल्ली**

अखिल भारतीय आयुर्वेद संस्था, नवी दिल्ली यांच्या वतीने 'शल्यकॉन २०२५' या तीन दिवसीय राष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यात आले असून, १३ ते १५ जुलै यादरम्यान सुश्रुत जयंतीनच्या औचित्याने हा परिसंवाद होणार आहे. परिषदेचे उद्घाटन १४ जुलै रोजी होणार आहे.

दरवर्षी १५ जुलै रोजी शल्यक्रियेचे जनक आचार्य सुश्रुत यांची जयंती साजरी केली जाते. शस्त्रक्रियेच्या क्षेत्रात आचार्य सुश्रुत यांनी दिलेल्या अमूल्य योगदानाच्या सन्मानार्थ, अखिल भारतीय आयुर्वेद संस्थेच्या शल्यतंत्र विभागातील डॉ. योगेश बडवे यांच्या नेतृत्वाखाली तसेच राष्ट्रीय सुश्रुत असोसिएशनच्या २५ व्या वार्षिक परिषदेमध्ये एक शैक्षणिक उपक्रम म्हणून या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

१४ जुलै रोजी होणाऱ्या उद्घाटन समारंभाला केंद्रीय आयुष राज्यमंत्री प्रतापराव जाधव हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. यावेळी आयुष मंत्रालयाचे सचिव वैद्य राजेश कोटेचा, राष्ट्रीय आयुर्वेद संस्था जयपूरचे कुलगुरू प्रा. संजीव

## आज तीन दिवसीय परिषदेचे उद्घाटन




शर्मा आणि आयुर्वेद शिक्षण व संशोधन संस्था जामनगरच्या संचालक प्रा. तनुजा नेसरी हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत.

अखिल भारतीय आयुर्वेद संस्था यंदाच्या शल्यकॉन परिसंवादात आयुर्वेदाचे मूलतत्त्वे आणि आधुनिक शस्त्रक्रिया यांचे एकत्रीकरण करण्यावर भर देण्यात येणार असून, उदयोन्मुख आयुर्वेद शल्यचिकित्सकांना एकात्मिक शस्त्रक्रिया आणि त्यासंबंधित आत्मविश्वास वाढवण्यासाठी पुढाकार घेणे, हा या उपक्रमाचा उद्देश आहे, असे अखिल भारतीय आयुर्वेद संस्थेच्या प्रभारी संचालक प्रा. मंजुषा राजगोपाला यांनी म्हटले आहे.

१३ आणि १४ जुलै रोजीच्या चर्चासत्रात थेट शस्त्रक्रिया प्रात्यक्षिके सादर केली जाणार असून , ज्यामध्ये जनरल सर्जरी, गुद-जननेंद्रिय शस्त्रक्रिया आणि मूत्रविकारांवरील शस्त्रक्रिया यांचा समावेश असेल. पहिल्या दिवशी, १० सामान्य एंडोस्कोपिक लॅप्रोस्कोपिक शस्त्रक्रिया केल्या जातील. दुसऱ्या दिवशी सोळा गुद-जननेंद्रिय शस्त्रक्रियांचे थेट प्रात्यक्षिके दिली जातील, ज्यातून सहभागी चिकित्सकांना प्रत्यक्ष अनुभव घेण्याची संधी मिळणार आहे.

नावीन्यता, एकात्मता आणि प्रेरणा या संकल्पनेवर आधारित 'शल्यकॉन २०२५' यातील कार्यक्रम पारंपरिक ज्ञान आणि आधुनिक तंत्रज्ञान यांचा संगम ठरणार आहेत. भारतासह जगभरातून सुमारे ५०० हून अधिक तज्ज्ञ शल्यचिकित्सक, संशोधक, आणि विद्वान या परिसंवादात सहभागी होणार आहेत. या कार्यक्रमात विचारांची देवाणघेवाण, वैद्यकीय प्रगतीचे प्रदर्शन आणि आयुर्वेदिक शस्त्रक्रिया पद्धतींमधील नावीन्यपूर्ण संशोधनाचा शोध घेण्यात येईल.

# मद्यधुंद कारचालकाने पाच जणांना चिरडले

**वृत्तसंस्था/नवी दिल्ली**

एका मद्यधुंद चालकाने त्याच्या आलिशान ऑडी कारने फूटपाथवर झोपलेल्या पाच जणांच्या कुटुंबांना चिरडल्याची घटना घडली आहे. जखमींमध्ये एका आठ वर्षांच्या चिमुकलीचाही समावेश आहे. तिची प्रकृती गंभीर असल्याचे सांगितले जात आहे.

पोलिसांनी मद्यधुंद चालकाला अटक केली आहे. चालक प्रॉपर्टी डिलर असून त्याचे नाव उत्सव शेखर (वय ४० वर्षे) असल्याचे सांगितले जात आहे. फूटपाथवर झोपलेले कुटुंब राजस्थानहून आले




होते. ९ जुलै रात्री सदर दुर्घटना घडली होती. जखमींमध्ये लाधी (४० वर्षे), सबमी (४५ वर्षे), नारायणी (३५ वर्षे), राम चंदर आणि बिमला (८ वर्षे) यांचा समावेश आहे. राजस्थानमधून रोजगाराच्या शोधात हे कुटुंब दिल्लीत आले होते. पाचही जणांवर उपचार सुरू असून लहान मुलीची प्रकृती चिंताजनक असल्याचे सांगितले जात आहे.

पोलिसांनी प्रत्यक्षदर्शींचे जबाब नोंदविले आहे. एका महिलेने सांगितले की, ते फूटपाथवर झोपलेले असताना एका पांढऱ्या रंगाचे वाहन अचानक फूटपाथवर आले. पाच जणांना चिरडल्यानंतर ही कार पुन्हा रस्त्यावर आली आणि २०० मीटर पुढे जाऊन एका ट्रकला तिची धडक बसली.

पोलिसांनी सांगितले की, ऑडी कार फूटपाथवर चढली, तेव्हा जखमींना स्वतःचा बचाव करायचा वेळच मिळाला नाही. गाडी अंगावरून गेल्यानंतर जखमींच्या किंकाळ्यामुळे स्थानिक लोक घटनास्थळी धावले आणि त्यांनी पोलिसांना पाचारण केले.

या अपघातानंतर आरोपीला लगेच अटक करण्यात आली. पोलिसांवर बेदरकारपणे आणि निष्काळजीपणे गाडी चालवून दुखापत केल्याचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिस उपायुक्त अमित गोयल यांनी सांगितले की, चालक अपघातावेळी मद्यधुंद अवस्थेत होता.

## मुख्यमंत्र्यांच्या बंगल्याला बॉम्बची धमकी

**तिरुअनंतपुरम :** केरळचे मुख्यमंत्री पिनारायी विजयन यांचे अधिकृत निवासस्थान बॉम्बने उडवण्याची धमकी मिळाली आहे. रविवारी थाम्पानूर पोलिस स्टेशनला ईमेलद्वारे ही धमकी मिळाली. ईमेल मिळताच पोलिस विभागात खळबळ उडाली आणि तातडीने श्वान पथक आणि बॉम्ब निकामी करणारे पथक मुख्यमंत्र्यांच्या निवासस्थानी पाठवण्यात आले.

# कर्नाटकच्या गुहेत लपली होती रशियन महिला

## दोन मुलींसह वास्तव्य, व्हिसा संपल्याने गोव्यातून गाठले गोकर्ण



**वृत्तसंस्था/गोकर्ण**

कर्नाटकच्या उत्तर कन्नड जिल्ह्यातील गोकर्ण येथील रम्य, परंतु अत्यंत धोकादायक रामतीर्थ डोंगरावर एका रशियन महिलेने तिच्या दोन लहान मुलींना घेऊन मागील दोन आठवडे एकांतवासात काढले आहेत. स्थानिक पोलिसांनी गस्तीदरम्यान ही महिला आणि तिच्या मुली एक गुहेत राहत असल्याचे आढळून आले. त्यांच्या सुरक्षेच्या दृष्टिकोनातून त्यांना तातडीने बाहेर काढण्यात आले.

या महिलेचे नाव नीना कुटिना असे असून तिचे वय ४० वर्षे इतके आहे. तिच्या दोन मुलींपैकी एकीचे नाव प्रेमा (वय ६ वर्षे) आणि दुसरीचे अमा (वय ४ वर्षे) आहे. पोलिसांनी ९ जुलै रोजी संध्याकाळी ५ वाजता या तिघांना गुहेतून शोधून काढले आणि सुरक्षितपणे खाली आणले.

नीना कुटिनाने पोलिसांना सांगितले की, ती गोव्यातून गोकर्णला आलेली असून, शहरातील गोंगाट व धकाधकीच्या जीवनापासून दूर जाऊन अध्यात्मिक साधना करण्यासाठी तिने या वनक्षेत्रात एकांतवास पत्करला होता. ती ध्यान, प्रार्थना आणि आत्मशांतीसाठी या गुहेत राहत होती.

ही गुहा रामतीर्थ टेकडीवर असून, या परिसरात जुलै २०२४मध्ये मोठे भूस्खलन झाले होते. तसेच हा परिसर विषारी साप, जंगली प्राणी आणि अपघाती धोक्यांसाठी प्रसिद्ध आहे. त्यामुळे येथे राहाणे अत्यंत धोकादायक ठरते, असे पोलिसांनी स्पष्ट केले.

महिलेच्या विनंतीनुसार पोलिसांनी तिला उत्तर कन्नड जिल्ह्यातील कुमटा तालुक्यात बंकीकोडळा गावातील एका आश्रमात हलवले आहे.

### दस्तऐवज गुहेतच आढळून आले

**नीना हिचे व्हिसा आणि पासपोर्ट हरवले असल्याचे तिने सांगितले. मात्र गोकर्ण पोलिस आणि वनविभागाच्या संयुक्त शोध मोहिमेमध्ये हे दस्तऐवज गुहेतून मिळाले. त्यानंतर जेव्हा कागदपत्रांची तपासणी करण्यात आली. त्यात कळाले की, नीना ही १७ एप्रिल २०१७ रोजीपर्यंत वैध असलेल्या व्यवसायिक व्हिसावर भारतात आली होती. तिला १९ एप्रिल २०१८ रोजीपर्यंत गोवा एफआरआरओकडून एक्झिट परमिटदेखील देण्यात आले होते. मात्र त्यानंतर तिने नेपाळला प्रवास करून ८ सप्टेंबर २०१८ रोजी पुन्हा भारतात प्रवेश केला आणि त्यानंतर ती बेकायदेशीररीत्या येथे वास्तव्य करत होती.**

# तेलंगणा सरकारकडे नक्षलवाद्यांचा युद्धबंदीचा प्रस्ताव

**वृत्तसंस्था/हैदराबाद**

केंद्र सरकारने चालवलेल्या नक्षलवादी विरोधी मोहिमेमुळे हताश झालेल्या नक्षलवाद्यांनी आता सरकारवर आरोप केले आहेत. केंद्र सरकार नक्षलवाद्यांशी चर्चेस तयार नसल्याचे माओवाद्यांच्या पॉलिट ब्युरोचा सदस्य मल्लोजुला वेणुगोपाल उर्फ भूपती याने म्हटले आहे. केंद्र सरकारच्या कठोर भूमिकेमुळे घाबरगुंडी उडालेल्या नक्षलवाद्यांनी आता तेलंगणातील काँग्रेस सरकारपुढे युद्धबंदीचा नवा प्रस्ताव दिला आहे.

यासंदर्भात माओवाद्यांच्या पॉलिट ब्युरो या सर्वोच्च समितीचा सदस्य मल्लोजुला वेणुगोपाल उर्फ अभय उर्फ सोनू उर्फ भूपती याने नवे पत्र जारी केले आहे. या पत्रात भूपती म्हणाला की, केंद्र सरकार पाकिस्तानशी चर्चा करू शकते, ईशान्यकडील दहशतवाद्यांशी चर्चा करून युद्धबंदी जाहीर करू शकते. मात्र आदिवासी आणि त्यांच्या संघर्षाचे नेतृत्व करणाऱ्यांशी (माओवाद्यांशी) चर्चा करण्यास तयार नाही, असा आरोप करीत माओवाद्यांनी आता फक्त तेलंगणा सरकारसोबत युद्धबंदीचा नवा प्रस्ताव दिला आहे. सर्वच बाजूने कोंडीत सापडलेल्या माओवाद्यांनी आता चर्चेची शक्कल लढवली आहे.

या संदर्भातील पत्रात भूपती म्हणाला की, केंद्र सरकार पाकिस्तानशी चर्चा करू शकते. मात्र आदिवासी आणि त्यांच्या संघर्षाचे नेतृत्व करणाऱ्यांशी चर्चा करण्यात केंद्र सरकारला रस नाही. त्यामुळे आता तेलंगणा सरकारने आमच्याशी युद्धबंदी करावी, असे पत्रात म्हटले आहे.

# मोफत वीज देण्यास वित्त विभागाचा नकार

## ऊर्जा विभागाचा १०० युनिटपर्यंत मोफत वीज देण्याचा प्रस्ताव

**वृत्तसंस्था/पाटणा**

बिहार सरकारच्या वित्त विभागाने प्रत्येक कुटुंबाला दरमहा १०० युनिट मोफत वीज देण्याच्या कोणत्याही प्रस्तावाला सहमती देण्यास नकार दिला आहे. वित्त विभागाने एक प्रेस रिलीज जारी करून म्हटले आहे की, माध्यमांमध्ये १०० युनिट मोफत वीज चालविल्याचे वृत्त खोटे आणि दिशाभूल करणारे आहे.

शनिवारी सकाळी राज्य सरकार मोफत वीज योजना आणणार असल्याची बातमी आली होती. त्यात म्हटले होते की, राज्यातील सर्व कुटुंबांना त्याचा लाभ मिळेल. ऊर्जा विभागाने १०० युनिटपर्यंत मोफत वीज देण्याचा प्रस्ताव तयार केला आहे. त्याला वित्त विभागाकडून हिरवा कंदील मिळाला आहे. नवीन योजनेअंतर्गत, ग्राहकांना १०० युनिटपर्यंतच्या विजेसाठी कोणतेही शुल्क द्यावे लागणार नाही. परंतु जर वापर १०० युनिटपेक्षा जास्त असेल तर अतिरिक्त युनिटसाठी सामान्य दराने शुल्क भरावे लागेल.

आता मोफत वीज मिळण्याचा आनंद निराशेत बदलला आहे. या प्रस्तावावर वित्त विभागाने लाल फुली मारली आहे. हे वृत्त खोटे असल्याचे वित्त विभागाने म्हटले आहे.

मुख्यमंत्री नितीश कुमार यांनी बिहार विधानसभेच्या अधिवेशनात सांगितले होते की, आम्ही राज्यातील लोकांना मोफत नव्हे तर परवडणाऱ्या दरात वीज देण्याच्या बाजूने आहोत. आम्ही लोकांना सर्वात कमी दरात वीज देत आहोत. वीज ग्राहकांना दिलासा देण्यासाठी आम्ही अनुदान देत आहोत, असे ते म्हणाले. मोफत वीज देणे योग्य नाही, असे ते म्हणाले होते.

# पृथ्वीवर परतल्यानंतर अंतराळवीर सात दिवस पुनर्वसनात राहणार

## १५ जुलैला सहकाऱ्यांसोबत अंतराळातून कॅलिफोर्नियात उतरणार

**वृत्तसंस्था/नवी दिल्ली**

भारतीय अंतराळवीर शुभांशु शुक्ला आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकावरून (आयएसएस) १५ जुलै रोजी पृथ्वीवर परत येऊ शकतात. शुभांशु आणि त्यांचे तीन सहकारी अंतराळवीर १४ जुलै रोजी आयएसएसवरून रवाना होतील. पृथ्वीवर परतल्यानंतर, ते सात दिवसांच्या पुनर्वसन प्रक्रियेतून जातील. अंतराळातील शून्य गुरुत्वाकर्षणानंतर पृथ्वीच्या गुरुत्वाकर्षणाशी शरीराला जुळवून घेण्यासाठी ही पुनर्वसन प्रक्रिया आवश्यक आहे. पुनर्वसनादरम्यान, शुभांशु फ्लाइट सर्जनच्या देखरेखीखाली राहतील.

ॲक्सिओम स्पेसच्या ॲक्सिओम-४ मिशनअंतर्गत, शुभांशु तीन सहकारी अंतराळवीरांसह, ज्यामध्ये



पोलंडचे स्लावोस्ज उज्नान्स्की-विस्नीवस्की, हंगेरीचे टिबोर कापू आणि मिशन कमांडर, अमेरिकी अंतराळवीर पेगी व्हिटसन यांच्यासोबत २६ जून रोजी आयएसएसवर पोहोचले होते. आयएसएसवर या अंतराळवीरांनी अनेक प्रयोग केले आहेत.

नासाने सांगितले की, नियोजित कार्यक्रमानुसार, अंतराळवीरांसह ड्रॅगन अंतराळयान सोमवार, १४ जुलै रोजी भारतीय वेळेनुसार सायंकाळी ४.३५ वाजता आयएसएसवरून वेगळे होणार आहे. शुभांशु आणि इतर तीन अंतराळवीर भारतीय वेळेनुसार दुपारी २.२५ वाजता अंतराळयानात बसतील. आयएसएस २८ हजार किलोमीटर प्रतितास वेगाने पृथ्वीची परिक्रमा करत आहे.

अंतराळयान स्वयंचलितपणे आयएसएसवरून वेगळे होण्याची प्रक्रिया सुरू करेल, जेणेकरून हळूहळू वेग कमी होईल आणि कॅलिफोर्नियामध्ये पाण्यात उतरण्यासाठी (स्प्लॅशडाउन) पृथ्वीच्या वातावरणात पुन्हा प्रवेश करू शकेल. अंतराळयान ५८० पाउंडपेक्षा जास्त सामान घेऊन परत येईल, ज्यात नासाचे हार्डवेअर आणि संपूर्ण मोहिमेदरम्यान केलेल्या ६० पेक्षा जास्त प्रयोगांचा डेटा असेल.

इस्त्रोच्या मते, अनडॉकिंगनंतर, अंतराळयान १५ जुलै रोजी दुपारी तीन वाजता कॅलिफोर्नियाच्या किनाऱ्याजवळ पृथ्वीवर उतरण्याची शक्यता आहे. शुभांशु १८ दिवस आयएसएसवर राहिल्यानंतर पृथ्वीवर परततील.

इस्त्रोने म्हटले आहे की, गगनयात्री शुभांशु यांची प्रकृती उत्तम आहे आणि त्यांचे मनोबलही उंच आहे. इस्त्रोचे फ्लाइट सर्जन सतत त्यांच्या आरोग्यावर आणि फिटनेसवर लक्ष ठेवून आहेत.

### थेट प्रक्षेपण होणार

**ॲक्सिओम मिशन -४अंतर्गत अंतराळात गेलेल्या अंतराळवीरांच्या परतण्याच्या वेळी, अंतराळयान आयएसएसवरून वेगळे होण्याच्या प्रक्रियेचे थेट प्रक्षेपण केले जाईल. नासाने ही घोषणा केली. हे प्रक्षेपण नासा+ वर प्रसारित केले जाईल. आयएसएसवर वास्तव्याच्या १७व्या दिवशी, शुभांशु यांनी दीर्घकालीन मोहिमांमध्ये जीवनास आधार देण्याच्या सुक्ष्म शैवालच्या क्षमतेचा अभ्यास केला.**

### गगनयान मोहिमेसाठी अनुभव महत्त्वाचा

**इस्त्रोने शुभांशु यांच्या आयएसएस प्रवासासाठी सुमारे ५५० कोटी रुपये दिले आहेत. या प्रवासातून मिळालेला अनुभव इस्त्रोला त्यांच्या मानवी अंतराळ मोहीम, 'गगनयान'ला प्रत्यक्षात आणण्यास मदत करेल. गगनयान २०२७ मध्ये प्रक्षेपित होण्याची शक्यता आहे.**

# अमरनाथ यात्रेत दहाव्या दिवशी १९,०२० भाविक सहभागी

**श्रीनगर :** पवित्र अमरनाथ यात्रेचा दहावा दिवस भाविकांच्या उत्साहाने उजळून निघाला. शनिवारी एकूण १९ हजार २० यात्रेकरूंनी बर्फाच्या शिवलिंगाचे दर्शन घेतले असून, आतापर्यंत एकूण १.८३ लाखाहून अधिक भक्तांनी अमरनाथ गुहेत दर्शन घेतले आहे. ही यात्रा ३ जुलैपासून सुरू झाली असून ती ९ ऑगस्टपर्यंत चालणार आहे. दरम्यान, बारावा जथ्था रविवारी सकाळी जम्मू येथून रवाना झाला. ७ हजार ४९ यात्रेकरू भगवती नगर बेस कॅम्प येथून पुढील प्रवासासाठी निघाले. या तुकडीत १,४२३ महिला, ३१ मुले आणि १३६ साधू-साध्वी यांचा समावेश आहे. अधिकाऱ्यांच्या माहितीनुसार, यंदा अमरनाथ यात्रेसाठी चार लाखांहून अधिक भाविकांनी पूर्वनोंदणी केली आहे.

# दलाई लामा पोहोचले लडाखमध्ये



**वृत्तसंस्था/लेह**

तिबेटी धार्मिक नेते दलाई लामा शनिवारी त्यांच्या एक महिन्याच्या वास्तव्यासाठी लडाखला पोहोचले. लेहमधील दमण आणि सुरनाच्या पारंपारिक सुरांवर नाचणाऱ्या अनुयायांनी दलाई लामा यांचे भव्य स्वागत केले.

दलाई लामा यांच्या आगमनासाठी लेह विमानतळापासून जिवेत्सलपर्यंत रस्त्याच्या कडेला त्यांचे चाहते मोठ्या संख्येने जमले होते. त्यांच्याकडे पुष्पगुच्छ होते. त्यांनी धार्मिक नेत्याच्या सन्मानार्थ झेंडेही फडकावले.

तत्पूर्वी, लेह विमानतळावर पोहोचल्यावर, लेह ऑटोनॉमस हिल डेव्हलपमेंट कौन्सिलचे अध्यक्ष आणि सल्लागार तसेच वरिष्ठ पोलिस व प्रशासन अधिकाऱ्यांनी दलाई लामा यांचे स्वागत केले. त्यांना पारंपारिक खटका देण्यात आला. येथून पूर्ण सुरक्षेत दलाई लामा वाहनातून त्यांच्या निवासस्थानाकडे रवाना झाले.

# अर्थ-उद्योग

## तीन दिवसांत सोने १५,३०० रुपयांनी महागले



**मुंबई :** भारतात १० जुलै ते १२ जुलै या कालावधीत सलग तीन दिवस सोन्याच्या किमतीत वाढ झाली आहे. या तीन दिवसांत २४ कॅरेट सोन्याच्या किमतीत १५,३०० रुपयांची मोठी वाढ झाली आहे. या काळात चांदीच्या किमतीतही वाढ झाली आहे. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी अनेक देशांवर कर लादल्यानंतर सोने आणि चांदीच्या किमती वाढल्या आहेत. ट्रम्प यांनी लादलेला नवीन कर दर १ ऑगस्टपासून लागू होईल. १४ जुलै ते २० जुलै या कालावधीत, अमेरिकन व्याजदर आणि डॉलर कमकुवत होण्याची शक्यता यांचा परिणाम सोन्याच्या किमतीवर दिसून येतो. पुढील आठवड्यात, सोने आणि चांदी अनुक्रमे ९४ हजार-१ लाख, २ हजार आणि १ लाख ५ हजार - १ लाख १८ हजारांच्या श्रेणीत व्यवहार करू शकतात. सध्या देशात २४ कॅरेट सोन्याची किंमत प्रति ग्रॅम ९,९७१ रुपये आहे. त्याच वेळी, त्याच संख्येच्या ग्रॅमच्या २२ कॅरेट सोन्याची किंमत ९,१४० रुपये आहे. १८ कॅरेट सोन्याची (ज्याला ९९९ सोने असेही म्हणतात) किंमत ७,४७९ रुपये प्रति ग्रॅम आहे. १२ जुलै रोजी २४ कॅरेट सोन्याच्या १०० ग्रॅम आणि १० ग्रॅमच्या किमतीत अनुक्रमे ७,१०० आणि ७१० रुपयांची वाढ झाली. कालच्या तुलनेत सोन्याच्या भावात कोणताही बदल झालेला नाही. मुंबई, कोलकाता, बंगळुरू, हैदराबाद, केरळ आणि पुणे यासारख्या शहरांमध्ये २४ कॅरेट सोन्याचा भाव प्रति ग्रॅम ९९७१ रुपये आहे. त्याच वेळी, २२ कॅरेट सोन्याचा भाव प्रति ग्रॅम ९१४० रुपये आहे. या शहरांमध्ये आज १८कॅरेट सोन्याचा भाव ७४७९ रुपये आहे. मुंबई, दिल्ली, कोलकाता, बंगळुरूमध्ये चांदीचा दर १,१५,००० रुपये प्रति किलो आहे. चेन्नई, हैदराबाद आणि केरळमध्ये हा दर १,२५,००० रुपये प्रति किलो आहे. हा दर कालच्यासारखाच आहे

## कर्मचारी म्हणून 'एआय'चा वापर करावाच लागेल - विजय शर्मा

**नवी दिल्ली :** पेटीएमचे संस्थापक विजय शेखर शर्मा यांनी म्हटले आहे की, आर्टिफिशियल इंटेलिजेंस (एआय) चा नोकऱ्यांवर होणारा परिणाम आता टाळणे अशक्य आहे. दिल्लीतील एका एआय कार्यक्रमादरम्यान त्यांनी सांगितले की, लवकरच किंवा नंतर आपल्याला कर्मचारी किंवा सीएफओ म्हणून एआयचा वापर करावा लागेल. शर्मा यांनी मान्य केले की, भविष्यात मानव करत असलेली अनेक कामे एआय करेल, परंतु त्याच वेळी ते नवीन प्रकारच्या नोकऱ्या आणि भूमिका देखील निर्माण करेल. एआयमुळे नवीन नोकऱ्याही निर्माण होतील. विजय शेखर शर्मा यांनी मान्य केले की, एआय अनेक नियमित नोकऱ्या स्वयंचलित करेल, ज्यामुळे काही लोकांच्या नोकऱ्या जातील. परंतु त्यांनी असेही म्हटले की प्रत्येक तंत्रज्ञानातील बदलाप्रमाणे, एआयदेखील नवीन नोकऱ्या आणि भूमिका आणेल, विशेषतः डेटा सायन्स, मशीन लर्निंग आणि इंटेलिजेंट सिस्टम्ससारख्या क्षेत्रात. एसटीडी-पीसीओ व्यवसायाचे उदाहरण देताना शर्मा म्हणाले की, ज्याप्रमाणे मोबाईल-इंटरनेटने त्यांची जागा घेतली, त्याचप्रमाणे एआयदेखील बदल घडवून आणेल.

## पेटीएम नवीन एआय फीचर आणणार

**नवी दिल्ली :** पेटीएम आता फक्त एक फिनटेक कंपनी राहू इच्छित नाही, तर एआय-फर्स्ट कंपनी बनण्याच्या दिशेने वाटचाल करत आहे. कंपनी त्यांच्या नियमित व्यवसाय प्रक्रियेत एआयचा वेगाने समावेश करत आहे. शर्मा म्हणाले, आपल्याला एआयचा वापर केवळ एक साधन म्हणून न करता सहकर्मी किंवा कार्यकारी म्हणून करायला शिकले पाहिजे, असे पेटीएमचे संस्थापक विजय शेखर शर्मा यांनी म्हटले आहे. पेटीएम नवीन एआय फीचर आणणार आहे. पेटीएम आपल्या वापरकर्त्यांसाठी एआय-चालित पासबुक फीचर आणत आहे, ज्यामध्ये वापरकर्त्यांच्या मासिक खर्चाचा डेटा घेऊन एक रॅप गाणे तयार केले जाईल. हे फीचर लवकरच लाँच केले जाईल, जे फायनान्स मॅनेजमेंटला मजेदार बनवेल. यापूर्वी, पेटीएमने अमेरिकेतील एआय स्टार्टअप पर्प्लेक्सिटीच्या सहकार्याने त्यांच्या ॲपमध्ये एआय सर्च फीचर देखील जोडले होते. पेटीएमची सुरुवात २००९ मध्ये झाली. पेटीएमची मूळ कंपनी वन९७ कम्युनिकेशन्सने ऑगस्ट २००९ मध्ये पेटीएम पेमेंट ॲप लाँच केले. त्याचे संस्थापक विजय शेखर शर्मा आहेत. सध्या देशात पेटीएमचे ३० कोटींहून अधिक वापरकर्ते आहेत. पेटीएमचे मार्केट कॅप सुमारे २८ हजार कोटी रुपये आहे.

## कमी व्याजदराने मिळतेय कार कर्ज

**मुंबई :** युनियन बँक ७.९ टक्के व्याजदराने देत आहे. लोन, कर्ज घेताना त्याचा कालावधी लक्षात ठेवा. सर्वप्रथम तुम्हाला हे जाणून घेणे महत्त्वाचे आहे की कोणती बँक कोणत्या व्याजदराने कर्ज देत आहे. स्टेट बँक ऑफ इंडिया म्हणजेच एसबीआय सध्या ९.१०टक्के वार्षिक व्याजदराने कार कर्ज देत आहे. तर युनियन बँक ऑफ इंडियाचा व्याजदर ७.९ टक्क्यापासून सुरू होतो. देशातील प्रमुख बँका कोणत्या व्याजदराने कार कर्ज देत आहेत ते आम्ही तुम्हाला सांगत आहोत. जर तुम्ही जास्त काळासाठी कर्ज घेतले तर तुम्हाला जास्त व्याज द्यावे लागेल, शक्य तितक्या कमी कालावधीसाठी कर्ज घ्यावे, कर्ज जास्त लांबवू नये. सहसा कार कर्ज जास्तीत जास्त ८ वर्षांसाठी घेता येते, परंतु जर तुम्ही जास्त कालावधीसाठी, म्हणजे ७ ते ८ वर्षांसाठी कर्ज घेतले तर जास्त व्याजदराने कर्ज दिले जाते. हा व्याजदर अल्पकालीन कर्जाच्या (३ ते ४ वर्षे) व्याजदरापेक्षा ०.५० टक्क्यापर्यंत जास्त असू शकतो.

## कर्जाचा व्याजदर क्रेडिट स्कोअरवर अवलंबून

मुंबई : कारकर्जाचा व्याजदर तुमच्या क्रेडिट स्कोअरवर देखील अवलंबून असतो. जर क्रेडिट स्कोअर चांगला असेल तर सहज आणि कमी व्याजदराने कर्ज मिळण्याची शक्यता असते. याशिवाय, बँका सामान्यतः नियमित उत्पन्न स्रोत असलेल्यांना कमी व्याजदराने कर्ज देतात. यासाठी कर्ज घेताना या ३ गोष्टी लक्षात ठेवा. प्री-क्लोजर दंडांकडे लक्ष द्या, कार कर्ज घेताना, ज्या बँकेकडून कर्ज घेत आहात ती बँक प्री-क्लोजर पेनल्टी आकारते का ते तपासावे. प्री-क्लोजर म्हणजे मुदतीपूर्वी कर्जाची रक्कम भरणे. सर्व बँकांसाठी दंडाचे दर सारखे नसतात. म्हणून बँक सुज्ञपणे निवडा. अशा बँकांचा विचार करा ज्या एकतर पेनल्टी आकारत नाहीत किंवा खूप कमी रक्कम आकारतात.

## स्मार्टवॉच सांगेल तुम्ही गर्भवती आहात की नाही

मुंबई : आता मनगटावर बांधलेले स्मार्टवॉच केवळ फिटनेस ट्रॅक करणार नाही, तर गर्भवती आहात की नाही हे देखील सांगेल. अल१कडच्या एका अभ्यासात, गोळा केलेल्या डेटाच्या मदतीने एक नवीन आर्टिफिशियल इंटेलिजन्स वैशिष्ट्य तयार करण्यात आले आहे, जे ९२ टक्के अचूकतेने गर्भधारणा ओळखू शकते. हे वैशिष्ट्य ॲपलच्या आगामी स्मार्टवॉचमध्ये पाहता येईल. ॲपलने युनिव्हर्सिटी ऑफ सदर्न कॅलिफोर्नियाच्या सहकार्याने एक विशेष एआय वैशिष्ट्य तयार केले आहे, ज्याचे नाव वेअरेबल बिहेवियर मॉडेल आहे. हे वैशिष्ट्य ॲपल वॉच आणि आयफोनमधून मिळवलेल्या वर्तनात्मक डेटा वापरते. या डेटाचे विश्लेषण मशीन लर्निंग वापरून केले जाते आणि गर्भधारणेसारख्या आरोग्य स्थिती ९२ टक्के अचूकतेने ओळखल्या जाऊ शकतात. ॲपलने आधीच त्यांच्या घड्याळात मासिक पाळी ट्रॅकिंग आणि आरोग्य देखरेख यासारख्या सुविधा दिल्या आहेत. २०२४ मध्ये, प्रेग्नन्सी ट्रॅकिंगचे फीचर देखील त्यात जोडले गेले. आता या नवीन एआय फीचरसह, पुढील ॲपल वॉचमध्ये प्रेग्नन्सी डिटेक्शन फीचर अधिकृतपणे येण्याची शक्यता आहे. सध्या, ॲपलची वॉच सिरीज १० आणि वॉच अल्ट्रा २ बाजारात उपलब्ध आहेत.

### आरोग्यमंत्र

# फळं खा सालीसह

विविध फळांच्या सालींमध्ये बरीच पोषणमूल्यं असतात. ठरावीक फळं सालीसकट खाल्ल्याने जास्त लाभ मिळू शकतात. याविषयी...



❖ सफरचंदाची साल काढू नयेत. सफरचंद अँटीऑक्सिडंट्स आणि सायटोन्यूट्रियंट्सनी युक्त असतं. सफरचंदाच्या सालीतले अँटीऑक्सिडंट्स अल्झायमरसारख्या विकारात गुणकारी मानले जातात. या फळाच्या सालीत फायबर आणि जीवनसत्त्वं असतात. सफरचंदाच्या सालीत ट्रिटेपॅनॉइड्स नावाचा घटक असतो. यामुळे कॅन्सरचा धोका बराच कमी होतो.

❖ पिअरच्या सालीत फायबर आणि महत्त्वाचे पोषक घटक असतात. पिअरमधलं अर्ध्यापेक्षा जास्त फायबर सालीत असतं. यासोबतच सालींमध्ये अँटीऑक्सिडंट्स आणि सायटोन्यूट्रियंट्ससारख्या घटकांचं प्रमाणही जास्त असतं.

❖ चिकू सालासह खाल्ला पाहिजे. चिकूच्या सालीत पोटॅशियम, लोह, फॉलेट आणि पँथोथेनिक ॲसिड हे घटक असतात. यामुळे पचनसंस्थेचं कार्य सुरळीत सुरू राहतं.

❖ प्लम म्हणजे आलूबुखारच्या सालीत क्लोरोजेनिक ॲसिड असतं. हा क जीवनसत्त्वाचा प्रमुख स्रोत मानला जातो. प्लम सालीसकट खाल्ल्याने बद्धकोष्टता आणि पचनसंस्थेशी संबंधित विकार दूर होण्यास मदत होते.

❖ किवी या फळाची साल काढली जात असली तरी प्रत्यक्षात ती खाता येते. सालीसकट खाल्ल्याने हे फळ अधिक लाभदायी बनतं. यामुळे तिपटीने फायबर मिळतं.

# हवे मोकळे संभाषण

### संगोपन



अलीकडेच शाळेत जायला लागलेली पाच वर्षांची रिया खोटं बोलायला शिकली आहे. हे पाहून तिची आई काळजीत पडली. खरं तर या वयात मुलं नव्या जगात प्रवेश करत असतात. अशा वेळी अनेकदा इतर मुलांकडून धडे घेत खोटं बोलू लागतात. अशा परिस्थितीत पालकांनी मुलांशी अत्यंत हळूवारपणे संवाद साधणं गरजेचं आहे.

❖ **मुलं खोटं का बोलतात?**

काही पालक मुलांना नेहमी हे करू नको, ते करू नको असं सांगत असतात. अशा वेळी मुलांमध्ये पालकांनी करू नको म्हणून सांगितलेलं काम करून पाहण्याची उत्सुकता निर्माण होते. उत्कंठा शमवण्याचा प्रयत्न केल्यास पालक रागवतील या भीतीने मुलं खोटं बोलतात. त्यामुळे एखादी कृती चुकीची आहे हे मुलांना समजवताना ती का चुकीची आहे आणि ते केल्यास त्याचा काय परिणाम होऊ शकतो, हे देखील समजावून सांगावं. रागावण्याऐवजी समजून सांगण्यावर भर द्यावा.

## वेगळे काही

रांचीहून टोरीला जाणारी पॅसेंजर ट्रेन लोहरदगा स्थानकानंतर एका स्थानकावर थांबते. पण या स्थानकाला नावच नाही. २०११ मध्ये हे स्थानक कमले या गावाच्या जमिनीवर बांधण्यात आलं. त्यामुळे स्थानकाला कमले नाव द्यावं अशी इथल्या ग्रामस्थांची मागणी आहे. इथल्या लोकांनी आपली जमीन स्थानकासाठी दिली. त्यामुळे रेल्वेने दिलेलं बडकीचांपी हे नाव इथल्या लोकांना मान्य नाही. मध्यंतरी नाव देण्याचा प्रयत्न झाला. बडकी असं नाव लिहिलं गेलं. पण कमलेच्या ग्रामस्थांना याची माहिती मिळाल्यानंतर सर्वांनी मिळून हे काम थांबवलं.

### फॉरवर्ड्स

**नाराजगी भीं एक खूबसूरत रिश्ता हैं...**
**जिससें होतीं हैं... वों दिल और दिमाग दोनों में रहतां हैं...!**

### दिनवेध

- १८५६ : समाजसेवक गोपाळ गणेश आगरकर यांचा जन्म.
- १९१०: टॉम अँड जेरीची चित्रे काढणारा चित्रकार विल्यम हॅना यांचा जन्म.
- १९१७: संगीतकार रोशनलाल नागरथ ऊर्फ रोशन यांचा जन्म.
- १९२० : महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री शंकरराव चव्हाण यांचा जन्म.
- १९३६ : भारतीय वंशाचे लेखक आणि विद्वान धन गोपाळ मुखर्जी यांचे निधन.
- १९७५ : संगीतकार मदनमोहन यांचे निधन.

### फोकस...



संगीतकार मदनमोहनच्या पहिल्या आँखें या चित्रपटामध्ये लताची गाणी नाहीत. पण त्यानंतर लताने जेव्हा-जेव्हा लाईव्ह शोज केले, तेव्हा तेव्हा ती मदनची गाणी गायची, तेव्हा त्यास सर्वाधिक प्रतिसाद मिळत असे. लग जा गले आणि खेलो ना मेरे दिल से या गाण्यांच्या कंपोझिशन्स ऐकून एड वेल्चदेखील प्रभावित झाला होता. रॉयल अल्बर्ट हॉल येथील लताच्या गाजलेल्या शोमध्ये रेन ऑर्केस्ट्राचा सहभाग होता आणि त्याचा कंडक्टर वेल्च होता. २५ जून १९२४ला मदनमोहन यांचा जन्म बगदादमध्ये झाला, हे फार कमी लोकांना माहिती असेल. अर्थात आज ते हयात असते आणि इराकमध्येच असते, तर त्यांना नागरिकत्व कायद्याचा लाभ झाला असता का, असा प्रश्न विचारता येईल.दो भाई या चित्रपटातील गीताचे गाजलेले मेरा सुंदर सपना बीत गया, हे गाणे सचिनदेवच्या नावावर असले, तरी त्याची चाल ही मदनने रचलेली आहे. मदन त्यावेळी सचिनदांचा असिस्टंट होता. शबिस्तान या सिनेमाच्या शूटिंगच्या वेळी त्यातील नट श्याम हा घोड्यावरून पळत असतानाच्या शॉटमध्ये पडून चित्रीकरणाच्या वेळी मृत्यू पावला. शबिस्तानचे संगीत दिग्दर्शन सी.रामचंद्र करत होते. परंतु त्यानंतर निर्मात्यांशी त्यांचा वाद झाला आणि मग मदनमोहनने राहिलेले काम पूर्ण केले. संगीतकार श्यामसुंदरचे निधन झाल्यानंतर अलिफ-लैला चित्रपटाचे कामही मदनने पूर्ण केले आणि त्याचे कोणतेही श्रेय घेतले नाही. भाई-भाई या चित्रपटातील, ऐ दिल मुझे बता दे, मेरा नाम अब्दुल रहमान, कदर जाने ना, मेरा छोटासा देखो ये संसार है, दिल तेरी नजर में अटका रे ही त्यातली एक से एक बेहतरीन गाणी. मदनमोहनचा बॉक्स ऑफिसवर झालेला हा पहिला हिट सिनेमा. कदर जाने ना ऐकून बेगम अख्तरने मदनला टेलिफोन करून त्याचे खूप कौतुक केले आणि त्याला हे गाणे म्हणून दाखवायला सांगितले. मदनने टेलिफोनवरून तिला हे गाणे गाऊन दाखवले. एकदा ऐकून समाधान होईना, त्यामुळे मदनने पुन्हा-पुन्हा गाऊन दाखवले. संगीतकार मदनमोहन यांचे १४ जुलै १९७५ रोजी निधन झाले.

- १९९३ : करवीर संस्थानच्या महाराणी श्रीमंत विजयमाला राणीसाहेब यांचे निधन.
- २००३ : हिंदी चित्रपट अभिनेत्री लीला चिटणीस यांचे निधन.
- २००३ : राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे चौथे सरसंघचालक प्रो. राजेंद्र सिंग ऊर्फ रज्जू भैय्या यांचे निधन.
- २०१५ : सट्टेबाजांशी असणाऱ्या संबंधांवरून गुरुनाथ मयप्पन आणि राज कुंद्रा यांच्यावर तहहयात बंदी घालण्यात आली.
- २०१८ : लोकसभेच्या आगामी निवडणुकीचा विचार करत बिहारमधील दारुबंदीचा कडक कायदा काहीसा शिथिल करण्यात आला.

# व्हा इन्फर्मेशन मॅनेजर

### कोण होणार?



सध्याच्या डिजिटल युगात लायब्ररियन्स इर्नमेशन मॅनेजर झाले आहेत. तुम्हीही इर्नमेशन मॅनेजर बनू शकता.

❖ पुस्तकं सर्व्हरवर योग्य पद्धतीने मांडणं, इंटरनेट सुरक्षेविषयीचं ज्ञान इर्नमेशन मॅनेजरला असायला हवं. लायब्ररी मॅनेजरकडे माहितीच्या सर्व स्रोतांची योग्य मांडणी असायला हवी. लायब्ररीशी संबंधित साधनसामुग्रीचं व्यवस्थापन जमायला हवं.

❖ या क्षेत्रात येण्यासाठी वाचनाची आणि लोकांना भेटण्याची आवड हवी. कमी पैशांमध्ये जास्तीत जास्त पुस्तकांचा संग्रह करायला जमायला हवं. नव्या सॉफ्फ्टवेअरची माहितीही हवी.

❖ लायब्ररी सायन्समध्ये डिप्लोमा तसंच पीएच. डी.पर्यंत विविध अभ्यासक्रम करता येतात. इतर विषयात पदवी मिळवल्यानंतरही लायब्ररी सायन्सचा अभ्यासक्रम पूर्ण करता येईल. डिस्टन्स लर्निंगचा पर्यायही आहे. हा अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर सरकारी लायब्ररी, विद्यापीठं, राजकीय दूतावास, फिल्म लायब्ररी, माहिती केंद्र अशा ठिकाणी नोकरी मिळू शकते.

# सागराधिष्ठित कारकीर्द

### करिअरवाटा



व्यवसाय-धंद्याचा विचार करताना जमिनीवरील, शेतीशी संबंधित व्यवसाय डोळ्यापुढे येतात. मात्र या दृष्टीने समुद्राकडे पाहणंही लाभदायक ठरू शकतं. हे जाणून घेऊन अनेक संधींचा स्रोत असणाऱ्या समुद्राकडे गांभीर्याने पाहण्याची आवश्यकता आहे. आपल्या देशाला समृध्द अशा सागरी किनाऱ्याची देणगी लाभली आहे. समुद्रात जलचरांबरोबरच अनेक प्रकारची संपत्ती आहे.

मुख्य म्हणजे समुद्राच्या तळाशी नेमकं काय-काय आहे याचा अद्यापही नेमकेपणाने शोध लागलेला नाही. दुसरी बाब म्हणजे समुद्राची खोली सगळीकडे एकसारखी नाही. काही ठिकाणी तो उथळ म्हणजे दीड किलोमीटर खोल आहे तर त्याची सर्वाधिक खोली सहा किलोमीटर आहे. या पृथ्वीचा दोन तृतीयांश भाग समुद्रानं व्यापला आहे. परंतु त्याच्या क्षमतेच्या मानानं फार कमी अभ्यास झालेला असून पर्यायाने त्यावर आधारित रोजगार निर्मितीही मर्यादित आहे. समुद्र किनाऱ्यालगतच्या भागात मत्स्यव्यवसायाला चांगला वाव मिळतो. वाढती नैसर्गिक संकट तसंच अन्य कारणांमुळे हा व्यवयाय अडचणीत आल्यासारखा दिसतो. परंतु यातील संधींचा विचार करणं लाभदायक ठरतं यात शंका नाही.

### हे गुणगुणा

## स्वादिष्ट मटार हलवा

हलवा म्हटलं की गाजर अथवा दुधीचाच विचार न करता काही वेगळं ट्राय करायचं तर मटारचाही वापर करता येईल.

साहित्य - मटारचे दाणे (उकडून मॅश केलेले), ४-५ कोवळ्या मटारची सालं, एक वाटी साखर, एक टेबलस्पून तूप, बदामाचे काप, काजूचे काप, पिस्त्याचे काप, दोन टेबलस्पून बेसन, वेलदोड्याची पूड, अर्धी वाटी खवा इत्यादी.

कृती - सर्वप्रथम साखर पाण्यात उकळवून पाक बनवून घ्यावा. मटारच्या सालीच्या शिरा काढून घ्याव्यात. बारीक तुकडे करून पाकात बुडवून घ्यावेत. दुसरीकडे बदाम, काजू आणि पिस्ते तुपात भाजून घ्यावेत. थोडासा भुरा रंग आला की त्यात बेसन टाकावं. बेसन लालसर रंगावर भाजून घ्यावं. यात मॅश केलेले मटार मिसळून घ्यावेत. हे मिश्रण चार ते पाच मिनिटं मंद आचेवर परतून घ्यावं. त्यात वेलदोड्याची पूड टाकावी. सर्व मिश्रण एकत्रित करावं. आता या मिश्रणात खवा टाकावा. पाच मिनिटं परतावं. आता मटारची सालं घातलेला पाक या मिश्रणात मिसळावा. मिश्रण तीन ते चार मिनिटं परतावं आणि गॅस बंद करावा. गरमागरम सर्व्ह करावं.



### पंचांग

**सोमवार, १४ जुलै २०२५**
विश्वावसूनाम संवत्सर, शके १९४७, आषाढ कृ. ४, नक्षत्र : धनिष्ठा
चंद्रराशी : कुंभ, योग : आयुष्मान
सूर्योदय : ६.११, सूर्यास्त : ७.१८

### खेचाखेची

## आटा ढिला

सौ. काळे आणि सौ. वर्मा या दोघींमध्ये वादावादी झाली. मला विषय कळला नाही.
मी बायकोला विचारलं तर ती म्हणाली, काही नाही हो,
मिसेस वर्मांनी कणिक सैल भिजवली होती.
पण म्हणून एवढे भांडण ?
म्हणून नाही हो. काळे बाईंनी ते मिसेस वर्मांना हिंदीत सांगितलं.
म्हणजे, असं काय सांगितलं?
त्या मिसेस वर्मांना म्हणाल्या,
आपका आटा ढिला हैं ..

# राशिभविष्य

**मेष**
नवे करार मार्गी लागतील. कार्यातील सातत्य कामी येईल. खर्च वाढला तरी प्राप्तीही तशीच राहील.

**वृषभ**
गुंतवणुकीला चालना मिळेल. ज्येष्ठांच्या प्रकृतीस त्रास संभवतो. नोकरीत वरिष्ठांची मर्जी राखावी.

**मिथुन**
कामाचा उत्साह वाढेल. महत्त्वाच्या भेटी लाभदायक ठरतील. बेरोजगारांना दिलासा मिळेल.

**कर्क**
आर्थिक बाबतीत तडजोडीचं धोरण ठेवावं. व्यवसाय साधारण राहील. नातलगांचं सहकार्य राहील.

**सिंह**
प्रगतीच्या नव्या संधी लाभतील. छोटा-मोठा प्रवास घडेल. वास्तुदोषांवर वेळीच उपाय करावेत.

**कन्या**
रखडलेली कामं मार्गी लागतील. भावनेपेक्षा कर्तव्याला महत्त्व द्या. वाहन, यंत्रांचा वापर नीट करा.

**तुळ**
कामाचं योग्य मोल होईल. आर्थिक अडचणींवर मात कराल. यांत्रिक-तांत्रिक क्षेत्रात संधी लाभतील.

**वृश्चिक**
मनाजोग्या घटना घडतील. घरगुती प्रश्नांचा ताण राहील. शिक्षण क्षेत्रातील प्रयत्न कामी येतील.


**धनु**
सरकारी कामं रखडतील. प्रेम प्रकरणात वाद-विवाद संभवतात. कसल्याही आमिषाला बळी पडू नये.

**मकर**
महत्त्वाचे निर्णय विचारानं घ्यावेत. नव्या ओळखी कामी येतील. विवाहाचे बेत लांबणीवर पडतील.

**कुंभ**
कार्यात अडचणी येतील. व्यवसायात नव्या समस्या उद्‌भवतील. कुलदेवतेची उपासना करायला हवी.

**मीन**
इतरांवर विसंबून राहू नका. कार्यविस्तार तूर्तास नको. विद्यार्थ्यांना प्रगतीच्या नव्या संधी लाभतील.

# महाशब्दकोडे ९४०



**आडवी विधाने:**–1) क्रिकेटच्या खेळात चेंडू अडविणारा 4) नोंदणी, रजिस्ट्रेशन 6) स्वतःच्या जीवनावर आधारीत स्वतःच लिहिलेले चरित्र 8) फुलांतील रजःकण, 13) अति परिश्रमाने जाणविणारा 13) यष्टीजवळ उभा राहून गोलंदाजाने फेकलेला चेंडू फटकविणारा, 15) आशय, अर्थ, 18) अतिशय देखणा तेजस्वी मनुष्य 21) दैन्य, परवड, अपेष्टा 22) पद्धतशीर, 23) अतिशय वाईट स्थिती, दुर्दशा, 24) गाणे गाणारा, गायक, 27) धुणे, 31) जमीन उकरणे, जमिनीत खड्डा करणे 32) अतिशय जीर्ण झालेले, 34) सावित्रीचा पती, ज्याच्या जीवनाकरिता तिने यमराजाशी वाद घातला 36) रक्त सांडणे, 38) सोबत, बरोबर, 40) फकिराचा एक पंथ, दरवेश 42) जन्मभराचा कारावास, 44) केळाचे दूध व साखर घालून तयार केलेले मिश्रण, 45) अंगीकारलेले व्रत, 47) आजच्या अगोदरचा दिवस 48) मोरोपंताच्या आर्या, मोराचा आवाज, 50) लग्नसमारंभात सासूने सुनेचे तोंड आरशात बघणे, 52) मध्य प्रदेशात वाहणारी एक पवित्र नदी, 53) सार्वभौम राजाने करावयाचा यज्ञ, 55) एकमेकांशी केलेल्या चार हिताच्या गोष्टी 57) रत्नांची खरी पारख असलेला, 58) चेहऱ्यावरील टवटवीतपणा, कांती, 59) संशय, शंका (हिं.) 60) आंग्लभाषेतील होकार, 62) नांगरलेली जमीन साफ करण्याचे साधन, 64) हत्तीचा रक्षक, 65) देवाच्या मूर्ती भोवती केलेली सुंदर सजावट 66) जादू, 67) गाणे, 68) ज्वर, उष्णता 70) दुधावरची मलई, 71) कापसाची एकवीस पदरांची वात, 74) दुर्दशा, हाल, 77) सिद्ध होणे, साजशृंगार करणे, 79) श्रवणेंद्रिय, 80) दाणा, सुक्ष्म अंश 81) एका भाषेतील लेखाचे दुसऱ्या भाषेत भाषांतर करणारा, 82) पातक, दुष्कर्म, 84) पाणी, दूध 85) जमीन आणि आकाशाच्या मीलनाचे संकेतस्थळ 86) क्रिकेटमध्ये फलंदाजाने उंचावून मारलेला फटका वरचेवर पकडून त्याला बाद करणे 87) संताप व्यक्त करणे, नाचणे, मौजेने ओरडणे,

**उभी विधाने:**–1) एखाद्या क्षेत्राचे एकंदर परिमाण 2) रस्त्यावरील वाहतूक, 3) बशीचा जोडीदार, 4) एका रांगेत जेवायला बसणे 5) स्त्रियांच्या नाकातील एक दागिना 6) नाद, ध्वनी, 7) रिकामा 9) बुध कौशिक ऋषींनी प्रभू रामचंद्राची केलेली स्तुती, 11) एक जपानी नियमबद्ध कुस्तीचा प्रकार, 12) शिवधनुष्य 14) सांभाळ, जपणूक, 16) लघु, सान, 17) शक्ती, सामर्थ्य, 19) व्यंग, न्यून, 20) सर्व कामे डाव्या हाताने सहजतेने करणारा, 25) मुसलमानांचा सण 26) ऋण, व्याजाने घेतलेले पैसे, 28) विलासी, मनोहर 29) स्वतंत्र भारताचे घोषवाक्य 30) लोखंड घासून साफ करण्याचे एक हत्यार 32) माजी पंतप्रधान लालबहादुर शास्त्रींनी दिलेला नारा, 33) रुधिर, 35) विश्वासघातकी, घात करणारा 36) मऊ पदार्थाचा आघात, 37) चार आण्याचे नाणे, 39) यज्ञात आहुती टाकणे, 41) दशाननाची राजधानी 43) ठेका घेऊन इतरांकडून काम करवून घेणारा इसम, 44) हृदय, अंतःकरण, 46) सर्वांनी मिळून मिसळून केलेले काम, 49) प्रतिशोध घेणे, एकीकडची उणीव दुसरीकडे भरुन काढणे 50) शहाणा, जाणता, 51) चिठ्ठी, पत्र (हिं.) 53) राखून ठेवलेले, 54) यज्ञ कर्म करणारा 56) उदरनिर्वाह, भरण पोषण 59) चोविसावे नक्षत्र 61) वेळ, काळ, 63) कठीण, त्रासदायक 67) चुगली, लावालावी, 69) वायु, 72) शंभर, 73) व्यर्थ निरुपयोगी, 75) श्रृंगार, प्रेम 76) लहान भाऊ 78) कोणत्याही गोष्टीला होय म्हणून मान डोलविणारा 80) लबाडी, कृत्रिमता 81) खुप, विपुल 83) रस्ता, माग

### मागील महाशब्दकोड्याचे उत्तर



लोकशाही वार्ता
संपादकीय

# ‘विकास’ हिमालयाच्या मुळावर

पावसाळा सुरू होऊन महिना होत आहे. आता जुलै महिन्यात संपूर्ण देशात पाऊस चांगला बरसला आहे. खास करून हिमालयीन प्रदेश आणि दक्षिणेतील महाराष्ट्र व छत्तीसगडमध्ये पावसामुळे हाहाःकार माजला आहे. शेतकऱ्यांचे नुकसान होण्यासह जनजीवन प्रभावित झाले. हिमालयाच्या कुशीत वसलेल्या उत्तराखंडमधील पर्वतांच्या भयंकर स्वरूपामुळे अनेक ठिकाणी जनजीवन ठप्प झाले आहे. चमोली, उत्तरकाशी, टिहरी, रूद्रप्रयाग आदी ठिकाणी पावसासोबत पर्वताचे भूस्खलन होत आहे. दगड आणि माती वारंवार कोसळल्याने चारधाम यात्रेच्या मार्गात अडथळा निर्माण झाला आहे. जोशीमठसारख्या शहरांमध्ये भूस्खलनाचा धोका पुन्हा निर्माण झाला आहे. भूगर्भशास्त्रज्ञांनी भूस्खलनाच्या नवीन प्रवण क्षेत्र म्हणून चिन्हांकित केलेल्या भागात रस्ते, वीज, रेल्वे यासारख्या प्रकल्पांवर काम सुरू असल्याने सरकार चिंतेत आहे. चारधाम यात्रा मार्गावरील भूस्खलन क्षेत्र डोकेदुखी बनत आहेत. ऋषिकेश ते बद्रीनाथ यात्रा मार्गावर एकूण ५४ ठिकाणी भूस्खलन क्षेत्र आहेत. येथे अनेक वेळा भूस्खलनाच्या घटना घडल्या आहेत. हिमाचल प्रदेशातही उत्तराखंडसारखीच परिस्थिती आहे. अलिकडेच मंडी जिल्ह्यामध्ये भूस्खलनाच्या भयानक घटना घडल्या आहेत. एकीकडे, पंतप्रधानांचा ‘१०-सूत्री आपत्ती जोखीम कमी करण्याचा’ कार्यक्रम सुरू आहे, म्हणजेच आपत्तीमध्ये किमान धोका कार्यक्रम आहे आणि दुसरीकडे, हिमालयाच्या कुशीत असलेल्या पर्वतीय प्रदेशात मूलभूत पायाभूत सुविधांचे बांधकाम होत आहे. उत्तराखंडची लोकसंख्या सुमारे १.२५ कोटी आहे, परंतु तीर्थयात्रा आणि पर्यटनासाठी येथे येणाऱ्या लोकांची संख्या खूप जास्त आहे. अशा परिस्थितीत, चांगले रस्ते आणि वाहतूक व्यवस्था आवश्यक आहे, परंतु जेव्हा अशा विकासामुळे निसर्गावरच संकट निर्माण होते, तेव्हा पुनर्विचार करावा लागेल. सरकार आणि समाज दोघांनाही हे गांभीर्याने घ्यावे लागेल की हवामान बदलाचा हिमालयावर सर्वाधिक परिणाम होतो आणि त्यामुळे उत्तराखंडला भयानक आव्हानांना तोंड द्यावे लागत आहे. हिमाचल प्रदेशालाही अशा आव्हानांना तोंड द्यावे लागत आहे. संवेदनशील परिसंस्था, अप्रत्याशित हवामान व ढगफुटी, भूस्खलन, अचानक पूर आणि हिमनदी तलाव फुटण्याच्या वाढत्या घटनांमुळे उत्तराखंड असुरक्षित होत आहे. पूर, भूस्खलन, अतिवृष्टी आणि जंगलातील आगीसारख्या नैसर्गिक आपत्तींमुळे दरवर्षी राज्याला मोठ्या प्रमाणात जीवित आणि मालमत्तेचे नुकसान होत आहे. दरवर्षी, राज्याच्या अर्थसंकल्पातील मोठा भाग आपत्तींमुळे उद्ध्वस्त झालेल्या संरचनांच्या दुरुस्तीत वाया जातो. जुलै, ऑगस्ट आणि सप्टेंबरमध्ये पावसाळ्यात झालेल्या नुकसानाबाबत, एसडीसी फाउंडेशनच्या उत्तराखंड आपत्ती आणि अपघात विश्लेषण उपक्रम अहवालात असे म्हटले आहे की राज्यात दरवर्षी नवीन भूस्खलन क्षेत्रे

**उत्तराखंड सरकार आणि जागतिक बँकेच्या आपत्ती व्यवस्थापन विभागाने २०१८ मध्ये केलेल्या अभ्यासानुसार, उत्तराखंडमधील ६,३०० हून अधिक ठिकाणे भूस्खलन क्षेत्र म्हणून ओळखली गेली आहेत. अहवालात म्हटले आहे की राज्यात हजारो कोटी रुपयांचे विकास प्रकल्प पर्वत तोडून किंवा जंगले नष्ट करून बांधले जात आहेत आणि त्यामुळे भूस्खलन क्षेत्रांची संख्या वाढत आहे. भूस्खलनाच्या प्रभाव क्षेत्रात वाढ होण्याचे एक प्रमुख कारण म्हणजे भारतीय प्लेट्सची सतत हालचाल होय. या हालचालीमुळे खडकांमध्ये असलेल्या भेगादेखील सक्रिय होतात. पावसाळ्यात मातीची पकड सैल झाल्यावर ही भूगर्भीय क्रिया तीव्र होते.**

विकसित होत आहेत. भारतीय अंतराळ संशोधन संघटनेच्या आकडेवारीनुसार, १९८८ ते २०२३ दरम्यान उत्तराखंडमध्ये भूस्खलनाच्या १२,३१९ घटना घडल्या. २०१८ मध्ये राज्यात भूस्खलनाच्या २१६ घटना घडल्या, तर २०२३ मध्ये ही संख्या पाच पटीने वाढून १,१०० झाली. २०२२ च्या तुलनेत, २०२३ मध्ये भूस्खलनाच्या घटनांमध्ये सुमारे साडेचार पटीने वाढ झाली आहे. गेल्या वर्षी ऑगस्टपर्यंत, पावसाळ्यात भूस्खलनाच्या २,९४६ घटनांची नोंद झाली होती, ज्यामध्ये अनेक लोकांचा मृत्यू झाला होता. या पावसाळ्यात ५०० नवीन भूस्खलन क्षेत्रे ओळखली गेली आहेत. उत्तराखंड सरकार आणि जागतिक बँकेच्या आपत्ती व्यवस्थापन विभागाने २०१८ मध्ये केलेल्या अभ्यासानुसार, उत्तराखंडमधील ६,३०० हून अधिक ठिकाणे भूस्खलन क्षेत्र म्हणून ओळखली गेली आहेत. अहवालात म्हटले आहे की राज्यात हजारो कोटी रुपयांचे विकास प्रकल्प पर्वत तोडून किंवा जंगले नष्ट करून बांधले जात आहेत आणि त्यामुळे भूस्खलन क्षेत्रांची संख्या वाढत आहे. भूस्खलनाच्या प्रभाव क्षेत्रात वाढ होण्याचे एक प्रमुख कारण म्हणजे भारतीय प्लेट्सची सतत हालचाल होय. या हालचालीमुळे खडकांमध्ये असलेल्या भेगादेखील सक्रिय होतात. पावसाळ्यात मातीची पकड सैल झाल्यावर ही भूगर्भीय क्रिया तीव्र होते. उत्तराखंड आणि हिमाचल यासारख्या पर्वतीय भागात, कमी हिरवळ असल्यामुळे मातीची पकड कमकुवत होत आहे, त्यावर, हंगामी बदलांमुळे, अचानक मुसळधार पाऊस आणि त्यानंतर लगेचच तेजस्वी सूर्यप्रकाश भूस्खलनाची प्रक्रिया मजबूत करतो. भूगर्भीय सर्वेक्षणाशिवाय प्रकल्पांसाठी केले जाणारे विध्वंस हिम-पर्वतांसाठी योग्य नाही. ज्या प्रकल्पासाठी सिल्कयारा बोगदा बांधला जात आहे तो पर्यावरणीय प्रभाव मूल्यांकनाची आवश्यकता टाळण्यासाठी लहान तुकड्यांमध्ये दाखवण्यात आला होता. हिमालयात भूगर्भीय उलथापालथ सुरूच आहे. येथे झाडे जमीन बांधण्यात मोठी भूमिका बजावतात. हे जाणून घेणे महत्त्वाचे आहे की हिमालयीन भूकंपीय क्षेत्रात, भारतीय प्लेट युरेशियन प्लेटशी टक्कर घेते. जेव्हा पर्वतांवर विध्वंस किंवा स्फोट होतात आणि जेव्हा त्यांचे नैसर्गिक स्वरूप बदलले जाते तेव्हा दिल्लीत भूकंपाची शक्यता वाढतेच, परंतु यमुनेत कमी पाण्याचे संकटदेखील निर्माण होते. पूर्वी, उत्तराखंडमध्ये तीन-चतुर्थांश भूस्खलन पावसामुळे झाले होते, परंतु आता पावसानंतरही ही आपत्ती थांबत नाही. गेल्या वर्षी हिवाळ्यात आणि या वर्षी उन्हाळ्यातही अनेक मोठे भूस्खलन झाले. अशा परिस्थितीत, विकास, नैसर्गिक विकास आणि श्रद्धेने आनंदाचा त्याग करण्याची भावना निर्माण करणे हे आमंत्रण देणारे आणि इशारा देणारे आहे.

# गडकिल्ल्यांची उत्तम निगा राखणे गरजेचे!

भारतातील मराठा लष्करी वारसा आता युनेस्कोच्या जागतिक वारसा स्थळांचा भाग बनला आहे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या १२ किल्ल्यांचा युनेस्कोच्या जागतिक वारसा यादीत समावेश करण्यात आला आहे. पॅरिसमध्ये झालेल्या जागतिक वारसा समितीच्या ४७ व्या सत्रात ही घोषणा करण्यात आली. युनेस्कोमधील भारताचे राजदूत विशाल शर्मा आणि भारतीय पुरातत्व सर्वेक्षण आणि संग्रहालय संचालनालयाचे हेमंत दळवी हे देखील या सत्रात उपस्थित होते. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी याला एक ऐतिहासिक कामगिरी आणि अभिमानाचा क्षण म्हटले. त्यांनी ट्विट करून महाराष्ट्रातील सर्व नागरिकांचे अभिनंदन केले. छत्रपती शिवाजी महाराजांचे १२ जागतिक वारसा किल्ले १७ व्या-१९ व्या शतकात बांधले गेले. यापैकी ११ किल्ले रायगड, राजगड, प्रतापगड, पन्हाळा, शिवनेरी, लोहगड, साल्हेर, सिंधुदुर्ग, विजयदुर्ग, सुवर्णदुर्ग, खांदेरी हे महाराष्ट्रात आहेत आणि एक किल्ला तामिळनाडूमध्ये आहे. साल्हेर, शिवनेरी, लोहगड, रायगड, राजगड आणि जिंजी हे डोंगरी किल्ले म्हणून प्रसिद्ध आहेत तर प्रतापगड हा डोंगरी-वन किल्ल्यांमध्ये आणि पन्हाळा हा डोंगरी-पठार किल्ल्यांमध्ये गणला जातो. विजयदुर्ग, खांदेरी, सुवर्णदुर्ग आणि सिंधुदुर्ग यांना किनारी बेट किल्ले म्हणतात. यापैकी शिवनेरी किल्ला, लोहगड किल्ला, रायगड किल्ला, सुवर्णदुर्ग किल्ला, पन्हाळा किल्ला, विजयदुर्ग किल्ला, सिंधुदुर्ग किल्ला आणि जिंजी किल्ला हे भारतीय पुरातत्व सर्वेक्षण विभागाच्या देखरेखीखाली आहेत. तर साल्हेर किल्ला, राजगड किल्ला, खांदेरी किल्ला आणि प्रतापगड किल्ला हे महाराष्ट्र सरकारच्या पुरातत्व आणि संग्रहालय संचालनालयाद्वारे संरक्षित आहेत.



**विशेष**
**प्रा. डॉ. सुधीर अग्रवाल**
९५६१५९४३०६

या ऐतिहासिक किल्ल्यांचे महत्त्व आता जागतिक स्तरावरदेखील पोहोचणार आहेत. त्यामुळे राज्य सरकारची जबाबदारी आता वाढली आहे. या सर्व किल्ल्यांची निगा राखण्याची त्या ठिकाणी मूलभूत सुविधा निर्माण करण्याची, आजूबाजूचा परिसर स्वच्छ राखण्याची व किल्ल्यासभोवतालचे अतिक्रमण हटविण्याची जबाबदारी राज्य सरकारची आहे. हे सर्व निकषाचे पालन करण्याची जबाबदारी राज्य सरकार सह सर्व जनतेची आहे.निकषांचे पालन केले नाही तर युनेस्को हा दर्जा काढून घेते, याची आतापर्यंतची दोनच उदाहरणे आहेत एक उदाहरण आहे ओमान मधल्या अरेबियन आवरिक्स अभयारण्याचे आणि दुसरे उदाहरण आहे ड्रेस्डन व्हॅलीचे. जर्मनीतील ड्रेस्डन व्हॅलीला जागतिक वारसा दर्जा मिळाला पण निकष न पाळल्याने तो २००९ ला काढून घेतला. महाराष्ट्रातील रायगड जिल्ह्यात असलेला हा किल्ला एका टेकडीवर बांधलेला आहे. छत्रपती शिवाजी महाराज जेव्हा मराठा साम्राज्याचे शासक बनले तेव्हा त्यांनी रायगडला आपली राजधानी बनवले. त्यांच्या कारकीर्दीत त्यांनी रायगड किल्ल्यासह रायगडमध्ये अनेक इमारती बांधल्या आणि विकसित केल्या. किल्ल्यावर जाण्यासाठी लोकांना १७३७ पायऱ्या चढाव्या लागतात. किल्ल्यावर जाण्यासाठी रोपवे देखील बांधण्यात आला आहे. महाराष्ट्रातील पुणे जिल्ह्यातील एका टेकडीवर बांधलेल्या या किल्ल्याला मुरुंबदेव म्हणून ओळखले जात असे. ज्या टेकडीवर हा किल्ला बांधला आहे त्याला मुरुंब देवीचा डोंगर म्हणतात. रायगड राजधानी होण्यापूर्वी हा किल्ला २६ वर्षे छत्रपती शिवाजी महाराजांची राजधानी होता. शिवाजी महाराजांनी त्यांचे बहुतेक आयुष्य राजगड किल्ल्यात घालवले. त्यांचा मुलगा राजाराम याच किल्ल्यात जन्मला. त्यांच्या पत्नी सईबाईंचेही निधन राजगड किल्ल्यात झाले. महाराष्ट्रातील सातारा जिल्ह्यातील महाबळेश्वर शहरापासून २० किमी अंतरावर असलेल्या प्रतापगड किल्ल्याची बांधणी छत्रपती शिवाजी महाराजांनी १६५६ मध्ये केली होती. या किल्ल्याच्या आत माँ भवानी आणि भगवान शिव यांचे मंदिर आहे. अफझल खानविरुद्धचे युद्ध जिंकल्यानंतर छत्रपती शिवाजी महाराज या किल्ल्यावर परतले. आज हा किल्ला पर्यटन स्थळ आहे. महाराष्ट्रातील कोल्हापूर जिल्ह्यातील सह्याद्री टेकड्यांवर ३१७७ फूट उंचीवर पन्हाळा किल्ला बांधला आहे. हा किल्ला १२ व्या शतकात राजा भोज यांनी बांधला होता, परंतु १६५९ मध्ये छत्रपती शिवाजी महाराजांनी आदिलशाहीकडून हा किल्ला जिंकला. छत्रपती शिवाजी महाराज या किल्ल्यात युद्धांचे नियोजन करायचे. मराठे आणि विजापूर यांच्यात या किल्ल्याजवळ युद्ध झाले. हा किल्ला सुमारे ७ किलोमीटर परिसरात पसरलेला आहे. महाराष्ट्रातील पुणे जिल्ह्यातील जुन्नर गावाजवळ बांधलेला हा किल्ला छत्रपती शिवाजी महाराजांचे जन्मस्थान आहे.

**वर्धा**

# जनसुरक्षा कायदा : अंतर्गत सुरक्षेचा नवा किल्ला

महाराष्ट्र विधानसभा आणि विधान परिषदेत बहुमताने मंजूर झालेले विशेष जनसुरक्षा विधेयक हे राज्याच्या अंतर्गत सुरक्षेसाठी एक महत्त्वाचे पाऊल ठरत आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली राज्य सरकारने घेतलेला हा निर्णय केवळ कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न नाही, तर तो लोकशाहीच्या संवेदनशील रक्षणाचा भाग मानावा लागेल. माओवाद व नक्षलवाद हे केवळ जंगलात लपून बसलेल्या बंदूकधारींचे प्रश्न राहिलेले नाहीत. त्यांच्या विचारधारेला शहरी भागात गुप्त पाठिंबा मिळतो आहे आणि आंदोलने, लेख, कार्यशाळा, विविध माध्यमातून सरकारविरोधी चळवळी उभारल्या जात आहेत. या कृती फक्त मतभिन्नता नसून, देशाच्या संविधानिक रचनेच्या विरोधात आहे. महाराष्ट्रात आतापर्यंत अशा विचारधारेवर प्रतिबंध करणारा स्वतंत्र कायदा नव्हता. पोलिसांना केंद्र सरकारच्या कायद्यांचा आधार घ्यावा लागत असे, त्यामुळे अनेक वेळा कारवाईसाठी प्रशासकीय अडथळे निर्माण होत. छत्तीसगड, आंध्र प्रदेश, तेलंगणा या राज्यांमध्ये असे कायदे अस्तित्वात असताना, महाराष्ट्रात त्याची उणीव जाणवत होती. ही पोकळी भरून काढणारा जनसुरक्षा कायदा म्हणून सरकारने पुढाकार घेतला आहे. मुख्यमंत्री फडणवीस यांनी स्पष्ट केले आहे की, हा कायदा अजामीनपात्र व प्रतिबंधात्मक स्वरूपाचा असला तरी तो व्यक्तींच्या अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर गदा आणणारा नाही. समाजमाध्यमे, प्रसारमाध्यमांवर कोणताही दबाव टाकण्याचा सरकारचा हेतू नाही.

**प्रासंगिक**

केवळ अशा संघटनांवर लक्ष केंद्रित केले जाईल, ज्यांचे उद्दिष्ट राज्यघटनेच्या विरोधात असून, अंतर्गत सुरक्षेला धोका निर्माण करण्याचे आहे. हा कायदा डाव्या विचारसरणीच्या पक्षांच्या विरुद्ध नाही, असे मुख्यमंत्र्यांनी ठामपणे सांगितले. शिक्षक, विद्यार्थी, सामान्य नागरिक यांनी आंदोलन केल्यामुळे त्यांच्यावर कारवाई होईल, असे नव्हे. हा कायदा व्यक्ती नव्हे, तर संघटना केंद्रस्थानी ठेवून तयार करण्यात आलेला आहे. गेल्या काही वर्षांत केंद्र सरकार आणि राज्य सरकारांनी माओवादी चळवळीवर गंभीर उपाययोजना केल्या. परिणामी या चळवळींमध्ये बऱ्यापैकी घट झाली. मात्र काही तालुक्यांमध्ये अजूनही त्यांचा प्रभाव जाणवतो. शहरांतून या चळवळींना वैचारिक पोसणारा हात मिळतो, हे सरकारचे निरीक्षण आहे. याच पार्श्वभूमीवर, जनसुरक्षा कायदा म्हणजे विचारांच्या आडून येणाऱ्या कटकारस्थानांना अटकाव घालण्याचं साधन ठरत आहे. या कायद्यामुळे नक्षलवादी चळवळींना, शहरी माओवादी समर्थक संघटनांना व त्यांच्याशी संलग्न व्यक्तींना लक्ष्य करता येणार आहे. अशा गटांकडून विविध आंदोलनांच्या माध्यमातून सरकारविरोधी रोष निर्माण करून अराजकता पसरवण्याचा प्रयत्न केला जातो.हा कायदा अशा अराजकतेला पायबंद घालून, कायदा-सुव्यवस्था अबाधित राखण्यास मदत करेल. या कायद्यावर टीकाही होणार हे निश्चित आहे. अभिव्यक्ती स्वातंत्र्याच्या अधिकाराचे रक्षण करत असताना अशा कायद्यांचा गैरवापर केला जाणार अशी टीका केली जाऊ शकते. मात्र या कायद्याची अंमलबजावणी पारदर्शक, न्याय्य आणि संविधानाच्या चौकटीतच होणार असल्याचे या विधेयकाचे प्रारुप आहे. जनसुरक्षा कायदा म्हणजे राज्याच्या अंतर्गत सुरक्षेच्या व्याख्येतील एक निर्णायक टप्पा आहे. हा कायदा दहशतवाद, माओवाद, नक्षलवादासारख्या धोरणात्मक शत्रूंना रोखण्यासाठी एक हत्यार म्हणून वापरला जाईल, या हत्याराचा वापर करताना राजकीय शत्रुत्वापेक्षा लोकशाहीचे रक्षण हा प्रामाणिक उद्देश सरकारच्या केंद्रस्थानी आहे. महाराष्ट्र सरकारने जनसुरक्षा कायद्याच्या माध्यमातून अंतर्गत सुरक्षेसाठी एक पाऊल पुढे टाकले आहे. या कायद्याची अंमलबजावणी पारदर्शक राहणार असून,नागरिकांना सुरक्षित वातावरण निर्माण करून देण्यासाठी हा कायदा असल्याची ग्वाही सरकारने दिली आहे. यामुळे या कायद्याविषयी भीती बाळगण्याचे काहीच कारण नसून, या कायद्या विषयी गैरसमज पसरवणाऱ्यांच्या अपप्रचाराला सामान्य नागरिकांनी बळी पडू नये.

**संजयसिंह ठाकूर**
**नक्षलविषयक अभ्यासक**
**नागपूर**

# पर्यटन धोरण प्रभावशाली असावे

आपल्या देशात रोजगारासाठी अनेक पर्याय उपलब्ध होऊ शकतात. परंतु त्यासंदर्भात केंद्र सरकार आणि राज्य सरकारची उदासीनता तसेच चुकीचे धोरण कारणीभूत ठरतात. खेड्यात किंवा ग्रामीण भागात राहणारा भारत असे जेव्हा जेव्हा त्याचे वर्णन केले जाते त्या प्रत्येक खेड्यात छोट्या कारागिरांमुळेसुद्धा रोजगार कमावण्याची क्षमता आहे. तर निसर्गाने परिपूर्ण असलेल्या देशाच्या अनेक भागांमध्ये पर्यटनासारखा उद्योग प्रचंड रोजगार मिळवून देऊ शकतो. मात्र यासाठी लागणाऱ्या मूलभूत सोयी-सुविधायकडे सरकारचे मोठ्या प्रमाणात दुर्लक्ष होते. त्याचे मोठे परिणाम पर्यटन उद्योगावर होतात. प्रामुख्याने पर्यटकांना चांगल्या दर्जाच्या सोयी-सुविधा हव्या असतात. या सोयी-सुविधांमध्ये अनेक अडथळे असल्यामुळे अनेक ठिकाणी स्वतःच्या जोखमीवर पर्यटनासाठी जावे लागते. तिथे गेल्यावर खात्रीशीर सेवा सुविधा मिळतीलच हे सांगता यात नाही. अडीअडचणीच्यावेळेला त्या त्या भागातल्या पोलिसांकडून सुरक्षितता किंवा मदत मिळेलच याबद्दलही खात्री देता येत नाही. म्हणून सर्वप्रथम या सेवासुविधा आणि सुरक्षिततेबाबत पर्यटक आश्वस्त झाले पाहिजे.

पर्यटकांना आवश्यक असलेल्या दळणवळण सुविधेमध्ये प्रवास हा तितकाच महत्त्वाचा ठरतो. आपण फसवले जाणार नाही किंवा लुबाडले जाणार नाही याची पर्यटकांना भीती असते. बऱ्याचदा टॅक्सी, हेलिकॉप्टर, विमानसेवा याबाबतीतही पर्यटकांना मोठा धोका पत्करावा लागतो. जी चिंता करणारी बाब ठरते. देशातील त्या त्या भागातल्या राज्य सरकारांकडून याबाबतची सर्वाधिक काळजी घेतली गेली पाहिजे. सर्वसाधारणपणे पर्यटक हे त्यांच्या मौजमजेसाठी येतात. असा स्थानिक जनतेचा आणि सरकारी यंत्रणांचाही समावेश असतो. म्हणून पर्यटनाकडे बघण्याची बेफिकीर वृत्ती अनेक धोक्यांना आमंत्रण देणारे ठरू शकते. अलीकडेच चारधाम यात्रेसाठी मिळणाऱ्या हेलिकॉप्टर सेवेबाबत उत्तराखंड सरकारकडून अक्षम्य हेळसांड झाली होती. केदारनाथला जाणारे हे हेलिकॉप्टर पडून सतत जणांना जीव गमवावा लागला. त्यात महाराष्ट्रातले चार जण होते. अहमदाबादच्या विमान दुर्घटनेपाठोपाठ हा हेलिकॉप्टरचा अपघात एकूणच प्रवाशांच्या आणि पर्यटकांसासुद्धा सुरक्षिततेवर प्रश्नचिन्ह निर्माण करणारा ठरतो. यासंदर्भातल्या अनेक घटना वर्षभरात कुठे ना कुठे घडत असतात. म्हणजे पर्यटनाच्या प्रवासापासून ते निवासापर्यंत खात्रीशीर व्यवस्था होऊ शकत नाही. ही बाब स्पष्ट होते.



**दृष्टिकोन**
**मधुकर चुटे**
९४२०५६६४०४

जो उद्योग किंवा व्यवसाय अर्थव्यवस्थेसाठी मोठा हातभार देऊ शकतो. त्याकडेदेखील होणारे हे दुर्लक्ष आश्चर्यजनकच ठरते. जर यामध्ये आमूलाग्र बदल झाला तर रोजगार आणि आर्थिक उलाढाल यामध्येदेखील लक्षणीय वाढ होऊ शकते. अर्थातच हा संपूर्ण व्यवसाय योग्य सेवा आणि सुरक्षितता या दोनच गोष्टींवर आधारलेला आहे. याबात मोठी दुरवस्था झालेली दिसून येते. भारतीय किंवा परदेशी पर्यटकांची वाढती संख्या लक्षात घेतली तर या क्षेत्रात युद्धपातळीवर अनेक सुधारणा करण्याची आवश्यकता आहे. पण दुर्दैवाने त्याबाबतीत प्रचंड निष्काळजीपणा झालेला पाहायला मिळतो. देशभरातून लाखोच्या संख्येने पर्यटक आपल्या महाराष्ट्रात येत असतात. त्या सर्वांना परिपूर्ण मार्गदर्शन करणारी पर्यटन कार्यालय महाराष्ट्रात नाही. मुंबईसारखी आंतरराष्ट्रीय महानगरी महाराष्ट्राला लाभली आहे. अजिंठा-वेरुळसारख्या लेण्या आहेत जिथे आंतरराष्ट्रीय पर्यटक मोठ्या प्रमाणावर येतात. अनेकांना मुंबईचे मोठे आकर्षण असते. याशिवाय गड किल्ल्यासारखे वरदान लाभलेल्या महाराष्ट्राने तिथेदेखील पुरेशा सोयीसुविधा केलेल्या नाहीत. निसर्गाची मोठी कृपा लाभलेल्या शेकडो किलोमीटरचा समुद्रकिनारा पण त्याकडे देखील पर्यटनाच्या चाणाक्षबुद्धीने पाहिले गेलेले नाही. शेजारच्या गोवा राज्याची सगळी अर्थव्यवस्था या समुद्रकिनाऱ्याच्या पर्यटनातून चालत असते. कोकण रेल्वे झाल्यानंतर तरी तिथल्या पर्यटनात वाढ होईल अशी अपेक्षा होती. त्यामधून कोकणातल्या लोकांना रोजगाराची मोठी संधी उपलब्ध झाली असती. पण आता तिथला बराचसा रोजगार तर परप्रांतीयांच्या हातात जाऊ लागला आहे. तरी महाराष्ट्र सरकार याकडे मोठे दुर्लक्षच करीत आहे.

आजच्या विज्ञान तंत्रज्ञानाच्या युगात अनेक सेवासुविधा मिळवून देण्याची ऑनलाईन व्यवस्था सहजपणे होऊ शकते. किमान सुरक्षिततेचा जो महत्त्वाचा मुद्दा आहे त्याबाबत सरकारी पुढाकार असणे अत्यंत गरजेचे आहे. स्वाभाविकपणे सरकार काही करू शकत नाही हे गृहीत धरून लोकांना खासगी संस्थांचा, एजन्सीचा आधार घ्यावा लागतो आणि मग त्यांनीही पुरवलेल्या सेवेवरच समाधान मानावे लागते. प्रामुख्याने पर्यटनाशी निगडित अनेक व्यवसायांपासून वंचित राहण्याची वेळ येऊ शकते. बऱ्याच वेळेला पर्यटकांना सेवा देणाऱ्यांचा शाप देण्याचे प्रकार घडत असतात. पुढच्या काही वर्षांनंतरचा विचार करून देशात तसेच महाराष्ट्रात प्रभावशाली पर्यटन धोरण राबविण्याची गरज आहे.

**नागपूर**

# भारत घुसखोरांवर केव्हा कारवाई करणार?

इस्त्रायलविरुद्धच्या युद्धानंतर इराण आता सावरतो आहे. युद्धामुळे झालेले नुकसान भरून काढताना ज्यामुळे देशाला फटका बसला याचा शोधही घेत आहे. अफगाणिस्तानातील गरिबीमुळे रोजगाराच्या आशेने इराणमध्ये आलेल्या आणि अवैधपणे राहणाऱ्या अफगाणी नागरिकांपैकी काहींनी इस्त्रायलसाठी हेरगिरी केल्याचा इराणचा दाट संशय आहे, त्यामुळे भविष्यातील सुरक्षेच्या दृष्टीने इराणने आता देशात अवैधपणे राहणाऱ्या अफगाणी नागरिकांना मायदेशी पाठवण्याची मोहीम हाती घेतली आहे.

मागील १५ दिवसांत कागदपत्राविना राहणाऱ्या ५ लाखांहून अधिक अफगाणी नागरिकांना इराणने हाकलून लावले आहे. इराणच्या या निर्णयावर अनेक मानवाधिकार संघटनांनी आवाज उठवला असला तरी इराणने त्यांना न जुमानता आपल्या निर्णयावर ठाम राहण्याचा निर्णय घेतला आहे. अमेरिकेत ट्रम्प सरकार आल्यानंतर त्यांनीही अशाच स्वरूपाची कारवाई केली होती. देशाच्या सुरक्षेपुढे भाव भावना निरर्थक असल्याची साक्ष या दोन्ही देशांनी जगाला दिली आहे याउलट भारत मात्र देशात अवैधपणे राहणाऱ्या १० कोटीहून अधिक बांगलादेशी आणि रोहिंग्या घुसखोरांना गेल्या अनेक वर्षांपासून पोसतो आहे. पहलगाम हल्ल्यानंतर पाकिस्तानविरुद्ध झालेले युद्ध थोडक्यात आटपले असले तरी भविष्यात ते पुन्हा पेटण्याची शक्यता नाकारता येत नाही. अशा वेळी भारताची अंतर्गत सुरक्षा धोक्यात आणण्याचे काम या घुसखोरांकडून केले जाण्याची शक्यता जाणकार व्यक्त करत आहेत. आजमितीला देशाच्या कानाकोपऱ्यात हे घुसखोर पसरले आहेत. या घुसखोरांना त्यांच्या देशात हाकलून लावण्याची मागणी अनेक राष्ट्रप्रेमी संघटना, पक्ष वारंवार करत आहेत. राज्यात अवैधपणे राहणाऱ्या घुसखोरांचा मुद्दा देशातील जवळपास सर्वच राज्यांच्या विधिमंडळांत सतत चर्चिला जातो, देशाच्या संसदेमध्येही या मुद्द्यावर अधूनमधून चर्चा होत असते मात्र त्यानंतर होते ती केवळ जुजबी कारवाई. काही दिवस चालणारी ही कारवाई थोड्याच दिवसांत गुंडाळली जाते. घुसखोरांना भारताबाहेर हाकलायचे असेल, तर स्वतंत्र कायदा करण्याची आवश्यकता असल्याचेही मत काही जाणकार व्यक्त करतात.



**मागोवा**
**जगन घाणेकर**
९६६४५५९७८०

बांगलादेशी नागरिकांची भारतातील घुसखोरी आजमितीला जटील समस्या बनली आहे. बांगलादेशी घुसखोरांनी आसामच्या हजारो चौरस किलोमीटर परिसरावर अतिक्रमण केले आहे या परिसरात कारवाईसाठी जाणाऱ्या अतिक्रमणविरोधी पथकांना आणि पोलिसांना ते जुमानत नाहीत, बांगलादेश सीमेलगतच्या सर्वच राज्यांत जवळपास अशीच परिस्थिती आहे. पश्चिम बंगाल तर बांगलादेशी घुसखोरांना आश्रय देणारे प्रमुख राज्य मानले जाते. अर्थात हे बांगलादेशी अधिककाळ या सीमेलगतच्या भागांत राहत नाही. सीमेलगतच्या भागांत या बांगलादेशींना भारतीय नागरिकत्वाची सरकारी कागदपत्रे मिळवून देणाऱ्या अनेक टोळ्या अनधिकृतरित्या कार्यरत आहेत. सरकारी कागदपत्रे बनवल्यावर हे घुसखोर भारतभरातील प्रमुख शहरांमध्ये जाऊन आपले बस्तान मांडतात. विकसनशील शहरे हे या घुसखोरांची प्रमुख आश्रयस्थाने आहेत. विकसनशील शहरांत मोठमोठ्या इमारतींची कामे सातत्याने चाललेली असतात. या ठिकाणी कमी रोजंदारीत काम करणारे बिगारी कंत्राटदारांना हवेच असतात. बांगलादेशी घुसखोर त्यांची ही गरज भागवतात. इथेच यांच्या निवाऱ्याची सोयही केली जाते. एकदा बस्तान बसले की हे लोक आपल्या संपूर्ण कुटुंबीयांना घेऊन त्या ठिकाणी येतात. नवी मुंबई, पुणे, ठाणे, मुंबई या प्रमुख शहरांसह राज्यातील जवळपास सर्वच शहरांत आणि नगरांत बांगलादेशी घुसखोरांनी आपले जाळे पसरवले आहे. पंजाब, हरियाणा आणि उत्तरेकडील काही भागांत जिथे मोठ्या प्रमाणात कॉन्ट्रॅक्ट पद्धतीने शेती केली जाते अशा ठिकाणीही या घुसखोरांना सहज रोजगार उपलब्ध होतो. प्रमुख शहरांमध्ये या बांगलादेशी घुसखोरांना आश्रय देणाऱ्या, त्यांना रोजगार उपलब्ध करून देणाऱ्या आणि व्यवसायासाठी भांडवल मिळवून देणाऱ्या टोळ्याही कार्यरत आहेत. आजच्या घडीला मुंबई शहरातील बहुतांश रेल्वे स्थानकानजीकच्या मंड्यांमध्ये घुसखोरांनी अनधिकृत टपऱ्या थाटल्या आहेत ज्यांना स्थानिक लोकप्रतिनिधी, भ्रष्ट पोलीस अधिकारी आणि पालिका कर्मचारी यांच्याकडून संरक्षण मिळत आहे. आजतागायत १० कोटीहून अधिक बांगलादेशी नागरिकांनी भारतात घुसखोरी केल्याचा अंदाज जाणकार वर्तवतात. जागतिक लोकसंख्येत अग्रक्रम मिळवणाऱ्या भारतामध्ये बांगलादेशी घुसखोरांचाही मोठा वाटा आहे.

**घाटकोपर, मुंबई**

## लोकसंवाद

### मातीच्या गणेशमूर्ती माफक दरांत मिळाव्यात

यंदा प्लास्टर ऑफ पॅरिसच्या मूर्तींवर बंदी आणणार असल्याचे जाहीर केल्यानंतरही गेल्याच मासात यावर यूटर्न घेऊन सरकारने प्लास्टर ऑफ पॅरिसच्या मूर्तींना अनुमती दिली आहे. पर्यावरणप्रेमी तसेच सामाजिक संघटनांच्या प्रबोधनामुळे गेल्या काही वर्षांत गणेशचतुर्थीच्या निमित्ताने शाडू मातीची मूर्ती घरी आणणाऱ्यांचे प्रमाण वाढले आहे. यावर्षी समस्त गणेशमूर्ती विक्री केंद्रांत प्लास्टर ऑफ परिससोबत मातीच्या मूर्तीही विक्रीसाठी ठेवण्यात आल्या आहेत. गणेशचतुर्थीच्या काळात पुजली जाणारी गणेशमूर्ती ही मृत्तिकेपासून म्हणजेच मातीपासून बनवली जावी असा शास्त्रसंकेत आहे. त्यामुळे ग्रामीण भागांत पिढ्यानपिढ्या घरी मातीच्याच मूर्ती आणल्या जातात.कोकणासारख्या ठिकाणी जिथे घरोघरी गणपती आणला जातो तिथे प्रत्येक गावात मातीच्या गणेशमूर्ती बनवणारी पिढीजात घराणी आहेत, शहरामध्ये मातीच्या मूर्ती घेणाऱ्यांचे प्रमाण वाढले असले, तरी प्लास्टर ऑफ पॅरिसच्या तुलनेत मातीची मूर्ती कमालीची महाग असते हेही तितकेच सत्य आहे. शहरात प्लास्टर ऑफ पॅरिसच्या मूर्ती ज्या दरांत मिळतात त्याच्यापेक्षा कितीतरी स्वस्त ग्रामीण भागांत तेवढ्याच आकाराच्या मातीच्या मूर्ती मिळतात मग शहरांत मातीच्या मूर्ती एवढ्या महाग का विकल्या जातात, याकडेही सरकारने लक्ष द्यायला हवे. वाढत्या महागाईचा फटका यंदा गणेशमूर्तींनाही बसला असून प्लास्टर ऑफ पॅरिसच्या मूर्ती तर महाग झाल्याच आहेत सोबत मातीच्या मूर्तींचे दरही गगनाला भिडले आहेत.

**मोक्षदा घाणेकर**
**मुंबई**

### हिंदी भाषेच्या आडून नवा डाव

नवीन शैक्षणिक धोरणातल्या त्रिभाषा सूत्रानुसार राज्य सरकारने हिंदी हा विषय सक्तीचा केला आणि महाराष्ट्रात भाषिक संघर्षाची ठिणगी पडली मराठी विरुद्ध अन्य भाषिक असे स्वरुप त्याला आले वास्तविक पाहता हा संघर्ष भाषेसाठी नाही प्रामुख्याने सक्तीसाठी आहे हिंदी हि राष्ट्रभाषा असताना तीला राज्यांत सक्ती का करायची ? जे परंपरागत चालत आले आहे ते अगदी व्यवस्थितपणे असताना नाही ते मुद्दे उपस्थित करुन विनाकारण राजकारण करायचे हे नेत्यांच्या अंगवळणी पडलेले असते, त्यामुळे त्यांना काहीतरी नवनवीन विषय लागतात हेच यावरुन दिसून येते. महाराष्ट्राची मातृभाषा मराठी असताना येथे हिंदी लादायचे हे योग्य आहे का? हिंदी विरुद्ध मराठी हा जो मुद्दा पुढे आला आहे तो पूर्णपणे राजकीय वाटतो कारण आगामी काळात होऊ घातलेल्या पालिका, महानगर पालिका, जिल्हा आणि तालुका पंचायत समितीच्या सार्वत्रिक निवडणुकीत अमराठी लोकांची मते आपल्यालाचं मिळावीत या उद्देशाने सत्ताधाऱ्यांनी हा मुद्दा पुढे आणला असण्याची शक्यता नाकारता येत नाही. मुंबई ही देशाची आर्थिक राजधानी आहे. तिचे आंतरराष्ट्रीय स्तरावर नाव पोचले आहे. मुंबई आपल्या ताब्यात घेण्यासाठी हा सर्व अट्टाहास केला जात आहे का ? हा देखील सवाल उपस्थित होतो आहे. देशाच्या कानाकोपऱ्यातून रोजीरोटीसाठी आलेल्या अमराठी लोकांची मते घेण्यासाठी हिंदी भाषेच्या आडून सत्ताधारी नवीन डाव टाकतं आहेत मात्र आगामी काळात हा डाव परतून लावल्याशिवाय मराठी माणूस गप्प बसणारं नाही


**राजू जाधव**
**मांगूर, जि. बेळगाव**

# निकृष्ट खतांसंदर्भात तातडीने कठोर कारवाई करा

## केंद्रीय कृषिमंत्री शिवराजसिंह चौहान यांचे राज्यांना निर्देश

**वृत्तसंस्था/नवी दिल्ली**

केंद्रीय कृषी आणि शेतकरी कल्याण मंत्री शिवराजसिंह चौहान यांनी सर्व राज्ये व केंद्रशासित प्रदेशांच्या मुख्यमंत्र्यांना पत्र लिहून बनावट व निकृष्ट खतांच्या विरोधात तातडीने आणि कठोर कारवाई करण्याचे निर्देश दिले आहेत. देशभरात बनावट खतांची विक्री, अनुदानित खतांचा काळाबाजार तसेच सक्तीचे टॅगिंग यासारख्या बेकायदेशीर प्रकारांना आळा घालण्याच्या उद्देशाने हे पत्र पाठवण्यात आले आहे.



या पत्रात केंद्रीय मंत्री चौहान यांनी नमूद केले आहे की, कृषी हा भारताच्या अर्थव्यवस्थेचा कणा आहे. शेतकऱ्यांच्या उत्पन्नाला स्थैर्य लाभावे, यासाठी त्यांना योग्य वेळी, योग्य दरात आणि दर्जेदार खतांची उपलब्धता सुनिश्चित करणे आवश्यक आहे. खते (नियंत्रण) आदेश, १९८५ (जो आवश्यक वस्तू अधिनियम, १९५५अंतर्गत आहे) यानुसार बनावट व निकृष्ट खतांच्या विक्रीवर पूर्णपणे बंदी आहे, हेही त्यांनी स्पष्ट केले आहे.

### केंद्रीय कृषी मंत्र्यांनी राज्यांना केलेल्या सूचना

- काळाबाजार, जादा दराने विक्री आणि अनुदानित खतांचा अपमार्ग यांसारख्या प्रकारांवर राज्यांनी कठोर कारवाई करावी.
- खतांचे उत्पादन आणि विक्री यावर नियमित देखरेख ठेवावी. तसेच नमुना चाचणी व तपासणीद्वारे बनावट व निकृष्ट खतांवर कठोर नियंत्रण ठेवावे.
- रूढ खतांबरोबर जबरदस्तीने नॅनो खत किंवा बायो-स्टिम्युलंट उत्पादनांचे टॅगिंग तातडीने थांबवावे.
- दोषींवर परवाना रद्द करणे, एफआयआर नोंदवणे यासह कठोर कायदेशीर कारवाई करावी. तसेच दोषसिद्धीसाठी प्रभावी खटले चालवावेत.
- शेतकरी व शेतकरी गटांना या प्रक्रियेत सहभागी करून प्रतिसाद व माहिती यंत्रणा तयार करावी, तसेच शेतकऱ्यांना खरी व बनावट उत्पादने ओळखण्याबाबत जागृती करावी.

# द्वंद्वाची उत्तरे मिळतात तेच खरे प्रभावी साहित्य - डॉ. नीलम गोऱ्हे

## डॉ. आशुतोष जावडेकर यांचा काव्य प्रतिभा पुरस्काराने गौरव

**वृत्तसंस्था/पुणे**

माणसाच्या मनातील द्वंद्वाची उत्तरे जेव्हा साहित्यातून सापडतील तेव्हाच ते साहित्य अधिक प्रभावी ठरेल, असे प्रतिपादन विधान परिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी केले. संगीतकार, गीतकार, कवी, लेखक, डॉक्टर असे बहुआयामी व्यक्तिमत्त्व असलेल्या डॉ. आशुतोष जावडेकर यांनी राजकीय पार्श्वभूमी असूनही स्वतःची सर्जनशीलता जपली आहे; त्यांचे लिखाणही प्रभावी आहे. ते खऱ्या अर्थाने पु. ल. देशपांडे यांचा वारसा जपणारे आहेत, असे गौरवोद्‌गार विधान परिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी काढले.




रंगत-संगत प्रतिष्ठानतर्फे काव्य प्रतिभा पुरस्काराने प्रसिद्ध व्याख्याते, लेखक, कवी डॉ. आशुतोष जावडेकर यांचा डॉ. नीलम गोऱ्हे यांच्या हस्ते गौरव करण्यात आला. त्या वेळी डॉ. गोऱ्हे अध्यक्षपदावरून बोलत होत्या. ज्येष्ठ विचारवंत लेखक, कवी डॉ. राजा दीक्षित यांची प्रमुख उपस्थिती होती. रंगत-संगत प्रतिष्ठानचे अध्यक्ष ॲड. प्रमोद आडकर, मैथिली आडकर मंचावर होते. सन्मानपत्र, शाल, श्रीफळ असे पुरस्काराचे स्वरूप होते. नवी पेठेतील पत्रकार भवन येथे कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

तरुण पिढीमुळे सामाजिक-राजकीय परिवर्तन होत असल्याचे सांगून डॉ. नीलम गोऱ्हे म्हणाल्या, पुस्तक हेच प्रभावी माध्यम आहे इतर माध्यमे नाहीत, अशी सध्याची परिस्थिती नाही. समाजमाध्यमेही प्रभावी आहेत. समाजमाध्यमांद्वारे अर्थपूर्ण संवाद झाला पाहिजे. परस्परातील संवाद कमी झालेला असताना तो वाढविण्यासाठी रंगत-संगत प्रतिष्ठान विविध उपक्रमांच्या माध्यमातून प्रयत्न करीत असल्याबद्दल त्यांनी ॲड. प्रमोद आडकर यांचे कौतुक केले.

पुरस्कार वितरण सोहळ्यानिमित्त वातावरण वैचारिक आणि आनंददायी असल्याने सभात्यागाची भीती नाही, असे डॉ. नीलम गोऱ्हे यांनी सांगताच सभागृहात हशा पिकला. समाजमाध्यमावरील ट्रोलिंगचा मुद्द्याविषयी बोलताना त्या म्हणाल्या, ट्रोलिंग करण्यासाठी राजकारण्यांनी टोळ्या केल्या आहेत. त्या एक-दोन दिवस ट्रोल करतात पैसा संपला की थांबतात. मी मात्र अशा प्रकारापासून दूर आहे.

संतसाहित्यामुळे कवितेची ताकद कळल्याचे सांगून सत्काराला उत्तर देताना आशुतोष जावडेकर म्हणाले, श्रवणसुखाच्या मांडवात संगीतकार भेटले, काव्याला चाली देताना कवी भेटले. संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज आणि शेक्सपिअर साहित्याच्या क्षेत्रातील गुरू आहेत. काव्याच्या व्यासपीठावर हिणकस प्रकार सुरू आहेत. त्या मानाने समाजमाध्यमांवरील कविता चांगल्या आहेत. संपादनाचा अभाव असला तरी अभिव्यक्तीचे लोकशाहीकरण झाल्याचे जाणवते आहे. गीत, काव्य लिखाणाप्रमाणेच गद्य लिखाणातही लय असावी लागते. काव्य लिखाण हे शास्त्रच आहे ते जर पेलता आले नाही तर विस्फोटक ठरू शकते. कविता जगता आली पाहिजे, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली.

# पन्हाळगडाचे जतन, संवर्धनासाठी निधी देणार

## मंत्री प्रकाश आबिटकर यांचे आश्वासन

**वृत्तसंस्था/कोल्हापूर**

छत्रपती शिवरायांच्या कारकिर्दीत अनन्यसाधारण महत्त्व असणाऱ्या पन्हाळा किल्ल्याचा जागतिक वारसा स्थळांच्या यादीत समावेश होणे अभिमानाची व सन्मानाची बाब असून यामुळे पन्हाळगडाची ओळख जगभर पोहोचेल, असे सांगून सार्वजनिक आरोग्य मंत्री तथा कोल्हापूर जिल्ह्याचे पालकमंत्री प्रकाश आबिटकर म्हणाले की, नव्या पिढीसाठी प्रेरणादायी इतिहास असणाऱ्या पन्हाळगडाचा विकास आराखडा राज्य आणि केंद्र सरकारला सादर करण्यात येईल. याबरोबरच जिल्ह्यातील किल्ल्यांचे जतन व संवर्धन करुन अधिक संरक्षित करण्यासाठी शासनाच्या वतीने निधी उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्न करणार आहे, असे आश्वासन त्यांनी दिले.



जागतिक वारसास्थळांच्या यादीत पन्हाळा किल्ल्याचा समावेश झाल्याबद्दल जिल्ह्याचे पालकमंत्री प्रकाश आबिटकर यांनी पन्हाळा किल्ल्याला भेट देऊन किल्ल्यावर आनंदोत्सव साजरा केला. यावेळी पालकमंत्री आबिटकर यांनी पन्हाळगडावरील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या मंदिरातील शिवरायांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करुन अभिवादन केले. यानंतर त्यांनी ताराराणींच्या राजवाड्याला भेट देऊन विद्यार्थ्यांशी संवाद साधला. नंतर शूरवीर बाजीप्रभू देशपांडे यांच्या पुतळ्याला पुष्पहार घालून अभिवादन केले.

जागतिक वारसा स्थळांच्या यादीमध्ये पन्हाळा किल्ल्याचे नाव समाविष्ट झाल्याबद्दल प्रधानमंत्री नरेंद्र मोदी, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री अजित पवार यांना धन्यवाद देवून नागरिकांचे अभिनंदन केले.

पालकमंत्री आबिटकर म्हणाले, छत्रपती शिवरायांच्या अलौकिक इतिहासाची साक्ष देणाऱ्या पन्हाळा किल्ल्याचा समावेश युनेस्कोच्या जागतिक वारसास्थळांच्या यादीत झाल्यामुळे पन्हाळगडावर व जिल्ह्यात जगभरातील पर्यटकांचा ओघ वाढेल. तसेच येथील पर्यटनाला चालना मिळेल. पन्हाळगडाचा इतिहास नव्या पिढीला प्रेरणा देणारा असल्यामुळे या किल्ल्याचा विकास आराखडा तयार करुन किल्ल्याचा चांगल्या पद्धतीने विकास घडवण्यात येईल.

# बिहारच्या निवडणुकीत गैरप्रकाराचा डाव- राहुल गांधी

**वृत्तसंस्था/भुवनेश्वर**

बिहारमध्ये आगामी विधानसभा निवडणुकीत भाजपकडून गैरप्रकाचे प्रयत्न होत असल्याचा आरोप काँग्रेस नेते तथा लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी केला आहे. भाजपकडून देशभरात संविधानावर हल्ले होत आहेत, असा आरोपही त्यांनी केला.

भुवनेश्वर येथे पक्षाच्या संविधान बचाओ कार्यक्रमाला संबोधित करताना राहुल गांधी यांनी भाजपला लक्ष्य केले. भाजप सत्तेत असल्यावर सर्वसामान्यांकडे दुर्लक्ष करून केवळ भांडवलदारांसाठी काम करते. पाणी, जंगल आणि जमीन आदिवासींचे आहे आणि त्यांचेच राहील, असे ते म्हणाले. ओडिशाच्या भाजप सरकारने पंचायत कायदा, १९९६ अद्याप लागू केला नसल्याचा दावा राहुल यांनी केला. आदिवासींना वन हक्काचे पट्टे दिले जात नाहीत. काँग्रेसने पेसा आणि आदिवासी विधेयक आणले आहे. आम्ही हे कायदे लागू करू आणि आदिवासींना त्यांची जमीन मिळेल, याची खात्री करू, असे ते म्हणाले.

# जम्मूत ‘शहीद दिना’वर निर्बंध!

## माजी मुख्यमंत्री फारूख अब्दुल्ला यांना परवानगी नाकारली

**वृत्तसंस्था/श्रीनगर**

जम्मू आणि काश्मीरमध्ये १३ जुलै १९३१ रोजी डोगरा शासक हरिसिंह यांच्या विरोधात निदर्शनादरम्यान, श्रीनगर तुरुंगाबाहेर त्यांच्या सैन्याने केलेल्या गोळीबारात २२ जणांचा मृत्यू झाला होता. हा दिवस नॅशनल कॉन्फरन्स (एनसी) ‘शहीद दिवस’ म्हणून साजरा करू इच्छिते. परंतु जिल्हा प्रशासनाने कार्यक्रमाला परवानगी नाकारली आहे.

नॅशनल कॉन्फरन्सने अध्यक्ष फारुख अब्दुल्ला आणि इतर वरिष्ठ नेत्यांच्या वतीने अर्ज करून नवहट्ट येथील नक्षबंद साहिब स्मशानभूमीत श्रद्धांजली वाहण्याची योजना व्यक्त केली होती. परंतु, श्रीनगरच्या जिल्हा दंडाधिकाऱ्यांनी तो अर्ज फेटाळून लावला आहे.

श्रीनगर पोलिसांनी सोशल मीडियावर एक सार्वजनिक सूचना जारी केली ज्यामध्ये १३ जुलै रोजी ख्वाजा बाजार, नवहट्टाकडे जाणाऱ्या सर्व लोकांना परवानगी देण्यात आलेली नाही. यासोबतच प्रशासनाच्या सूचनांचे पालन करण्याचे आणि कोणत्याही प्रकारचे उल्लंघन टाळण्याचे आवाहन करण्यात आले. एका वृत्तसंस्थेच्या वृत्तानुसार, पोलिसांनी आदेशांचे उल्लंघन झाल्यास कायद्यानुसार कठोर कारवाई केली जाईल असा इशारा दिला. एनसीने प्रशासनाच्या या हालचालीला ह्यअत्यंत दुर्दैवी म्हटले आहे, असे त्यांनी म्हटले.

पीडीपी प्रमुख मेहबूबा मुफ्ती म्हणाल्या की, विधानसभा अध्यक्ष अब्दुल रहीम राथेर यांनी प्रथम १३ जुलैला सुट्टी जाहीर करण्याचा पीडीपीचा प्रस्ताव नाकारला आणि नंतर तोदेखील नाकारला, तर त्याच सभापतींनी आधीच दोन सरकारी प्रस्तावांना मान्यता दिली आहे. मेहबूबा यांनी सोशल मीडियावर बोलताना, ‘जेव्हा सभापतींनी त्यांच्या विवेकबुद्धीचा वापर करून पहिले दोन ठराव मंजूर केले, तेव्हा शहिदांना सन्मानित करण्याचा ठराव का थांबवण्यात आला? लोकांनी स्वतः निर्णय घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले.

# गुजरात पूल दुर्घटनेतील मृतांची संख्या वाढली

**वृत्तसंस्था/गांधीनगर**

वडोदरा आणि आणंदला जोडणाऱ्या ४० वर्षे जुन्या पुलाचा काही भाग महिसागर नदीत कोसळल्याने आतापर्यंत १७ जणांचा बळी गेला आहे. मृतांचा आकडा वाढत आहे. अजूनही काहीजण बेपत्ता असून, त्यांचा शोध युद्धपातळीवर सुरू आहे. या प्रकरणात आतापर्यंतच चार अधिकाऱ्यांचे निलंबन करण्यात आले आहे.

पाद्रा शहराजवळील गंभीरा गावाजवळ घडलेल्या या भीषण दुर्घटनेने संपूर्ण राज्य हादरले. घटनेनंतर गुजरात सरकारने तातडीने कठोर पाऊले उचलत रस्ते आणि इमारत विभागाच्या चार अभियंत्यांना निलंबित केले. मुख्यमंत्री भूपेंद्र पटेल यांनी या कारवाईचे आदेश दिले.

राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दल (एनडीआरएफ ) आणि राज्य आपत्ती प्रतिसाद दलची (एसडीआरएफ) पथके अहोरात्र बचावकार्य करत आहेत, मात्र संततधार पाऊस आणि नदीतील खोल चिखल बचावकार्यात मोठे आव्हान निर्माण करत आहे. पावसामुळे आणि दलदलीमुळे यंत्रसामग्रीचा वापर करणे कठीण झाले आहे, असे वडोदराचे जिल्हा दंडाधिकारी अनिल धामेलिया यांनी सांगितले.

## मनोरंजन

# दृष्टांचा संहार करण्यासाठी आली ‘तारिणी’

### शिवानी सोनार मुख्य भूमिकेत

**मुंबई :** मालिकांच्या जगात आता ॲक्शनपॅक्ड अध्याय सुरू होणार आहे. याला कारण आहे नवीन मालिका तारिणी. शिवानी सोनार या मालिकेत मुख्य भूमिकेत दिसते आहे. या मालिकेचा हटके प्रोमो नुकताच समोर आला आहे. शिवानी शिवाय या मालिकेत अभिज्ञा भावे दिसते आहे. याशिवाय एन स्वराज नावाचा अभिनेताही शिवानी सोनारसोबत या मालिकेत दिसणार आहे.

तारिणीचा प्रोमो सोशल मिडियावर तूफान व्हायरल होतो. शिवानीला अशा डॅशिंग अवतारात बघून तिचे चाहते खुश झाले आहेत. मालिका हटके संकल्पना घेऊन समोर आली आहे. घर आणि करियर याचा सुंदर संगम साधणारी तारिणी यात दिसते. तारिणी ही व्यक्तीरेखा स्पेशल क्राइम युनिट ऑफिसरची आहे. मालिका कधी सुरू होणार आणि वेळ काय असणार हे अजून समोर आलेले नाही.

या मालिकेचा प्रोमो रिलीज झाल्यानंतर कोणती मालिका निरोप घेणार याची चर्चा चाहत्यांनी सुरू केली आहे. काहीजणांनी लाखात एक आमचा दादा ही सिरियल निरोप घेईल असे लिहिले आहे तर काहीनी शिवा या मालिकेची वेळ बदलून तारिणी ही मालिका सुरू करतील असे लिहिले आहे.



या मालिकेत शिवानीसोबत दिसणारा चेहरा म्हणजे अभिनेता स्वराज नागरगोजे. स्वराज यापूर्वी अनेक मालिकांमध्ये सहकलाकाराच्या भूमिकेत दिसला आहे. सजनी शिंदे का व्हायरल व्हीडियो या सिनेमात तसेच तुझी माझी जमली जोडी या मराठी मालिकेतही काम केले आहे. व्हीडियो व्हायरल होताच शिवानीच्या फॅन्स तसेच सहकालाकरांनी तिला शुभेच्छा दिल्या आहेत. पूर्वा राजेंद्र शिंदे म्हणते, खूप छान, शुभेच्छा आणि अभिनंदन. तर सुमित पुसावळेने कडक ! अशी कमेंट करत शिवानीचे कौतुक केले आहे.

### ज्येष्ठ अभिनेते कोटा श्रीनिवास राव यांचे निधन

**हैदराबाद :** ज्येष्ठ अभिनेते, विनोदी कलाकार आणि माजी आमदार कोटा श्रीनिवास राव यांचे



रविवारी सकाळी हैदराबाद येथे दीर्घ आजाराने निधन झाले. ते ८३ वर्षांचे होते. त्यांना २०१५ मध्ये भारत सरकारने पद्मश्री पुरस्काराने सन्मानित केले होते. १९९९ मध्ये त्यांनी भाजपमध्ये प्रवेश केला आणि एकत्रित आंध्र प्रदेशातील विजयवाडा ईस्ट मतदारसंघातून आमदार म्हणून निवडून आले. कोटा या नावाने प्रसिद्ध असलेल्या श्रीनिवास राव यांनी आपल्या अभिनय कारकीर्दीची सुरुवात रंगभूमी कलाकार म्हणून केली होती. कोटा श्रीनिवास राव यांचा जन्म १० जुलै १९४२ रोजी आंध्र प्रदेशातील विजयवाडा शहराजवळील कंकीपाडू या गावात झाला. त्यांनी १९७८ मध्ये प्रणम खरीडू या चित्रपटातून चित्रपट सृष्टीत पदार्पण केले. मात्र प्रतिकारण या चित्रपटातील कसैय्या या पात्राने त्यांना खरी प्रसिद्धी मिळवून दिली. तेलुगू चित्रपटसृष्टीत कोटा श्रीनिवास राव आणि दुसरे माजी आमदार बाबू मोहन यांची विनोदी जोडी खूप गाजली होती. कोटा श्रीनिवास राव, भाजप नेते आले नरेंद्र आणि काँग्रेस नेते द्रोणम राजू सत्यनारायण हे तेगिंपु या चित्रपटात झळकले होते, ज्यात भानुचंदर मुख्य भूमिकेत होते.

आंध्र प्रदेशचे मुख्यमंत्री एन चंद्राबाबू नायडू यांनी ट्विट केले की, आपल्या बहुमुखी भूमिकांनी चित्रपट प्रेक्षकांचे प्रेम जिंकणारे प्रसिद्ध अभिनेते कोटा श्रीनिवास राव यांचे निधन अत्यंत दुःखद आहे.

### सीझननुसार मानधन वाढते का?

#### प्रल्हादने उघड केले वेबसीरिजचे आर्थिक गणित

**मुंबई :** सगळ्या सीझनमध्ये प्रेक्षकांच्या वाढत्या प्रेमाचा अनुभव घेणारी सिरिज म्हणजे पंचायत. गावाच्या अतरंगी वातावरणात पुन्हा नेऊन पंचायतने प्रेक्षकांना कधी हसवले तर कधी रडवले. अलीकडेच या सिरिजचा चौथा सीझन येऊन गेला. ही सिरिज आतापर्यंत देशात सर्वात जास्त बघितली गेलेली सिरिज आहे. या सिरिजमधल्या प्रत्येक पात्राबद्दल प्रेक्षकांना कुतूहल आहे. हे कलाकार कसे आहेत? त्यांची ऑफ स्क्रीन - ऑन स्क्रीन मैत्री कशी आहे? या कलाकारांची पार्श्वभूमी कशी आहे? तसेच प्रत्येक भागासाठी कलकारांना किती मानधन मिळते? अशी प्रत्येक बाब जाणून घेण्याची उत्सुकता असते.

मधल्या काळात पंचायतच्या कलाकारांना किती मानधन मिळते याबाबत समोर आले होते. पण आता प्रत्येक सीझनवर मानधन वाढते या प्रश्नावर प्रल्हादच्या भूमिकेत असलेले फैसल मलीक यांनी खुलासा केला आहे. चौथ्या सीझनमध्ये सर्वात जास्त मानधन सचिव जी म्हणजेच जितेंद्र कुमार यांनी घेतले होते. त्यांनंतर निना गुप्ता, रघुबीर यादव असे कलाकार आहेत. जितेंद्र यांना सत्तर हजार, निना गुप्ता ५० हजार तर रघुबीर यादव ४० हजार पर एपिसोड फी मिळत होती. तर फैसल मलीक आणि चंदन रॉय यांना प्रत्येक एपिसोड मागे २० हजार इतके मानधन मिळायचे.

# लवकरच ‘दूध का दूध, पाणी का पाणी’ होणार

## रोहित पवार यांनीही थोपटले दंड

**वृत्तसंस्था/मुंबई**

न्यायदेवतेवर माझा पूर्ण विश्वास असून यामध्ये ‘दूध दूध आणि पाणी का पाणी’ होईल, असे राष्ट्रवादी (शरद पवार) पक्षाचे आमदार रोहित पवार आपण लढणार असल्याचे स्पष्ट केले आहे.

कुणाचे आणि काय ऐकले नाही म्हणून माझ्याविरोधात ईडीने कारवाई केली हे जगजाहीर आहे, याबाबत अधिक सांगण्याची गरज नाही. ईडीचे अधिकारी बिचारे आदेशाचे धनी, त्यांनी केवळ आलेल्या आदेशाचे पालन केले आणि आता आरोपपत्रही दाखल केल्याचे आ. रोहित पवार म्हणाले. ईडी आरोपपत्र दाखल केले असले तरी ईडीला दोष न देता ते आदेशाचे धनी असल्याचे म्हटले आहे.

तपास पूर्ण झाला असून ज्याची आपण वाट बघत होतो, त्या निर्णयाचा चेंडू आता न्यायव्यवस्थेच्या कोर्टात आहे. कारण न्यायदेवतेवर माझा पूर्ण विश्वास असून यामध्ये ‘दूध दूध आणि पाणी का पाणी’ होईलच. विचारांसाठी कितीही संघर्ष करावा लागला तरी माझी तयारी आहे. महाराष्ट्राने लाचारीला आणि फितुरीला कधीही थारा दिला नाही आणि संघर्षालाच डोक्यावर घेतले आहे, हा इतिहास असल्याचे आ. रोहित पवार यांनी म्हटले आहे.

# कुख्यात गँगस्टर पवित्र सिंगसह आठ जणांना अटक

## अमेरिकेत खलिस्तानी नेटवर्कवर एफबीआयचा प्रहार

**वृत्तसंस्था/चंदिगड**

अमेरिकेत बसून भारतातून फरार झालेल्या खलिस्तानी दहशतवादी आणि गुंडांवर एफबीआयने कारवाईचा फास आवळला आहे. एफबीआय व स्थानिक एजन्सींनी कॅलिफोर्नियातील सॅन जोक्विन काउंटीमध्ये भारतीय वंशाच्या आठ खलिस्तान समर्थक गुंडांना अटक करण्यात आली.

स्टॉकटन, मँटेका आणि स्टॅनिस्लॉस काउंटीच्या स्वॅट टीम्स आणि एफबीआयच्या विशेष युनिटच्या मदतीने हे ऑपरेशन करण्यात आले. ही कारवाई खलिस्तानी नेटवर्कवर नियंत्रण मिळवण्याच्या दिशेने एक महत्त्वाचे पाऊल मानले जात आहे.

अटक करण्यात आलेल्या आरोपींमध्ये खलिस्तान समर्थक दिलप्रीत सिंग, अर्शप्रीत सिंग, अमृतपाल सिंग, विशाल, पवित्र सिंग उर्फ पवित्र बटाला, गुरताज सिंग, मनप्रीत रंधावा आणि सरबजीत सिंग यांचा समावेश आहे. या सर्वांविरूद्ध वेगवेगळे फौजदारी गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

या सर्व दहशतवाद्यांवर अपहरण, छळ, बेकायदेशीर कैद, गुन्हेगारी कट रचणे, साक्षीदारांना धमकावणे, सेमी-ऑटोमॅटिक शस्त्राने हल्ला करणे, दहशत पसरवण्याची धमकी देणे, गँग कायद्यांतर्गत गुन्हे, मोठ्या प्रमाणात अवैध शस्त्रे बाळगणे, मशीन गन आणि असॉल्ट रायफल बाळगणे, शॉर्ट-बॅरल रायफल बनवणे आणि अवैध मॅगझिन विकणे यासारखे गंभीर आरोप दाखल करण्यात आले आहेत. सर्व आरोपींची चौकशी केल्यानंतर त्यांना अमेरिकेतील तुरुंगात हलवण्यात आले आहे.

### सहा महिन्यांपूर्वी रेड कॉर्नर नोटीस जारी

**पंजाबच्या माझा परिसरात हत्या, हत्येचा प्रयत्न, शस्त्रांची तस्करी आणि खंडणीच्या प्रकरणांमध्ये सामील असलेल्या पवित्र सिंग उर्फ पवित्र बटाला याच्या विरोधात सुमारे सहा महिन्यांपूर्वी बटाला पोलिसांनी रेड कॉर्नर नोटीस जारी केली होती. पवित्र सिंग हा अमृतसर जिल्ह्यात सहा आणि बटाला जिल्ह्यात दाखल असलेल्या दोन प्रकरणांमध्ये वॉन्टेड आहे. पवित्र बटाला हा बब्बर इंटरनॅशनलशी संबंधित आहे. तो खलिस्तानी दहशतवादी लखबीर सिंग रोडेसोबत मिळून दहशतवादी कारवाया चालवत होता.**

# देशभर मतदार यादी पुनरीक्षणाची तयारी

## निवडणूक आयोगाने सुरू केले काम : महाराष्ट्रात नवमतदारांचा टक्का वाढला

**वृत्तसंस्था/नवी दिल्ली**

पुढील महिन्यापासून संपूर्ण भारतभर मतदार यादीच्या विशेष पुनरीक्षणची तयारी निवडणूक आयोगाने सुरू केली आहे. हे पुनरीक्षणा बिहारमध्ये सुरू असलेल्या विशेष पुनरीक्षणासारखीच असेल. गेल्या आठवड्यात सर्वोच्च न्यायालयाने याला संवैधानिक जबाबदारी म्हणून घोषित केले आणि बिहारमध्ये निवडणूक आयोगाला ही प्रक्रिया सुरू ठेवण्याची परवानगी दिली तेव्हा निवडणूक आयोगाने हे पाऊल उचलले आहे.




काही विरोधी पक्ष आणि इतर संघटनांनी निवडणूक आयोगाच्या या निर्णयाविरुद्ध सर्वोच्च न्यायालयात या सुधारणांना आव्हान दिले होते. त्यात असे म्हटले होते की, यामुळे पात्र नागरिकांना मतदानाचा अधिकार मिळू शकतो.

आता काही राज्य निवडणूक अधिकाऱ्यांनी त्या राज्यांमध्ये केलेल्या शेवटच्या विशेष सुधारणानंतर प्रकाशित केलेली मतदार यादी सार्वजनिक केली आहे. २००८ ची मतदार यादी दिल्लीच्या मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांच्या वेबसाइटवर उपलब्ध आहे, जेव्हा राष्ट्रीय राजधानीत शेवटची सुधारणा करण्यात आली होती. उत्तराखंडमध्ये शेवटची सुधारणा २००६ मध्ये करण्यात आली होती आणि आता त्या वर्षाची यादी राज्याच्या वेबसाइटवर आहे.

निवडणूक आयोगाने म्हटले आहे की २८ जुलै रोजी बिहार प्रकरणाची सुनावणी झाल्यानंतर, ते देशव्यापी पुनरीक्षणाचा अंतिम निर्णय घेईल. या प्रक्रियेअंतर्गत, परदेशी बेकायदेशीर स्थलांतरितांना त्यांचे जन्मस्थान तपासून काढून टाकले जाईल.

### कुठे असतील आगामी निवडणुका?

**बिहारमध्ये या वर्षी विधानसभा निवडणुका होणार आहेत. तर पुढील वर्षी आसाम, केरळ, पुदुचेरी, तामिळनाडू आणि पश्चिम बंगालमध्ये विधानसभा निवडणुका होणार आहेत. बांगलादेश आणि म्यानमारसह अनेक राज्यांमध्ये बेकायदेशीर परदेशी स्थलांतरितांविरुद्ध केलेल्या कारवाईच्या पार्श्वभूमीवर देशव्यापी मतदार यादी पुनरीक्षण करण्याचा निवडणूक आयोगाचा निर्णय यासाठी महत्त्वाचा आहे.**

हे दैनिक, **लोकशाही पब्लिकेशन्स प्रा. लि.** करिता **प्रकाशक - सौ. प्रज्ञा संजय हेडा** यांनी, **मुद्रक - श्री. अरुण श्यामराव जोशी** यांच्या, देश पब्लिकेशन, इ-30 /2, स्पोर्टस् कॉम्प्लेक्स मागे, हिंगणा एम.आय.डी.सी. नागपूर - 440016 येथे मुद्रित करून, थर्ड फ्लोअर, थापर एनक्लेव्ह - II, 148, युनिव्हर्सिटी लायब्ररी रोड, रामदासपेठ, नागपूर - 440010 येथे प्रसिद्ध केले. **RNI No.- MAHMAR/2010/35482. व्यवस्थापकीय संचालक - * सौ. प्रज्ञा संजय हेडा** ( * पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.) **दूरध्वनी क्र.** 0712-2424244, 0712-4043332.
**E-Mail : editorial@lokshahivarta.in.** (लोकशाही वार्तामधील सर्व लेखांचे हक्क राखून ठेवले आहेत. तसेच लोकशाही वार्ताशी संबंधित कुठलेही वाद केवळ नागपूर न्यायालयाच्या कार्यकक्षेतच राहतील.)

# रोहयोच्या नावावर कोट्यवधींचा गैरव्यवहार

## यवतमाळ जिल्ह्यात दोघांवर गुन्हे दाखल

**लोकशाही वार्ता/ यवतमाळ**

रोजगार हमी योजनेचे काम मिळवून देतो, असे आमिष दाखवून मजुरांकडून आधारकार्ड, फोटो घेण्यात आले. त्यांचे बँकेत खातेही उघडले गेले. त्या खात्यांत परस्पर कोट्यवधी रुपयांचे आर्थिक व्यवहार करण्यात आले. या खात्याच्या माध्यमातून काळा पैसा वापरण्यात येत असल्यावरून पांढरकवडा पोलिसांनी दोघांवर गुन्हे दाखल केले आहेत.



आरोपी मयूर राजेश चव्हाण (वय २३) रा. चोपण ता. केळापूर व मनोहर राठोड (वय ४५) रा. जरंग ता. घाटंजी या दोघांनी परिसरातील मजुरांना रोजगार हमी योजनेचे काम मिळवून देण्याचे आमिष दाखवून त्यांच्याकडून फोटो, आधारकार्ड घेऊन त्यांच्या नावाने पांढरकवडा येथील बँक ऑफ महाराष्ट्रमध्ये खाती उघडली.

या मजुरांच्या खात्यात १४ मार्च ते ३० जूनदरम्यान यूपीआयद्वारे कोट्यवधी रुपये जमा झाले. याच पद्धतीने ते काढून घेण्यात आले. गावातील मजुरांना त्यांच्या बँक खात्यातून व्यवहार होत आहे, याबद्दल काहीच माहीत नव्हते. श्रीकांत गणपत कर्लावार रा. वाघोली ता. केळापूर यांचेही खाते आरोपीनी बँक ऑफ महाराष्ट्रमध्ये उघडले होते. त्यांच्या खात्यात १ कोटी १२ लाख ८५ हजार १३४ रुपये जमा करण्यात आले. त्याच दिवशी सर्व रक्कम वेगवेगळ्या खात्यात वळती करण्यात आली.

श्रीकांत कर्लावार यांना आपल्या खात्यातून एक कोटींची रक्कम काढल्या गेल्याचे कळताच त्यांना धक्का बसला. गावातील इतर मजुरांनाही माहिती मिळताच बँकेत धाव घेतली. तेव्हा त्यांना त्यांच्या खात्यातही कोट्यवधींचे आर्थिक व्यवहार झाल्याचे समजले. त्यानंतर पोलिसांमध्ये तक्रार दाखल झाली.

दरम्यान, गुन्हे दाखल झालेले मयूर चव्हाण व मनोहर राठोड हे केवळ मोहरे असून, मुख्य सूत्रधार वेगळाच असल्याची चर्चा आहे. यात काळा पैसा वापरण्यात आल्याचा संशय पोलिसांना आहे. तपासात आरोपींची संख्या वाढू शकते.

### बँक अधिकारी संशयाच्या फेऱ्यात

**या आर्थिक व्यवहारामध्ये बँक अधिकारी संशयाच्या फेऱ्यात अडकले आहेत. झिरो बॅलन्स खाती उघडण्यात आली. मजुरांकडे पॅनकार्ड नाही, तरीही त्यांच्या बचत खात्यातून लाखोंचे, कोट्यवधींचे व्यवहार होत होते. एकदाही संशय बँक अधिकाऱ्यांना आला नाही. आरोपींनी मजुरांचे आधार कार्ड व फोटो घेऊन परस्पर बँकेत खाती कशी उघडली? खातेदारांचा मोबाइल क्रमांक व पॅनकार्ड नसताना बँकेने खाती कशी उघडली? अशी चर्चा आहे.**

# हळदीच्या दिवशीच डॉक्टर तरुणाचा मृत्यू

- रुग्णावर उपचारासाठी निघाला असताना अपघात
- बोहल्यावर चढण्याआधीच काळाने साधला डाव
- बुलडाणा जिल्ह्यातील शोकांतिका



**लोकशाही वार्ता/बुलडाणा**

एका डॉक्टर तरुणाच्या लग्नाची १३ जुलै २०२५ ही तारीख ठरली. लग्नपत्रिका वाटण्यापासून ते पूर्वतयारी तो स्वतःच करू लागला. दरम्यान, रुग्णावर उपचाराकरिता जाताना अज्ञात वाहनाने धडक दिल्याने अपघातात तो गंभीर जखमी झाला. नियतीला हे लग्न मान्य नसावे. उपचारादरम्यानच, प्राणज्योत मालवली. रविवारी लग्न असताना, शनिवारी हळदीच्या दिवशी मुलावर अंत्यसंस्कार करण्याची वेळ कुटुंबीयांवर आली.

अमोल शिवानंद मुंढे (वय २७), असे या तरुणाचे नाव आहे. बुलडाणा जिल्ह्यातील देऊळगाव राजा तालुक्यातील धोत्रा नंदई येथील रहिवासी असलेला डॉ. अमोल अमरावती जिल्ह्यातील भुईखेड येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात वैद्यकीय अधिकारी म्हणून कर्तव्यावर होता. त्याचे लग्न जुळले होते. घरात आनंदी वातावरण होते. लग्नाची तारीख जवळ येत असल्याने तयारीची धावपळ सुरू होती. दरम्यान, तळेगाव आरोग्य केंद्रात गंभीर रुग्णावर अतितातडीचे उपचार करण्यासाठी डॉ. अमोल दुचाकीने निघाला. मात्र, अज्ञात वाहनाने धडक दिल्याने अमोल गंभीर जखमी झाला. वेळीच मदत न मिळाल्याने प्रचंड रक्तस्त्राव झाला. नागपूर येथे त्याच्यावर उपचार सुरू होते. डॉक्टरांना त्याला वाचविण्यात अपयश आले.

### गावात शोककळा


**अमोल यांचा विवाह सोहळा यवतमाळ जिल्ह्यातील नेर येथे १३ जुलै रोजी ठरला होता. कुटुंबीयांनी लग्नाची तयारी चालविली होती. लग्न वीस दिवसांवर असताना अमोलचा अपघातानंतर मृत्यू झाला. यामुळे अमोलच्या कुटुंबीयांवर मोठा आघात झाला. या घटनेमुळे गावात शोककळा पसरली आहे. मनाला चटका लावणारी ही घटना घडल्याने हळहळ व्यक्त होत आहे.**

# शेतकऱ्याचे शोले स्टाईल आंदोलन

**लोकशाही वार्ता/ बुलडाणा**

बुलडाणा जिल्ह्यातील भोसा येथील विष्णू चंदनसे यांनी सौर पंपासाठी पैसे भरूनही आठ महिने पंप न मिळाल्याने महावितरणविरोधात

त्यांनी शोले स्टाईल आंदोलन केले. गावकऱ्यांनी मध्यस्थी केल्यानंतर आणि अधिकाऱ्यांनी पंप देण्याचे लेखी आश्वासन दिल्यावर ते खाली उतरले.



भोसा येथील विष्णू राजाराम चंदनसे या शेतकऱ्याने 'मागेल त्याला पंप' या सौर योजनेत पैसे भरूनही पंप न मिळाल्याने हे शोले स्टाइल आंदोलन केले. गावातील टॉवरवर चढून महावितरण विरोधात निषेध व्यक्त केला. सौर पंपासाठी पैसे भरून आठ महिने उलटले तरी पंप न मिळाल्याने ते संतप्त झाले होते. युवा सेना तालुकाप्रमुख आणि मनसे जिल्हाध्यक्षांनी लेखी आश्वासन घेतल्यानंतर तीन तासांनी ते खाली उतरले.

विष्णू राजाराम चंदनसे यांनी सौर पंपासाठी अर्ज केला होता. त्यांचा अर्ज मंजूरही झाला. पंप घेण्यासाठी त्यांनी पैसे भरण्याची अट होती. त्यामुळे त्यांनी तत्काळ पैसे भरले. पैसे भरण्यासाठी त्यांना अडचणी आल्या. पत्नीचे दागिने विकावे लागले. दरम्यान, या योजनेत काहीतरी गडबड असल्याचा आरोप त्यांनी केला. एका दलालाने पाच हजार रुपयांची मागणी केली, असा त्यांचा आरोप आहे. पैसे भरून आठ महिने झाले, तरी त्यांना पंप मिळाला नाही. त्यामुळे ते थेट टॉवरवर चढले. शेतकरी टॉवरवर चढल्याची बातमी गावात पसरली. महावितरणचे अभियंते आणि कर्मचारी तातडीने घटनास्थळी पोहोचले. त्यांनी खाली उतरण्याची विनंती केली. मात्र, चंदनसे आपल्या भूमिकेवर ठाम होते. युवा सेनेचे तालुकाप्रमुख आकाश घोडे आणि मनसेचे जिल्हाध्यक्ष लक्ष्मण जाधव यांनी या प्रकरणात मध्यस्थी केली.

# आजीची निर्घृण हत्या करणाऱ्या नातवाला जन्मठेपेची शिक्षा

## यवतमाळ जिल्हा न्यायालयाचा निकाल

**लोकशाही वार्ता/यवतमाळ**

बकऱ्या चरायला घेऊन जा, असे सांगणाऱ्या आपल्याच जन्मदात्या आजीवर कुऱ्हाडीने निर्घृण हल्ला करणाऱ्या नातवाला जन्मठेपेची शिक्षा सुनावण्यात आली आहे. यवतमाळ अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायालयाने या क्रूर कृत्यासाठी आरोपीला दोषी ठरवत त्याला १० हजार रुपयांचा दंडही ठोठावला. नितीन मोरेश्वर राऊत (वय २१, रा. अंतरगाव, ता. राळेगाव), असे शिक्षा झालेल्या आरोपीचे नाव आहे.



राळेगाव तालुक्यातील अंतरगाव येथे १० डिसेंबर २०१९ रोजी घडलेल्या या घटनेने संपूर्ण परिसर हादरला होता. आरोपी नितीन आणि त्याची आजी शकुंतलाबाई मारोती राऊत (वय ७०) यांच्यात नेहमीच किरकोळ कारणांवरून वाद होत असत. घटनेच्या दिवशी सकाळी, शकुंतलाबाई यांनी नितीनला बकऱ्या चारायला घेऊन जाण्यास सांगितले. मात्र, त्याने नकार दिल्याने आजी त्याच्यावर रागावल्या.

याचाच राग मनात धरून संतापलेल्या नितीनने घरात असलेली कुऱ्हाड उचलली आणि आपल्या आजीवर सपासप वार केले, ज्यात त्यांचा जागीच मृत्यू झाला. याप्रकरणी नितीनचे वडील मोरेश्वर राऊत यांनी राळेगाव ठाण्यात फिर्याद दिली होती.

पोलिसांनी आरोपी नितीनविरोधात भारतीय दंड संहितेच्या कलम ३०२ अन्वये खुनाचा गुन्हा दाखल केला. पोलिस उपनिरीक्षक दिलीप पोटभरे यांनी या गुन्ह्याचा सखोल तपास करून न्यायालयात दोषारोपपत्र सादर केले. अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायाधीश एस. यू. बघेले यांच्यासमोर या खटल्याची सुनावणी झाली. सरकारी पक्षातर्फे एकूण ९ साक्षीदार तपासण्यात आले. यामध्ये, मृतदेहाचे शवविच्छेदन करणाऱ्या डॉक्टरांची साक्ष अत्यंत महत्त्वपूर्ण ठरली. सहायक सरकारी वकील मंगेश गंगलवार यांनी केलेला प्रभावी युक्तिवाद आणि सादर केलेले भक्कम पुरावे ग्राह्य मानून न्यायालयाने आरोपी नितीन राऊत याला दोषी ठरवत जन्मठेप आणि दंडाची शिक्षा सुनावली.

# 'सात-बारा कोरा यात्रे'ला उद्धव ठाकरेंचा पाठिंबा

## ठाकरे गटाचे नेते भास्कर जाधव आज येणार

**लोकशाही वार्ता/अमरावती**

शेतकऱ्यांच्या प्रश्नांकडे सरकारचे लक्ष वेधण्यासाठी प्रहार जनशक्ती पक्षाचे अध्यक्ष आणि माजी राज्यमंत्री बच्चू कडू यांनी १३८ किलोमीटरची पदयात्रा काढली आहे. महाराष्ट्र नवनिर्माण सेनेपाठोपाठ आता शिवसेना (उद्धव ठाकरे) पक्षानेही या पदयात्रेला पाठिंबा दिला आहे.



शिवसेना ठाकरे गटाचे नेते भास्कर जाधव आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या शरद पवार गटाचे आमदार रोहित पाटील हे उद्या १४ जुलै रोजी यवतमाळ जिल्ह्यातील महागाव तालुक्यातील अंबोडा येथे आयोजित समारोपीय सभेला उपस्थित राहणार आहेत, अशी माहिती प्रहार जनशक्ती पक्षातर्फे देण्यात आली.

देशाचे माजी कृषीमंत्री डॉ. पंजाबराव देशमुख यांचे जन्मगाव पापळ येथून प्रहार जनशक्ती पक्षाचे अध्यक्ष तथा माजी राज्यमंत्री बच्चू कडू यांच्या नेतृत्वाखाली यात्रेला सुरुवात झाली. चिलगव्हाण या स्व. साहेबराव करपे यांच्या गावामध्ये या यात्रेची सांगता होणार आहे. दरम्यान, मनसेचे नेते बाळा नांदगावकर हे यवतमाळ जिल्ह्यातील दारव्हा तालुक्यातील लालखिंड येथे बच्चू कडू यांच्या पदयात्रेत सहभागी झाले होते.

# आर्थिक विवंचनेतून महिलेने संपवले जीवन

## नागभीड तालुक्यातील दुर्दैवी घटना

**लोकशाही वार्ता/नागभीड**

नागभीड तालुक्यातील कोटगाव येथे आर्थिक अडचणीत सापडलेल्या वैशाली श्रावण मोहरकर (वय ४५) या महिलेने गावातील नाल्यात उडी घेऊन आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना घडली. वैशाली यांचे प्रेत बोथली येथील नाल्यात तरंगताना स्थानिक नागरिकांना दिसून आले. त्यांनी तात्काळ नागभीड पोलिसांना याची माहिती दिली. पोलिसांनी घटनास्थळी येऊन मृतदेह ताब्यात घेतला. प्रेताचा पंचनामा केला असून, उत्तरीय तपासणीसाठी प्रेत नागभीड ग्रामीण रुग्णालयात पाठविण्यात आले.

मृतक वैशालीचे पती श्रावण मोहरकर हे कोटगाव येथील कृषक वसतिगृहात गेली २५ वर्षे अल्पवेतनावर अधीक्षक म्हणून कार्यरत आहेत. मात्र, सामाजिक न्याय विभागाकडून गेल्या मार्च महिन्यापासून त्यांना पगार मिळालेला नाही. यामुळे संपूर्ण कुटुंबावर आर्थिक संकट ओढवले होते. आर्थिक विवंचना सहन न झाल्याने वैशाली यांनी आत्महत्या केल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे. त्यांच्या पश्चात पती आणि दोन मुलांचा परिवार आहे. या कुटुंबाच्या आर्थिक मदतीसाठी शासनाने तातडीने पावले उचलावी, अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे.

# अमरावती ग्रामीण भागात आढळले पिण्याच्या पाण्याचे ५४ दूषित नमुने



**लोकशाही वार्ता/अमरावती**

अमरावती जिल्ह्याच्या ग्रामीण भागातील पिण्याचे पाणी नागरिकांच्या जीवावर उठले आहे. दरवर्षी पावसाळ्याच्या तोंडावर ग्रामीण भागातील नमुने घेऊन त्याचे रासायनिक व जैविक परीक्षण केले जाते. त्यानुसार जिल्ह्यातील काही ठिकाणांहून ५ हजार ८६७ नमुने घेण्यात आले. परीक्षण काहीसे धक्कादायक असून, त्यापैकी ५४ नमुने दूषित आढळून आले आहेत.

जिल्हा परिषदेचा आरोग्य विभाग जागा झाला असून, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सुरेश आसोले यांनी त्या-त्या ठिकाणच्या आरोग्य यंत्रणेला दक्षतेच्या सूचना दिल्या आहेत. ज्या ठिकाणच्या पाण्याचे नमूने दुषित आढळून आले, तो स्त्रोत काही काळासाठी बंद करण्यात आला आहे. नागरिकांना व्यवस्था करुन देण्यात आली आहे. सर्व ठिकाणच्या पाणी स्त्रोतांची पाहणी करुन जलशुद्धीकरणासाठी आवश्यक ती पावले उचलण्यात आली आहे.जिल्हा परिषदेच्या नोंदीनुसार, एकूण ५ हजार ८६७ नमुने घेण्यात आले होते. त्यापैकी २ हजार ११३ नमुन्यांचे रासायनिक, तर ३ हजार ७९६ नमुन्यांचे जैविक परीक्षण करण्यात आले. रासायनिक परीक्षणात २८ ठिकाणचे पाणी दूषित आढळून आले. जैविक परीक्षणात २६ ठिकाणचे पाणी पिण्यायोग्य नसल्याचे दिसून आले. त्यामुळे हे स्त्रोत तत्काळ बंद करण्यात आले.

# १२ अंडे व १३ पिलांसह अखेर नागीण घरातून मुक्त

## राष्ट्रीय वन्यजीव संवर्धन समितीची कामगिरी

**लोकशाही वार्ता/राजुरा**

गडचांदूर येथील सुभाष रामचंद्र क्षीरसागर यांच्या राहत्या घरी चक्क नाग प्रजातीच्या विषारी नागिणीने अंडी दिली व त्यातील १३ पिल्ले अंड्यातून बाहेर पडली, तर १२ अंड्यातून पिल्ले बाहेर पडायची होती. आपल्या घरात नागीण असून, ती विषारी प्रजातीची व पिल्ले दिलेली असल्याने लगेच क्षीरसागर यांनी राष्ट्रीय वन्यजीव संवर्धन समिती गडचांदूरचे सर्पमित्र अजय गिरटकर व दिपेश वनकर यांना बचाव कार्यासाठी बोलावले.



मानव - वन्यजीव संघर्ष टाळण्यासाठी लगेच दोघांनीही घटनस्थळाला भेट दिली आणि नागीण व तिच्या पिलांसह त्यांना गडचांदूरच्या जंगलात मुक्त केले. त्यांच्या या कार्याबद्दल सर्वत्र कौतुक होत आहे.

नैसर्गिक पर्यावरण संवर्धन व मानवता विकास संस्थेच्या पाच उप समित्या असून, त्यातील पर्यावरण संवर्धन समिती सोबतच कला,साहित्य व सांस्कृतिक विकास समिती, राष्ट्रीय महिला हिंसाचार प्रतिबंधक समिती, गड किल्ले संवर्धन समिती, राष्ट्रीय वन्यजीव संवर्धन समिती आहेत. राष्ट्रीय अध्यक्ष सुयोग धस, दिपक भवर, आशिया रीजवी, महाराष्ट्र राज्याध्यक्ष बादल बेले, बापू परब, महीला अध्यक्षा डॉ. प्रिती तोटावार, तेजस्विनी नागोसे यांनी सर्पमित्रांच्या कामगिरीबद्दल कौतुक केले.

पावसाळा आला की अनेक पशू-पक्षी, जीव, कीटक, सरपटणारे प्राणी यांचा वावर वाढलेला दिसतो. प्रत्येक सजीव आपल्या जीवाची रक्षा करण्यासाठीं मिळेल त्या सुरक्षित ठिकाणी आपले अधिवास शोधून राहतो. पुनरुत्पादन अर्थात आपल्यासारखा दुसरा जीव निर्माण करण्याची नैसर्गिक प्रक्रिया सजीवांत आढळून येते.

# तेल्हाऱ्यातील तरुणाचा वारी धरणात बुडून मृत्यू

**लोकशाही वार्ता/तेल्हारा**

सर्वत्र पाऊस झाल्याने नाले, नद्या, डोह, धरणे ओव्हरफ्लो होऊन वाहत आहेत. अशात पावसाळी सहलीसाठी निसर्गरम्य ठिकाणी पर्यटकांची गर्दी वाढते आहे. या गर्दीत पर्यटकांचा अतिउत्साहीपणा अंगलट येतो. अकोला-बुलढाणा जिल्ह्याच्या सीमारेषेवरील वारी हनुमान धरण हे प्रसिद्ध तीर्थक्षेत्र आणि पर्यटन स्थळ आहे. इथे नेहमीच भाविकांची आणि पर्यटकांची मोठी गर्दी असते. अशाच पर्यटनासाठी वारी हनुमान धरण इथे तीन मित्रांसह एक तरुण आला होता. तेल्हारा येथून आलेल्या या तरुणाचा राजन्या डोहात बुडून मृत्यू झाला.

वारी आणि अरनदीचा संगम होत असलेल्या अरनदीच्या राजन्या डोहात बुडून मृत्यू झालेल्या तरुणाचे नाव अक्षय सिद्धार्थ भोजने आहे. तेल्हारा, जिल्हा अकोला येथील तो रहिवासी आहे. त्याचे मित्र प्रेम डोंगरे, रवींद्र पोहनकर, राहुल विरघट यांच्यासह तो दर्शनासाठी वारी हनुमान येथे आला होता.त्यानंतर मंदिरालगत अरनदी पात्रात दुपारी दोन वाजेच्या सुमारात अक्षयने राजण्या डोहात पोहण्यासाठी उडी घेतली. पोहण्यासाठी उतरलेला अक्षय बराच वेळ झाला तरी बाहेर आला नाही. तो बाहेर न आल्याने वारी येथील नागरिकांनी त्याचा नदीत शोध सुरू केला. बराच वेळानंतर तो नदीत बुडून मृतावस्थेत दिसून आला.

दरम्यान, घटनास्थळ सोनाळा पोलिस स्टेशनला मृतकाचा भाऊ अनमोल सिद्धार्थ भोजने यांनी फिर्याद दिली.

हेड कॉन्स्टेबल शाकीर पटेल यांनी मृतदेहाचा पंचनामा करून शवविच्छेदनासाठी मृतदेह पाठवला. सोनाळा पोलिसांनी या प्रकरणी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे.

# संत्रा नुकसान भरपाईबाबत शेतकरी आक्रमक

## मोर्चा काढण्याचा इशारा

**लोकशाही वार्ता/अकोला**

अवकाळी पावसामुळे संत्रा बागाची अवेळी फूट झाली होती. त्यानंतर पावसाचा खंड पडल्यामुळे संत्र्याचे गळण झाले, त्यामुळे संत्रा बागेचे पंचनामे करून नुकसान भरपाई द्यावी, अन्यथा पंचायत समिती ते पायदळ मोर्चा आंदोलन करण्यात येईल, असा इशारा जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी दिला आहे.



आतापर्यंत संत्रा बागावर ४० टक्के रक्कम खर्च झाली आहे. उन्हाळ्यात अवकाळी पाऊस व नंतर पावसाचा खंड यामुळे पंचनामे करणे संदर्भात निवेदन देऊनही पंचनामे करण्यात आलेले नाही. येत्या १८ जुलैपर्यंत कृषी विभागाला पंचनामे करण्याचे आदेश द्यावे, अन्यथा त्याच दिवशी पायदळ मोर्चा आंदोलन काढण्याचा इशारा निवेदनाद्वारे संत्रा उत्पादक शेतकऱ्यांनी दिला आहे. निवेदनावर शेतकरी विशाल ठाकरे, गोपाल म्हातारमारे, मुकेश काळे, सुनील देशमुख, चंद्रशेखर कोल्हे, आदीसह शेकडो शेतकऱ्यांच्या स्वाक्षरी आहेत.

# जनसुरक्षा कायद्यावर अनिल देशमुख यांचे टीकास्त्र

**लोकशाही वार्ता/नागपूर**

महाराष्ट्रातील जनसुरक्षा कायद्यावर माजी गृहमंत्री व राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते अनिल देशमुख यांनी आज जोरदार टीका केली. ईडीप्रमाणेच राजकीय विरोधासाठी या कायद्याचा गैरवापर होऊ शकतो. शेतकरी, कामगार, विद्यार्थी आणि राजकीय पक्षांमध्ये या कायद्याबद्दल भीती आहे. आंदोलन केल्यानंतर आपल्यावरही कारवाई होऊ शकते, अशी भीती असल्याचे ते म्हणाले.

मुळात ईडी कायदा अंमली पदार्थ आणि दहशतवाद विरोधात आणला गेला. परंतु, राज्यकर्त्यांनी राजकीय विरोधासाठी त्याचा वापर केला. तसाच गैरवापर जन सुरक्षा कायद्याचा होऊ शकतो, अशी भीती सर्वसामान्यांमध्ये असल्याचे देशमुख म्हणाले.

# तिरोडा येथे साकारली 'बांधावरची शाळा'!

## निसर्गाच्या सान्निध्यात शेतात शिक्षण

**लोकशाही वार्ता/गोंदिया**

गोंदिया जिल्ह्यातील तिरोडा तालुक्यातील भजेपार जिल्हा परिषद शाळेने एक प्रेरणादायी प्रयोग साकारला आहे. बांधावरची शाळा या अभिनव उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांना निसर्गाच्या सान्निध्यात शेतातच शिक्षण देण्यात आले.

शेतकऱ्यांचे जीवन, भातलावणीसारखी शेतीची प्रात्यक्षिके, आणि पावसाच्या कवितांमधून विद्यार्थ्यांनी केवळ आनंद घेतला नाही, तर श्रमाचे आणि अन्ननिर्मात्यांचे महत्त्वही जाणले. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये श्रमप्रतिष्ठा, सहकार्य आणि निसर्गाविषयी आदर जागविण्यात यश मिळाले, असे मत शिक्षिका भाग्यश्री रेवडेकर यांनी व्यक्त केले.



विद्यार्थ्यांनी स्वतः परा काढून भात रोवला, पावसात भिजत कविता म्हटल्या आणि शेतकरी गीतांवर ठुमकत चिखलात नृत्यही केले. नांगरणी, भातलावणी आणि रोवणी यांची माहिती दिली. याशिवाय आधुनिक कृषी यंत्रसामग्री आणि गावातील प्रगतिशील शेतकऱ्यांच्या यशोगाथा विद्यार्थ्यांपुढे सादर करण्यात आल्या.

बालपणापासूनच विद्यार्थांचे बहुआयामी व्यक्तिमत्व घडविण्यासाठी शाळांमध्ये विविध उपक्रमाच्या माध्यमातून प्रयत्न केले जातात. विद्यार्थ्यांना लहान वयातच शेतीची आवड निर्माण व्हावी, यांत्रिक शेती आणि पारंपारिक शेती यातला फरक समजावा, याकरिता शिवराम मरस्कोल्हे यांच्या शेतामध्ये जाऊन विद्यार्थ्यांना शेती शिक्षणाचे धडे देण्यात आले. पारंपारिक शेतीची अवजारे व यांत्रिक अवजारे यांची माहिती प्राचार्य महेंद्र मेश्राम यांनी विद्यार्थ्यांना दिली.

प्रगतिशील शेतकरी शिवराम मरस्कोल्हे यांनी यांत्रिक साधनांचा वापर करून शेती करणारे शेतकरी यांची मुलाखत घेतली. या उपक्रमाच्या यशस्वीतेसाठी ग्रामविकास शिक्षण संस्थेचे अध्यक्ष शार्दुल मेश्राम यांनी विशेष सहकार्य केले. या उपक्रमाच्या यशस्वीतेसाठी शाळा व्यवस्थापन समिती, शाळेतील शिक्षक वृंद यांनी विशेष सहकार्य केले.

### शिक्षणाच्या दिशेने सकारात्मक पाऊल

**बांधारवरची शाळा ही संकल्पना म्हणजे कृतीशील शिक्षणाची सुंदर मूर्तरूप आहे. भजेपार शाळेच्या उपक्रमाने ग्रामीण शिक्षणाच्या दिशेने एक सकारात्मक पाऊल टाकले असून, अशा उपक्रमांचे अनुकरण इतर शाळांनीही करावे, अशी भावना मुख्याध्यापक रामेश्वर बावनकर यांनी व्यक्त केली.**

# विम्बल्डन : कॅश-ग्लासपूल पुरुष दुहेरीत अजिंक्य

**वृत्तसंस्था/लंडन**

ज्युलियन कॅश आणि लॉयड ग्लासपूल यांनी विम्बल्डनच्या इतिहासात आपले नाव कोरले आहे, १९३६ मध्ये पॅट ह्यूजेस आणि रेमंड टकी यांच्यानंतर पुरुष दुहेरीचे विजेतेपद जिंकणारी ही पहिली ऑल-ब्रिटिश जोडी बनली आहे. सेंटर कोर्टवर झालेल्या रोमांचक अंतिम सामन्यात, पाचव्या मानांकित जोडीने रिंकी हिजिकाटा आणि डेव्हिड पेल या ऑस्ट्रेलियन-डच जोडीचा ८३ मिनिटांत ६-२, ७-६ (३) असा पराभव केला.

डेव्हिड पेलच्या खराब सर्व्हिस गेमनंतर कॅश आणि ग्लासपूलने सुरुवातीला ब्रेक मिळवला आणि तिथून सुरुवातीच्या सेटमध्येच त्यांची लय लवकर मिळवली. दुसऱ्या सेटमध्ये, हिजिकाटा आणि पेलने सुरुवातीला ब्रेक पॉइंट रोखला आणि ब्रेक करण्यासाठी जोरदार संघर्ष केला, परंतु कॅश आणि ग्लासपूलने दृढता राखली. जेतेपदाच्या जवळ पोहोचत ४-२ अशी आघाडी घेतली. १९३६ मध्ये पॅट ह्यूजेस आणि रेमंड टकी ही यश मिळवणारी शेवटची ब्रिटिश जोडी होते. १९६० मध्ये येथे पुरुष दुहेरीच्या अंतिम फेरीत पोहोचणारी शेवटची ब्रिटिश जोडी माइक डेव्हिस आणि बॉबी विल्सन होती. अलिकडच्या वर्षांत जॉनी मॅरे, नील स्कुप्सकी आणि हेन्री पॅटन या सारख्या इतर ब्रिटिश खेळाडूंनी पुरुष दुहेरीत यशाची चव चाखली, मात्र त्यांचे सर्व विजय परदेशी भागीदारांसह मिळाले होते.

### ८९ वर्षांनंतर पटकावले 'ऑल-ब्रिटिश' विजेतेपद



### कठीण क्षणांमध्ये खंबीर राहावे लागते

**मी फक्त टिकून राहण्याचा प्रयत्न करत होतो, असे सामन्यानंतर ग्लासपूल म्हणाला. कठीण क्षणांमध्ये तुम्हाला खरोखरच खंबीर राहावे लागते. हिजिकाटा म्हणाला की, हा एक वेडा प्रवास होता. डेव्हिडसोबत खेळणे खूप मजेदार होते. सेंटर कोर्टवर खेळणे हे स्वप्न सत्यात उतरल्यासारखे आहे.**

### पोलंडची इगा बनली टेनिस सम्राज्ञी



**पोलंडची इगा स्वियातेक महिला गटात विम्बल्डन २०२५ ची विजेती ठरली. इगा स्वियातेकने विम्बल्डन २०२५ महिला एकेरीचे विजेतेपद जिंकून इतिहास रचला. सेंटर कोर्टवर खेळल्या गेलेल्या अंतिम सामन्यात आठव्या मानांकित स्वियातेकने अमेरिकेच्या अमांडा अनिसिमोवाला ६-०, ६-० असे हरवून विम्बल्डन विजेतेपद आणि एकूण सहावे ग्रँड स्लॅम विजेतेपद पटकावले. इगाने सेमीफायनलमध्ये वर्ल्ड नंबर वन सबालेन्कालादेखील पराभवाचा धक्का दिला होता. स्वियातेकने केवळ ५७ मिनिटांत विजेतेपदाचा सामना जिंकला. ११४ वर्षांत पहिल्यांदाच अंतिम फेरीच्या सामन्यात प्रतिस्पर्धी महिला खेळाडू एकही सेट जिंकू शकली नाही. २४ वर्षीय स्वियातेकने अंतिम फेरीत एकतर्फी कामगिरी करत अनिसिमोवाला फक्त ५७ मिनिटांत हरवले. १९११ नंतर विम्बल्डन महिला एकेरीच्या अंतिम फेरीत हा पहिलाच ६-०, ६-० असा एकतर्फी विजय आहे, ज्यामुळे हा स्पर्धेच्या इतिहासातील सर्वात एकतर्फी जेतेपदाच्या सामन्यांपैकी एक बनला आहे. इगा स्वियातेक ही विम्बल्डन जेतेपद जिंकणारी पोलंडची पहिली महिला खेळाडू ठरली आहे. इगा स्वियातकने आतापर्यंत कधीही विम्बल्डन जेतेपद जिंकले नव्हते. महिला एकेरी प्रकारातील हे तिचे सहावे ग्रँड स्लॅम जेतेपद आहे. याआधी तिने चार वेळा फ्रेंच ओपन आणि एकदा यूएस ओपन जिंकली होती.**

# आयुषचे इंग्लंडमध्ये दमदार शतक

**वृत्तसंस्था/लंडन**



आपल्या पहिल्याच सामन्यात भारताचा कर्णधार आयुष म्हात्रेने दमदार शतकी खेळी केली. इंग्लंडच्या १९ वर्षांखालील संघाविरूद्ध खेळताना आयुष म्हात्रेने शतक झळकावले. या सामन्यात भारताचा कर्णधार आयुष म्हात्रेने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजीचा निर्णय घेतला. भारताकडून वैभव सूर्यवंशीने १३ चेंडूत अवघ्या १४ धावांची खेळी केली. वैभव स्वस्तात माघारी परतला, पण त्यानंतर आलेल्या विहान मल्होत्राने दुसऱ्या विकेटसाठी १७३ धावा जोडल्या.

भारताचा १९ वर्षांखालील संघ देखील इंग्लंड दौऱ्यावर आहे. भारताचा १९ वर्षांखालील संघ आणि इंग्लंडचा १९ वर्षांखालील संघात पाच एकदिवसीय सामन्यांची मालिका पार पडली. या मालिकेत भारतीय संघाने बाजी मारली. आता दोन्ही संघांमध्ये पहिल्या चार दिवसीय कसोटी सामन्याचा थरार सुरू आहे.

भारतीय कर्णधार आयुष म्हात्रेने जवळपास ९० च्या स्ट्राईक रेटने फलंदाजी केली. यादरम्यान तो नियंत्रणात फलंदाजी करताना दिसून आला. मात्र, त्याला जेव्हा संधी मिळाली, तेव्हा त्याने संधीचा फायदा घेत मोठे फटकेदेखील मारले.

त्याने पहिल्या डावातील १६ व्या षटकात इंग्लंडचा गोलंदाज जेम्स मिंटोच्या षटकात २ षटकार मारले. आयुषने या डावात १०७ चेंडूंचा सामना करत आपले शतक पूर्ण केले.

आयुषने ३६ व्या षटकात शतक पूर्ण केले. त्यानंतर ३८ व्या षटकात तो बाद होऊन माघारी परतला. या षटकातील पहिल्याच चेंडूवर आर्ची वॉनने त्याला बाद करत माघारी धाडले.

आयुषने ११५ चेंडूंचा सामना करत १०२ धावांची खेळी केली. यादरम्यान त्याने १४ चौकार आणि २ षटकार मारले.

# राधाचा भन्नाट कॅच अन् नेटविश्वात तुफान!



**वृत्तसंस्था/एजबॅस्टन**

भारतीय महिला क्रिकेट खेळाडून राधा यादवने क्षेत्ररक्षण करताना इंग्लडविरुद्धच्या मालिकेतील सर्वोत्तम झेल टिपला. आधी फलंदाजीत १४ धावा, गोलंदाजीत एक विकेट आणि जेव्हा संधी मिळाली, तेव्हा तिने डाईव्ह मारत अविश्वसनीय झेल घेतला. या झेलच्या व्हिडिओने सध्या सोशल मीडियावर तुफान आणले आहे. हा व्हिडिओ प्रचंड व्हायरल होत आहे.

भारतीय महिला संघ आणि इंग्लंड महिला संघात टी-२० मालिकेचा थरार नुकताच रंगला. या मालिकेतील पाचव्या टी-२० सामन्यात भारतीय संघाला पराभवाचा सामना करावा लागला. पण, हा सामना जिंकण्यासाठी भारतीय खेळाडूंना पूर्ण जोर लावला. सामना हातून निसटला.

इंग्लंडला सामना जिंकण्यासाठी ३ चेंडूत ५ धावा करायच्या होत्या. त्यावेळी एमी जोन्सने मारलेला चेंडू हवेत गेला. झेल घेणे कठीण होते, पण राधा यादवने धावत डाईव्ह मारली आणि भन्नाट झेल घेतला. या झेलमुळे सामना पुन्हा एकदा बरोबरीत आला होता. भारतीय संघाला सामना जिंकण्याची संधी होती.

### असा घेतला झेल!

**भारतीय संघाकडून निर्णायक षटक टाकण्यासाठी अरुंधती रेड्डी गोलंदाजीला आली. अरुंधतीने ऑफ स्टंपच्या बाहेर चेंडू टाकला. या चेंडूवर फलंदाजी करत असलेल्या एमी जोन्सने स्लॉग स्वीप मारला. चेंडू हवेत गेला त्यावेळी राधा यादव डीप मिडविकेटला क्षेत्ररक्षण करत होती. राधा धावत आली आणि तिने डाईव्ह मारत भन्नाट झेल घेतला. हा झेल टिपल्यानंतर तिसऱ्या पंचांनी अनेकदा खात्री करून पाहिले. शेवटी त्यांनी बाद घोषित केले. हा भन्नाट व्हिडिओ सोशल मीडियावर तुफान व्हायरल होत आहे.**



**विम्बडन:** विम्बल्डन २०२५ स्पर्धेतील पुरुष एकेरीचा अंतिम सामन्यासाठी इटलीच्या जॅनिक सिन्नर आणि स्पेनच्या कार्लोस अल्काराझ यांच्यात रविवारी लंडनमधील सेंटर कोर्टवर लढत झाली. जागतिक क्रमवारीतील अव्वल मानांकित खेळाडूंची ही लढत टेनिसप्रेमींसाठी अविस्मरणीय ठरली. यावर्षी ग्रँड स्लॅम स्पर्धेच्या अंतिम सामन्यात हे दोघे पुन्हा एकदा आमने-सामने येणार आहेत.

# लॉर्ड्‌सवर इंग्लंड १९२ धावांत गारद; भारतासमोर आता विजयाचे लक्ष्य

**वृत्तसंस्था/लॉर्ड्स**

लॉर्ड्सवर आज चवथ्या दिवशी इंग्लंडचा संघ १९२ धावांत गारद झाला. भारतासमोर आता विजयाचे लक्ष्य १९३ धावांचे आहे. भारताच्या दृष्टीने आज सर्व काही योजनेनुसार घडले. सकाळच्या सत्रात मोहम्मद सिराजने, तर दुपारच्या सत्रात सुंदरने भेदक मारा केला आणि बुमराहने आपल्या नेहमीच्या शैलीतील यॉर्करने त्यावर कळस चढवला. भारताला लक्ष्य आवाक्यात असून, मोठी चूक टाळल्यास भारताला लॉर्ड्सवर मालिकेत आघाडी घेण्याची सुवर्णसंधी आहे.

सुंदरच्या नावावर अद्याप तशी भरीव कामगिरी नसली तरी, त्याच्या फलंदाजीचे तंत्र मजबूत आहे आणि आज त्याची गोलंदाजी तर निव्वळ अप्रतिम झाली. सुंदरने टाकलेला आजचा स्पेल हा त्याच्या कारकिर्दीतील सर्वोत्तम स्पेलपैकी एक होता. लॉर्ड्सच्या नैसर्गिक उताराचा फायदा घेत, आतल्या बाजूला वेगाने आलेल्या चेंडूपुढे वोक्स पूर्णपणे हतबल ठरला. हा महत्त्वपूर्ण बळी मिळवताच बुमराहने दोन्ही हात उंचावून धावत जाऊन जल्लोष साजरा केला. आखूड टप्प्याचा हा चेंडू तीव्रतेने आत आला आणि अपेक्षेपेक्षा थोडा खाली राहिला. वोक्सने तो ऑफ-साइडला पंच करण्याचा प्रयत्न केला, मात्र चेंडू बॅटची आतील कड घेऊन थेट लेग-स्टंपवर आदळला. विशेष म्हणजे, बुमराहच्या उजव्या पायाबद्दल चिंता व्यक्त केली जात होती, परंतु पुढच्याच क्षणी त्याने इंग्लंडला नववा धक्का दिला.

## आंतरराष्ट्रीय


# ट्रम्प बनले सुपरमॅन!

### व्हाईट हाऊसने शेअर केला पोशाखातील फोटो

**वृत्तसंस्था/वॉशिंग्टन**

अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प हे दररोज कोणत्या ना कोणत्या कारणाने चर्चेत राहतात. त्यांनी उचललेले प्रत्येक पाऊल लोकांसाठी चर्चेचा विषय बनते. आता व्हाईट हाऊसच्या अधिकृत अकाउंटवरून एक फोटो शेअर करण्यात आला आहे. या फोटोमध्ये डोनाल्ड ट्रम्प सुपरमॅनच्या पोशाखात दिसतात!

सोशल मीडियावर हे फोटो येताच लोकांच्या प्रतिक्रियांचा पूर आला. व्हाईट हाऊसने हा फोटो



प्रसिद्ध केला आणि ट्रम्प यांना आशा, सत्य आणि न्यायाचे प्रतीक म्हणून वर्णन केले. त्यांना सुपरमॅन ट्रम्प, असेही म्हटले गेले. हे शब्द चित्राच्या मध्यभागी लिहिले गेले आहेत.

सुपरमॅन हे डीसी कॉमिक्सह्ममधील एक प्रसिद्ध सुपरहिरो पात्र आहे. अमेरिकेत सुपरमॅनवर अनेक चित्रपटही बनले आहेत. मुलांना या पात्राचे विशेष वेड आहे. अमेरिकेत सुपरमॅनला सत्य आणि न्यायाचे प्रतीक मानले जाते. याच कारणामुळे या चित्रात ट्रम्प यांना सुपरमॅन म्हणून दाखवण्यात आले आहे.

ही पोस्ट व्हाईट हाऊसच्या अधिकृत अकाउंटवरून आली असून, हे पाहून अनेक वापरकर्त्यांना आश्चर्य वाटले, तर काहींनी पेजच्या वैधतेवर आणि व्यावसायिकतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. एकाने ट्विट केले की, व्हाईट हाऊस फक्त एक विनोद बनेल, असे मला वाटले नव्हते. हे खूप लज्जास्पद आहे. नेटकरी यावर अनेक कमेंट करत आहेत. १९९० च्या दशकातील टीव्ही मालिका लोइस अँड क्लार्क: द न्यू ॲडव्हेंचर्स ऑफ सुपरमॅनमध्ये मॅन ऑफ स्टीलची भूमिका करणाऱ्या डीन केनने इमोजीसह पोस्टवर प्रतिक्रिया दिली.

### पाकमधील अतिरेकी हल्ला उधळला

**पेशावर :** पाकिस्तानी सुरक्षा दलांनी खैबर पख्तूनख्वा प्रांतातील एका पोलिस ठाण्यावरील दहशतवाद्यांचा हल्ला उधळून लावल्याचा दावा केला. सुमारे १२ सशस्त्र दहशतवाद्यांनी लक्की मारवत जिल्ह्यातील गाम्बिला पोलिस ठाण्यावर हल्ला करण्याचा प्रयत्न केला होता, असे सैन्यातर्फे सांगण्यात आले. दरम्यान, एका पोलिस अधिकाऱ्याने अतिरेक्यांना पाहिले आणि पोलिस कारवाईनंतर त्यांना माघार घ्यावी लागली. यावेळी कोणतीही जीवितहानी झाली नाही.

# शेख हसीना यांच्या मुलीची अखेर जागतिक आरोग्य संघटनेतून हकालपट्टी



**वृत्तसंस्था/ढाका**

जागतिक आरोग्य संघटनेने बांगलादेशच्या माजी पंतप्रधान शेख हसीना यांना मोठा धक्का दिला आहे. शेख हसीना यांची मुलगी सायमा वाजिद यांची हकालपट्टी करण्यात आली आहे. सायमा या जागतिक आरोग्य संघटनेच्या आग्नेय आशियाच्या प्रादेशिक संचालक म्हणून काम करत होत्या. बांगलादेशच्या अंतरिम सरकारने केलेल्या तक्रारीनंतर शेख हसीना यांच्या मुलीवर ही कारवाई करण्यात आली असल्याचे सांगण्यात येत आहे.

जागतिक आरोग्य संघटनेचेमहासंचालक टेड्रोस घेब्रेयसस यांनी एक ईमेल पाठवून वाजिद आता रजेवर जाणार असल्याची माहिती दिली. ईमेलमध्ये म्हटले आहे की, जागतिक आरोग्य संघटनेच्या सहाय्यक महासंचालक डॉ. कॅथरीना बोहेमे या संयुक्त राष्ट्रांच्या आरोग्य संस्थेच्या आग्नेय आशिया प्रादेशिक कार्यालयात सायमा यांची जागा घेतील.

या वर्षाच्या सुरुवातीला, बांगलादेश भ्रष्टाचार विरोधी आयोगाने वाजिद यांच्याविरुद्ध तिच्या शैक्षणिक पात्रतेबाबत खटला दाखल केला. आयोगाने सायमा यांच्यावर जागतिक आरोग्य संघटनेच्या प्रादेशिक प्रमुखपदासाठी तिच्या आईच्या प्रभावाचा वापर केल्याचा आरोपही केला.

अहवालानुसार, तिने खोटा दावा केला की ती बंगबंधू शेख मुजीब मेडिकल युनिव्हर्सिटीमध्ये मानद पदावर होती, ज्याचा विद्यापीठाने इन्कार केला आहे. असाही आरोप आहे की, वाजेद बांगलादेशात तिच्या आई सत्तेत असताना व्यापक भ्रष्टाचारात सहभागी होती.

तिच्या प्रभावाचा आणि नातेसंबंधांचा फायदा घेत अनेक बँकांमधून बेकायदेशीरपणे पैसे मिळवले आणि हे पैसे सुचोना फाउंडेशनद्वारे वळवले, ज्याचे ती एकेकाळी अध्यक्ष होती. दरम्यान, बांगलादेशच्या विशेष न्यायाधिकरणाने शेख हसीना यांच्या विरुद्धच्या गुन्ह्यांचे आरोप स्वीकारले. गेल्या वर्षी झालेल्या जनआंदोलनाच्या संदर्भात हे आरोप लावण्यात आले होते, ज्यामध्ये शेकडो विद्यार्थी मारले गेले होते. यावर प्रतिक्रिया देताना, अवामी लीग पक्षाने सुनावणी प्रक्रियेचा निषेध केला आहे.

# आसिफ झरदारीच राहणार पाकिस्तानचे राष्ट्राध्यक्ष

## पंतप्रधान शहबाज शरीफ यांचे स्पष्टीकरण

**वृत्तसंस्था/इस्लामाबाद**

पाकिस्तानच्या अध्यक्षपदी आसिफ अली झरदारी हेच कायम राहतील, असे पंतप्रधान शहबाज शरीफ यांनी म्हटले आहे. झरदारी यांना अध्यक्षपदावरून हटवून त्यांच्या जागेवर लष्कर प्रमुख फिल्ड मार्शल आसिम मुनीर यांना नियुक्त केले जाण्याची चर्चा सुरू असताना शरीफ यांनी हे वक्तव्य केले आहे. जनरल आसिम मुनीर यांनी कधीही अध्यक्ष बनण्याची इच्छा व्यक्त केलेली नाही. त्यांना त्या पदाची अपेक्षाही नाही. अध्यक्ष बदलण्याचा कोणताही प्रस्ताव देखील नाही, असे शरीफ यांनी म्हटले आहे.

झरदारी, मुनीर आणि आपल्यामध्ये चांगला संवाद आहे. परस्परांच्या आदरावर आपले संबंध आधारलेले आहेत. पाकिस्तानची प्रगती आणि समृद्धी हेच आम्हा तिघांचेही उद्दिष्ट असल्याचेही शरीफ माध्यमांशी बोलताना म्हणाले. अध्यक्ष बदलण्याची अफवा दुष्प्रचार करण्याच्या मानसिकतेतून पसरवण्यात येत असल्याचे पाकिस्तानचे गृहमंत्री मोहसिन नक्वी यांनी एक्सवरच्या पोस्टमध्ये म्हटले होते. त्यानंतर लगेचच पंतप्रधान शहबाज शरीफ यांनीही याबाबत खुलासा केला.



हा दुष्प्रचार कोण करत आहे, हे आपल्याला माहिती असल्याचेही नक्वी म्हणाले होते. मात्र त्यांनी कोणाचेही नाव घेतले नाही. मात्र त्यांचा रोख परदेशी शक्तींबाबत होता. झरदारी आणि त्यांचे पुत्र बिलावल भुट्टो झरदारी दोघांचेही पाकिस्तानच्या आघाडी सरकारशी चांगले संबंध असल्याचे बोलले जाते. भारत-पाकिस्तान दरम्यान, झालेल्या लष्करी संघर्षानंतर काही देशांमध्ये पाकिस्तानची भूमिका स्पष्ट करण्यासाठी गेलेल्या पाक संसद सदस्यांच्या शिष्टमंडळाचे नेतृत्व बिलावल भुट्टो आणि झरदारी यांनी केले होते.

# 'बिग बॉस'फेम रोजिकला दुबई विमानतळावर अटक

**वृत्तसंस्था/दुबई**

बिग बॉस १६फेम गायक अब्दू रोजिक याच्या अडचणीत मोठी वाढ झाली आहे. अब्दू रोजिक याला दुबई विमानतळावरून अटक करण्यात आली आहे. अब्दू रोजिक याच्यावर चोरीचे आरोप आहेत.

दुबई विमानतळावर चोरीच्या आरोपाखाली अब्दू रोजिकला अटक करण्यात आली. अब्दूच्या टीमने दिलेल्या माहितीनूसार, आम्हाला फक्त इतकेच माहिती आहे की, त्याला चोरीच्या



आरोपाखाली ताब्यात घेण्यात आले आहे.

अब्दु रोजिक वयाच्या अवघ्या २१ व्या वर्षी एक मोठा सेलिब्रिटी बनला. त्याने सलमान खानच्या सर्वात वादग्रस्त शो बिग बॉस १६मध्येही भाग घेतला होता. या शोमुळे अब्दु प्रत्येक घरात प्रसिद्ध झाला. अब्दु रोजिक सोशल मीडियावरदेखील कायम सक्रिय असतो. सोशल मीडियावर त्याच्या चाहत्यांची संख्यादेखील फार मोठी आहे. अब्दु रोजिक दुबईत राहतो आणि तेथे आलिशान घर आहे.

तो अनेकवेळा अडचणीत आला आहे. भारताच्या अंमलबजावणी संचालनालयाने एका हॉस्पिटॅलिटी फर्मशी संबंधित मनी लाँड्रिंग प्रकरणात अब्दू रोजिकची चौकशी केली होती.

### आमचा लढा संपूर्ण स्वातंत्र्यासाठी- रेहान

**क्वेटा :** बलुचिस्तान पाकिस्तानचा भाग कधीच नव्हता आणि कधीच होणार नाही, असा ठाम दावा बलुच नॅशनल मूव्हमेंटचे माहिती सचिव काझी दाद मोहम्मद रेहान यांनी एका मुलाखतीत केला. बीएनएमचे रेहान यांनी सांगितले की, आम्ही पहिली संघटना आहोत, जिने पाकिस्तानच्या संसदीय प्रक्रियेला स्पष्ट विरोध केला आहे. आमचा लढा कोणत्याही प्रकारच्या स्वायत्ततेसाठी नाही, तर पूर्ण स्वातंत्र्यासाठी आहे. त्यांनी असेही स्पष्ट केले की, बलुच जनता आता आपला निर्णय स्वतः घेण्यास सज्ज आहे. रेहान यांनी बलुचिस्तानचा पाकिस्तानमध्ये १९४८मध्ये जबरदस्तीने समावेश झाल्याची आठवण करून दिली.

# चीनने मधमाशीला बनवले चक्क गुप्तहेर!

**वृत्तसंस्था/बीजिंग**

चीनने नुकतेच एक असे तंत्रज्ञान विकसित केले आहे, ज्याने जगातील अनेक देशांची झोप उडवली आहे. ड्रॅगनने आता अशा मधमाशा तयार केल्या आहेत, ज्या शत्रूंची गुप्त माहिती सैन्यापर्यंत पोहोचवतील. बीजिंग टेक्नॉलॉजीचे प्रा. झाओ जेलियांग आणि त्यांच्या टीमने जगातील पहिले कीटक मेंदू नियंत्रक तयार केले आहे.

हे एक अत्यंत लहान यंत्र असून, ते मधमाशीच्या पाठीवर बसवले जाईल. याचे वजन केवळ ७४ मिलिग्रॅम आहे. ते मधमाशीच्या मध गोळा करण्याच्या पिशवीपेक्षाही कमी आहे. हे डिव्हाईस तीन अत्यंत

### जगातील पहिल्या कीटक मेंदू नियंत्रकाची निर्मिती



पातळ सुयांच्या मदतीने मधमाशीच्या मेंदूशी जोडले जाईल आणि इलेक्ट्रॉनिक संकेतांद्वारे तिला दिशा निर्देश दिले जातील. हे संशोधन चायनीज जर्नल ऑफ मेकॅनिकल इंजिनिअरिंगमध्ये प्रकाशित झाले आहे.

संशोधन अहवालानुसार, या डिव्हाईसची चाचणी केली असता १० पैकी ९वेळा मधमाशीने दिलेल्या आदेशांनुसार, अचूक दिशेने उड्डाण केले.

भविष्यात अशा मधमाशा लष्करासाठी गुप्तहेराचे काम करू शकतात किंवा भूकंपासारख्या आपत्तीनंतर अडकलेल्या लोकांचा शोध घेण्यासाठीही त्या प्रभावी ठरू शकतात. यापूर्वी सिंगापूरमध्येही अशाच प्रकारचे डिव्हाईस तयार करण्यात आले होते; परंतु ते चीनच्या डिव्हाईसपेक्षा तिप्पट जड होते. त्यामुळे ते केवळ किडे आणि झुरळांसारख्या कीटकांवरच काम करू शकत होते. याउलट, चीनने बनवलेले डिव्हाईस अधिक कार्यक्षम आहे.

ते वेगाने उडणाऱ्या आणि लांबचा पल्ला गाठू शकणाऱ्या मधमाशांवर वापरले जाऊ शकते; मात्र या तंत्रज्ञानासमोर काही आव्हानेही आहेत. सध्या या डिव्हाईसला बाहेरून वीजपुरवठा करावा लागतो. यात बॅटरी बसवली, तर त्याचे वजन वाढेल आणि मधमाशीला ते घेऊन उडणे कठीण होईल. झाओ यांच्या टीमचे म्हणणे आहे की, भविष्यात हे तंत्रज्ञान अधिक अचूक आणि विश्वासार्ह बनवण्याच्या दिशेने काम सुरू आहे. यासाठी सिग्नल आणि नियंत्रण तंत्रज्ञानात आणखी सुधारणा केल्या जातील.